# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४९** **दि. ३०/०५/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३०/०५/२०२३ मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | काळे दिपमाला मनोज | पाटील रेखा चुडामण |
| जोहरे प्रिया मधुकर | सोनवणे अश्विन शांताराम | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील सचिन भिमराव | महाजन सुनिल सुपडू |
| सोनवणे कांचन विकास | चौधरी मनोज सुरेश | नाईक प्रशांत सुरेश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील प्रतिभा सुधीर | अत्तरदे रजनी प्रकाश |
| बाविस्कर किशोर रमेश | कापसे मयुर चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे मिना धुडकु | कापसे प्रतिभा चंद्रकांत | सोनार रंजना विजय |
| सपकाळे रंजना भरत | देशमुख प्रतिभा गजानन | खडके सुनिल वामनराव |
| कोल्हे प्रविण रामदास | शेख हसीनाबी शरीफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| सनकत चेतन गणेश | भिल पार्वताबाई दामु | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी चेतना किशोर | पाटील उषा संतोष | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे ललीत विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| भंगाळे विष्णु रामदास | बरडे नितीन मनोहर | सोनवणे निता मंगलसिंग |
| तायडे ज्योती शरद | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | राणे गायत्री इंद्रजित | **स्विकृत सदस्य** |
| काळे अमित पांडुरंग | जोशी अनंत हरिश्चंद्र | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| चौधरी मंगला संजय | तायडे सुरेखा नितीन | राजेंद्र नारायण मराठे |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | चव्हाण ज्योती बाळासाहेब | महेश रतन चौधरी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | मराठे जितेंद्र भगवान | |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगररचनाकार श्री.के.पी.बागुल, नगरसचिव तथा सहा.आयुक्त, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त श्री.गणेश चाटे, मुख्यलेखाधिकारी श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** महासभेला सुरुवात करण्यापुर्वी एक सुचना सर्वांना देऊ ईच्छिते की, सभागृहामध्ये सन्मा.नगरसेवक, पत्रकार बंधु आणि सर्व अधिकारी वर्ग यांचीच उपस्थिती राहील यांच्या व्यतिरिक्त जर कोणी असेल तर त्यांनी सन्मानपुर्वक सभागृहाच्या बाहेर जावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, अजेंडयावरचे जितके विषय आहे ना तितकेच विषयांना प्राधान्याने घेण्यात यावे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नितीनभाऊ, मला फक्त एकच विषयावर बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** आपण विषय घेऊ पहिले आपण अजेंडयावरचे विषयांना सुरुवात करु या. त्याच्यानंतर आपण तुमचा विषय घेऊ.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या राखी शामकांत सोनवणे २) चंद्रशेखर शिवाजी पाटील यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१०९९ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.प्रविण रामदास कोल्हे | महानगरपालिका कर्मचारी स्व.रविंद्र सदाशिव कोळी यांचे दुखद: निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११०० पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.राजेंद्र झिपरु पाटील | भारताचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांनी भारताचे नविन संसद भवनाचे उद्घाटन केले म्हणून मा.पंतप्रधान,श्री.नरेंद्रजी मोदी व त्यांचे सहकाऱ्यांचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, उपमहापौर महोदय, सन्मा.आयुक्त महोदया, आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या हस्ते संसद भवनाचे उदघाटन झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व त्यांचे सहकारी सदस्य यांचा अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात यावा.

**नगरसचिव -विषय क्र.०१ :-** दि.२९/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या तहकूब विशेष महासभेचे कार्यवृत्त तसेच दि.२१/०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** त्याचे काय झाले. तहकुब म्हणुन आला होता तो विषय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** गायत्रीताई शिंदे यांनी त्याच्यावर आक्षेप घेतलेला होता की, झालेले काम पुन्हा प्रस्तावीत करण्यात येत आहे. परंतु परिस्थिती तशी नाही मला वाटते. तरी प्रशासनाने तातडीने त्याची खात्री करुन घ्यावी. आणि ताबडतोब त्याच्या संदर्भातला पुढचा निर्णय द्यावा.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** संबंधीत शाखा अभियंता यांनी सर्व निरिक्षण करुन अहवाल दिलेला आहे आणि जे रस्ते सांगितले त्यांचे दुसऱ्या योजनेतुन कार्यादेश दिलेले असल्याने घेता येणार नाही. श्री.नवनाथ दारकुंडे यांनी जो रस्ता सुचविलेला आहे. तो घेता येईल असा प्रस्ताव आमच्याकडे प्राप्त झालेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे. प्रशासनाने कार्यादेश देऊन काम सुरु करायचे आहे.

**मा.महापौर :-** याबाबत आपण स्वत: खात्री करावी कोणताही निर्णय घेण्यापुर्वी. इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२९/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या तहकूब विशेष महासभेचे कार्यवृत्त तसेच दि.२१/०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव :- विषय क्र. ०२ :-** श्री.अतुल अशोक मुंदडा यांना जळगांव महानगरपालिका महासभा ठराव क्र.५१ दि.०७/१२/२०१८ विखंडीत करण्यास टाळाटाळ केली जात असल्याबाबत मा.लोकायुक्त यांचेकडे केलेली तक्रार. शासनाचे पत्र क्र.जमपा-२०२२/प्र.क्र.२८१/नवि- २५ दि.१०/०४/२०२३ संदर्भात प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि वकीलाच्या येणाऱ्या निर्णयानुसार मान्यता देण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.अतुल अशोक मुंदडा यांचे जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मागे घेणे संदर्भात मा.महासभा ठराव क्र.५१ दि.०७/१२/२०१८ पारीत झालेला असुन उक्त ठराव विखंडीत करण्यासाठी श्री.अतुल मुंदडा यांनी शासनास विनंती केली आहे. तथापि शासनाने सदरचा ठराव विखंडीत न केल्याने त्यांनी विषयांकीत बाबीत मा.लोकायुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या कडेस शासना विरुध्द दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संदर्भीय शासन पत्रासोबत विषयांकीत प्रकरणी मा.लोकायुक्त महाराष्ट्र राज्य यांचे समोर दि.०६/०३/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीच्या इतिवृत्ताची प्रत प्राप्त झाली आहे. सदर सुनावणीत मा.लोकायुक्त यांनी भुसंपादन रक्कम / भरपाई रक्कम भरण्या बाबत सुचित करुन दि.२४/०४/२०२३ च्या सुनावणीस सदरील रक्कम भरलेबाबत अहवाल देण्याचे मा.लोकायुक्त व राज्य शासनाने कळविले आहे.

सबब सर्व बाबींचा विचार करता व मनपाचे आर्थिक हित पाहता सदर प्रकरणी तातडीने मा.उच्च न्यायालयात संपुर्ण वस्तुस्थिती सादर करुन दाद मागणे, या करीता जेष्ठ विधीतज्ञ यांची नेमणुक करुन त्याकरीता आर्थिक तरतुद मंजुर करणे आवश्यक आहे. अत्यंत तातडीचे प्रकरण असल्यामुळे महापौर, महानगरपालिका,जळगांव यांनी प्रकरणी कार्योत्तर मान्यता देलेली असल्याने सदर प्रकरणी मनपाचे आर्थिक हित पाहता याप्रकरणात जेष्ठ विधीतज्ञ यांची नेमणुक करणेस व त्याकरीता (येणाऱ्या खर्चास) आर्थिक तरतुद मंजुर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव :- विषय क्र. ०३ :-** भटक्या मांजरांचे लसीकरण व निर्बीजीकरण करण्याकरिता दि.२३ मार्च २०२३ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** करायचे की नाही करायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** करायचे कारण शासनाचेच आदेश आहे तसे. शासनाने आदेश दिल्याकारणाने मा.महापौरताई याच्यामध्ये मा.सहा.आयुक्त आरोग्य यांचे म्हणणे आहे की, प्रस्तावीत केलेले अ प्रमाणे कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही. कारण भटक्या मांजरी बाबत मनपाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. ही धोरणात्मक बाब असल्याने मान्यतेसाठी पाठविलेले आहे. तर मला वाटते की, याची काय आवश्यकता वाटते.

**सौ.शुचिता हाडा :-** खंर तर महापौरताई, त्रास जो आहे तो कुत्र्यांपासुनचा आहे. त्यांच्यावर निर्बिजीकरणाची प्रोसेस आपण सुरु केल्यानंतरही तो त्रास आटोक्यात आलेला नाही. तर त्यावर प्रशासनाने आपले लक्ष केंद्रीत केले पाहिजे. त्याचे आजचे काय स्टेटस आहे याची माहिती सभागृहाला दिली पाहिजे. कारण मांजरीने हल्ला केला अशी कोणतीही तक्रार अजुनही आलेली नाही. यासाठी आपण अजुन काय उपाययोजना करत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्यावेळेला आपण निर्बिजीकरणाची सुरुवात केली. त्यावेळेला अंदाजीत साधारणता १० ते १५ हजार कुत्र्यांची संख्या या शहरामध्ये होती. समजा मेलेले कुत्रे जे असतील त्यांची संख्या निम्मे जर धरली तर ते ७ ते ८ हजाराचे जवळपास येतील. आणि निर्बिजीकरण केल्यानंतर पुढील उत्पत्ती वाढु नये. यासाठी निर्बिजीकरण आपण एक पर्याय म्हणुन आपण पाहतो. परंतु तो कुत्रा त्याचे जे आयुष्यमान आहे. त्या आयुष्मानपर्यंत तो जगेल. आणि जगल्यानंतरही तो मोकाटच कुत्रा असल्याकारणाने हल्ले करण्याची त्याची किती प्रवृत्ती आहे त्या प्रवृत्तीला आळा घालण्यासंदर्भात दुसरी अशी कोणतीही शासन उपाययोजना प्रशासनाकडे नाही आणि कायद्यातही अपेक्षित नाही. एकेकाळी आपण यांना विषारी गोळया देऊन मारुन टाकत होतो. परंतु मे.सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या संदर्भातली कडक निर्बंध घातलेला कारणाने ही संख्या जो पर्यंत जिवीत असेल. आहे तोच चालत राहील. आणि तो त्रास नागरीकांना होणे अपेक्षितच आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** निर्बिजीकरण करणारी संस्थेची तक्रार झाली म्हणुन ते काम बंद पडले काही काळासाठी. आणि त्या पिरीयेड मध्ये जो ब्रिडींग पिरीयेड असतो. त्यांची पुन्हा एकदा संख्या वाढली. म्हणजे काय झाले कोणत्यातरी किरकोळ तक्रारीची प्रशासनाने दखल घेतली आणि ते काम बंद पडले. जे चांगले काम सुरु होते. ते काम बंद पडल्यामुळे त्या पिरीयेड मध्ये कुत्र्यांची संख्या पुन्हा एकदा वाढली. म्हणजे आपल्याला पुन्हा त्या वाढलेल्या कुत्र्यांवर निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया करायची वेळ आली. हे जे घडत आहे यामध्ये प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. तक्रारींची दखल घेऊ नका असे म्हणत नाही. आणि कोणत्या तक्रारीची नाही याचा सादा विचार प्रशासनाने करायला हवा. अतिरिक्त बोझा आपल्यावर वाढलेला आहे अजुन संख्याही वाढलेली आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०३ मध्ये जर याबाबतच्या काही तक्रारी प्रशासनाला प्राप्त झाल्या. तर आवश्यकतेनुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरताई,

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ, राजुभाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ, आता आपल्या परिसरात बगिच्या जवळ बघा.आपल्याला त्याचे निर्मुलन जर करायचे आहे ना.तर कन्टीन्यु हे काम चालु राहिले पाहिजे. आणि लवकरात लवकर नाही तर कसे आहे. पाच महिन्यात चार पट संख्या होते त्यांची. म्हणजे आदीचा केलेला खर्च आपला पुर्ण वाया जातो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निर्बिजीकरणाची संख्या आता ही सुरु आहे. ती आपण बंद केलेली नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता पर्यंत काय आहे. किती झाले, त्याची माहिती द्या तो प्रश्न विचारला त्यांनी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या प्रस्तावाकरीता प्रशासनाचे जे मत आहे ते मान्य करण्यात यावे. निर्बिजीकरण करण्यात येऊ नये. असे प्रशासनाचे मत आहे. त्या मताशी सभागृह सहमत आहे.

**मा.उपमहापौर :-** प्राप्त होणाऱ्या तक्रारीनुसार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मांजरीच्या बाबतीत कुठल्याच तक्रारी नाही.

**मा.महापौर :-** पण मांजरींमुळे. जर तक्रारी प्राप्त झाल्या तर करण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर ताई, महापौरताई.

**मा.आयुक्त :-** तक्रार दाखल केली होती. पी.आय.एल. मध्ये मग त्यानुसार शासनाने परिपत्रक काढले, मुंबईला दिसतात मांजरी.पण आपल्याकडे ते प्रमाण नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** या विषयाच्या संदर्भात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा ठराव करतांना, पुर्ण विषय महासभेपुढे पाठवावा तरच तो विषय करावा अशी एक अट टाकुन द्या त्या ठरावात.

**सौ.शुचिता हाडा :-** ज्या वेळेला आपण हा विषय घेऊ. त्यावेळेला सखोल चर्चा करुन आपण निर्णय घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा प्रशासनाचा प्रस्ताव सभागृहासमोर आला असता, जर भविष्यात मांजरींच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या तर प्रशासनाने आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. त्यात आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** मंजुर करायचा की नामंजुर करायचा, नेमके काय ? मान्य आहे असे सांगा, असा जर प्रस्ताव घ्यायचा असेल तर मंजुर करावा लागेल. नाही तर प्रस्ताव नामंजुर करायचा तो ही मंजुर करावा लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना. आता प्रशासनाचा प्रस्ताव काय आहे आता प्रशासन असहमत आहे त्या संदर्भात की, ते काही बंधनकारक नाही.म्हणुन प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** हेच मला म्हणायचे आहे. मंजुर करायचे की, नामंजुर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करा प्रशासनाचा प्रस्ताव. आणि जर की, अश्या पध्दतीने काही तक्रारी प्राप्त झाल्यास प्रशासनात मा.आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे की, त्यांनी आपले स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा.

**सौ.शुचिता हाडा :-** भविष्यात जर आपण हे करायचे ठरविले तर त्या खर्चाची तरतुद काय असणार आहे. आणि यासाठी काही शासनाकडुन फंडींग होणार आहे का ?

**मा.आयुक्त :-** म.न.पा.

**सौ.शुचिता हाडा :-** म.न.पा.फंडातुन तर मला असे वाटते की, जर या संदर्भात भविष्यात मांजरींचे निर्बिजीकरणाचे सुरु करायचे असले तर ते पुन्हा एकदा ते प्रस्तावसभागृहासमोर आला पाहिजे. आर्थिक मंजुरी सभागृहच देणार आहे. आजच्या तारखेत प्रशासनाकडे या संदर्भात कोणत्याही तक्रारी प्राप्त नाही. हे प्रशासकीय अभिप्रायात नमुद झालेले आहे. आणि म्हणुन प्रशासनाला याची गरज वाटत नाही. असा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. भविष्यात तक्रारी प्राप्त झाल्यास.

**मा.उपमहापौर :-** आता पर्यंत अश्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाही.भविष्यामध्ये जर तक्रारी प्राप्त झाल्या तर प्रस्ताव पुन्हा महासभेसमोर आणावा आणि आर्थिक खर्चाची तरतुद करुन मान्य करु.

**मा.महापौर :-** मग आता तो नामंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** नामंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता तो नामंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०३ सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** पण ठरावामध्ये हे घेऊन घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तसेच मा.पिठासिन अधिकारी तथा महापौर यांनी सभागृहात या विषयाबाबत केलेल्या घोषणेनुसार सदयास्थितीत यासंदर्भात नागरीकांची तक्रार प्रशासनास प्राप्त झालेली नसल्याने सदर प्रस्तावाची अंमलबजाणी करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. भविष्यात यासंदर्भात नागरीकांकडुन ज्यावेळेस तक्रारी प्राप्त होतील त्यावेळेस प्रशासनाने यासंदर्भातील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेचा प्रस्ताव त्वरीत महासभेपूढे मंजूरीसाठी सादर करावा.

**सर्वानुमते नामंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव :- विषय क्र. ०४ :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत Mechanical Road Sweeping ६ नग खरेदी करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा परंतु याच्यामध्ये स्विपींग मशिन ६ घेतो आहे आपण, खरे अर्थाने बघितले तर नाला एस्केलेटरचीही गरज आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ३ वर्षापासुन चालु आहे भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण काय झालेले आहे. आपले अंडरग्राऊंड ड्रेनेजही कार्यान्वीत हातील.आणि त्या वेळेला सुध्दा आपल्याला मोठया प्रमाणावरती नाला एस्केलेटरची गरज पडणार आहे. तर स्विपींग मशिन ६ च्या ऐवजी ५ करुन एखादा नाला एस्केलेटर जरी मोठया प्रमाणावर घेतला पाहिजे. म्हणजे मोठया साईजचा, जो पुर्वी घ्यायचो त्याची लाईफे ऐवढी नसायची. परंतु चांगल्या दर्ज्याचा जर कधी नाला एस्केलेटर घेतला. जे भविष्यात अंडरग्राऊंड ड्रेनेजला सुध्दा कामी पडेल. अश्या पध्दतीचे ५ स्विपींग मशिन आणि १ नाला एस्केलेटर या प्रकारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ, लहान घ्या, मोठा प्रत्येक ठिकाणी जात नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, आपण दोन तीन महासभापुर्वी अशी कोणतीतरी मशिन घेण्याचा ठराव केलेला होता. त्याबद्दल काही आलेले आहे का ? मॅकॅनिकल स्विपींग मशिनच, त्यांचे काम काही निदर्शनास आलेले नाही. काय कश्या पध्दतीने त्याचे काम चालु आहे. कुठे काम चालत आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** याच्यामध्ये आपण जी मशिन खरेदी करणार आहोत त्याची आपण निविदा प्रक्रिया केलेली आहे आणि राहिला नाला एस्केलेटरच्या बाबतीतला विषय, तर दोन नाला ऐस्केलेटरसाठी आपण टेन्डर प्रक्रिया केलेली आहे. निविदा प्रक्रिया मागविलेली आहे. टेन्डर ही झालेले आहे, निविदा सादर केलेल्या आहेत. ते ओपन झाले की, त्याची टेन्डर प्रक्रिया पुर्ण होईल.

**सौ.शुचिता हाडा :-** हे मशिन आता आपल्या वापरात आल्यानंतर आपला मनुष्यबळाचा विषय कसा आणि किती प्रमाणात सुटु शकणार आहे. कारण याच्यात मला मनपाचा हिस्सा जो आहे तो खुप मोठा दिसत आहे. केंद्राचा, राज्याचा आणि सगळयात मोठा महापालिकेचा हिस्सा दिसत आहे तर खरोखर ऐवढ्या खर्चाची गरज आहे का ? याचे उपयोग कुठपर्यंत होणार आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** हे जी आपण मशिन घेणार आहोत त्यात १००% शासनाचे निधी आहे. मनपाच निधी नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा लिहलेला आहे ना डॉकेटमध्ये.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही नाही, आरोग्याचे आहे. हे ६ मशिन कोणत्या निधीतुन आहे.

सौ.शुचिता हाडा :- डॉकेटमध्ये तर दिलेले आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** म्हणुन मी तुम्हाला सांगितले.

**सौ.शुचिता हाडा :-** नाही. याच्या बाबतीत या डॉकेटमध्ये दाखविले प्रमाणे आपण जर एवढा मोठा खर्च करत आहोत. तर त्याची उपयुक्तता आणि उपयोगिता आणि त्याच्यामुळे किती मनुष्यबळ आपले वाचणार आहे. त्याची माहिती पण आपल्यासमोर आली पाहिजे.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** सन्मा.महापौर आणि सन्मा.नगरसेवक या ६ मशिनी जरी दर्शविलेले असले, तर यामध्ये ठेकेदाराने आणि राज्याने जो हिस्सा दिलेला आहे. तो आमदार फंडातुन देणार आहे. त्यानंतर मनपा फंडाचा विषय वेगळा आहे. त्यात काही तरी चुक झालेली आहे शासनाकडुन आमदार निधी देतांना केंद्राचा हिस्सा आणि प्रत्येक राज्याचा हिस्सा प्रत्येक नगरपालिकेचे किंवा महानगरपालिकेचे नियमानुसार प्रत्येकाला दिलेला आहे. याच्यात आपण जिल्हाधिकाऱ्यांना देण्यासाठी पत्र तयार केलेले आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** आता आपण जो प्रस्ताव दिलेला आहे फक्त त्याच्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा दिसत आहे.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** आता ते पैसे केवढे देतात. त्या केंद्राचा हिस्सा आणि राज्याचा हिस्सा ते दर्शवितांना थोडी चुक झालेली आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** आपला स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा किती लागणार आहे.

**मा.महापौर :-** एक मिनीट एक मिनीट.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर आणि सन्मा.सदस्य, मॅडम दोन वेगवेगळे विषय मिक्स होत आहे. एक आहे निविदा प्रसिध्दीचा तो एक विषय आहे. आणि हे जे ६ मशिन घ्यायचे आहे ते राज्य शासनाने दिलेले आहे स्वच्छ भारत अभियानांतर्गत यामध्ये केंद्र शासनाचा, राज्य शासनाचा आणि मनपाचा हिस्सा देखील नमुद केलेला आहे. पण एकुणची टोटल मारतांना त्यांनी चुक केलेली आहे. मी त्यांना बोललो डायरेक्ट ते दुरुस्ती करुन देणार आहे. आणि हे मॅनडेटरी एक्सपेंडीचर आपल्याला शासनानेच कळविलेले आहे. या व्यतिरीक्त नालेसफाईचे जे मशिनरी लागतील त्या आपण याच्यातुन प्रपोज करू आणि हे ६ मशिनी सुध्दा, अजुन ही आपल्याला जर नाला एस्केलेटर घ्यायचे आहे तर आपण MC फंडातुन प्रपोझड करु . किंवा JMC फंडातुन आपला ४ नाला एस्केलेटरचा ठराव सुध्दा झालेला आहे. परंतु हे शासनाकडुन आलेला आहे, तो बंधनकारक आहे.

**ॲड.दिलीप पोकळे :-** मॅडम, ते मनुष्यबळावर काय फरक पडेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, नाही, काय झालेले आहे. हा निधी शासनाने दिलेला आहे. आणि तो खर्च करणे आपल्याला बंधनकारक आहे. त्याला मनुष्यबळ लागेल नाही लागेल.

**ॲड.दिलीप पोकळे :-** स्विपींग मशिनवरच खर्च करायचे आहे फक्त शासनाचे असे स्पष्ट आदेश आहे का ? म्हणजे ही मशिन घेणे. आपण साफसफाईवर ७५ कोटी खर्च करतो आहे. वॉटरग्रेसचा आपला ठेका चालु आहे. आपण आपले ४०० कामगारांना सुध्दा पगार देतो आहे. आता नविन प्रस्ताव शासनाने जो बनवुन दिलेला आहेआपल्याला ते नविन स्विपींग मशिनची आपल्याला आवश्यकता आहे का ? मग आपण यावर खर्च का करत आहेत

**श्री.नितीन लढ्ढा :-** वकील साहेब, हा निधी शासनाने तुम्हाला दिलेला आहे, तुम्ही हा निधी नाकारला तर तो निधी शासन परत घेईल. आपले म्हणणे काय आहे, आता समजा वॉटरग्रेसचा हा कॉन्ट्रॅक्ट असेल. हा पुढच्या ४-६ महिन्यामध्ये संपुन जाईल. परंतु त्याच्यानंतर सेल्फ डिपेंड होण्याच्या दृष्टीकोणातुन मॉडर्नाईजेशनच्या दृष्टीकोणातुन मोठी कोणतीही मंजुरी आपली लागत नाही. नाही नाही ज्या वेळेला या मशिनरी येतील. तर आपोआप पुढचे जो काही टेन्डर असेल किंवा कामगार संख्या असतील. त्याच्यावरचा धोरण ठरविता येईल ना.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आपण ८५ गाडया घेतल्या, ८५ गाडया माणुस ८५ ठिकाणी घेऊन फिरतात. आपल्याकडुन मशिनरी सांभाळल्या जात नाही. आपण त्यांची देखभाल करु शकत नाही. शासन तुम्हाला वारंवार पैसे देईल. आपण घेणार त्याचा व्यवस्थीत मेनटेनन्स ठेवणार नाही. आणि एक दिवस शासन आपल्या महापालिकेला ब्लॅकलिस्ट करुन टाकेल, १ रुपयापण भेटणार नाही. आपली पात्रता आहे का खर्च करायची. पुढे भरपुर विषय आहेत.

शासनाने आपल्याला दिले आहे आणि आपण त्याला घेतले आहे. पण नंतर आपण त्याला सांभाळले का ? हा पण महत्वाचा विषय आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** म्हणजे ५ स्विपींग मशिन आणि १ नाला एसकेलेटर.

**मा.आयुक्त :-** नाही, नाही, प्रस्ताव जसा आला तसा मान्य.

**मा.महापौर :-** जसाचा तसा मान्य.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचे CSWAP मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर मंजूर CSWAP मधील Mechanical Road Sweeping या घटकांसाठी जळगांव शहर महानगरपालिकेला खालील प्रमाणे निधी प्राप्त होणार आहे.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव | मंजूर वाहनांची संख्या | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जळगांव शहर महानगरपालिका जळगांव | ६ | १०,८९,०००/- | १,२२,१०,०००/- | ९९,००,०००/- | २,३१,९९,०००/- |

वरील प्रमाणे Mechanical Road Sweeping ६ नग घेण्यासाठी केंद्र व राज्य हिस्सा प्राप्त होणार असून त्यामध्ये जळगांव महानगरपालिकेने हिस्सा टाकणे कामी शासन निर्णय क्रं.एफएफसी २०२०/प्र.क्र.५६/ नवि-४ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८ ऑक्टोंबर २०२० मधील ब) मुलभुत अनुदान / अबंधनकारक अनुदान Basic Grants / Untied Grants :- १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त मुलभूत अनुदान / अबंधनकारक अनुदान (Basic Grants / Untied Grants) महानगरपालिकांच्या बाबतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ मध्ये नमूद केलेल्या आवश्यक कर्तव्यांकरिता व नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या बाबतीत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ४९ (२) मध्ये नमुद केलेल्या आवश्यक कर्तव्यांकरिता खर्च करणे अपेक्षीत आहे.

तथापि १. केंद्र व राज्य योजनांतर्गत मंजूर पायाभूत सुविधा प्रकल्पावरील लोकवर्गणी म.न.पा. / न.पा.चा हिस्सा व असे प्रकल्प पुर्ण करण्याकामी आवश्यक ठरणारा अतिरिक्त खर्च. (जर प्रकल्प मान्यतेच्या प्रक्रियेत असेल तर अशा प्रकल्पाच्या बाबतीत लोकवर्गणीच्या हिश्याची रक्कम राखून ठेवता येईल.) असे नमुद आहे. अथवा म.न.पा.फंडातून रक्कम रु.९९,००,०००/- खर्च करता येईल. तरी Mechanical Road Sweeping ६ नग खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०५ :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी All India Institute Of Local Self Government या संस्थेची नियुक्ती करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यास काही हरकत नाही. प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. पण यामध्ये काही अंशुदानाबद्दल सुचवायचे आहे. आयुक्त महोदया, डॉकेट मध्ये येथे लिहीलेले आहे. याच्या अगेंन्स त्यांना जे पेमेंट आपण अदा करणार आहोत. तर त्या मध्ये प्रोजेक्ट रिपोर्ट झाल्यानंतर आपण त्यांना ४०% रक्कम अदा करणार आहोत. बरोबर आणि मिड प्रोसेस मॅनेजमेंटनंतर माईलस्टोन-२ जे म्हटलेले आहे, त्यानंतर आपण १०% अदा करणार आहोत. आता या विषयाबद्दल काही सांगायचे म्हणजे, आपण आपला अमृत २.० चा जो विषय केला होता सेम विषय होणार आहे. शासनाने नामिका सुची दिलेली होती १६ संस्थांची, त्यापैकी वर्गवारी दिलेली होती. त्यापैकी एका संस्थेला आपण एकाचे नाव देऊ शकत होते. पण त्यावेळेला प्रशासनाने वेगळेच शहानपण वापरले, त्यानंतर त्यांच्याकडुन दर मागविण्यात आले. आणि मग एल-१, एल-२ चे खोड घालण्यात आले आणि ते प्रकरण तसेच पडलेले आहे. या वेळेला प्रशासनाचे अभिनंदन करेल मी की, प्रशासनाने प्रशासकीय अधिकार वापरले, एक प्रॉपर डॉकेट तयार करुन आमच्याकडे पाठविले. आरोग्य विभागात ज्यांनी चाांगले काम केलेले आहे. तीन ज्या संस्था दिलेल्या आहे नामीका सुचीनुसार त्यानुसार कोणती संस्था खरोखर पात्र आहे. हे प्रशासनाने ठरविले अभ्यास करुन ठरविले, त्याचे विविचन येथे दिले.हीच बुध्दी खरं तर प्रशासनाला अमृत २.० च्या वेळी सुध्दा व्हायला हवी होती. पण ते शहराचे दुरदैव आहे. आमचे लोकप्रतिनिधींचे दुरदैव आहे. जे अत्यंत महत्वाचे विषय असतात त्याचा आपल्याला खोड काढण्याची परंपरा आहे. असो. याच्यामध्ये महापौरताई, आपण त्यांना अदायगी करणार आहोत आपण त्यांनी केलेल्या कामाच्या अगेंस्ट त्यामध्ये अंशुता बदल असा सुचवायचा आहे की, आपल्याकडची एकंदर प्रणाली बघता, आपल्याकडचे कामे थोडे लांबताच. मग काय होत की, जी कोणती संस्था हे काम करत आहे. त्यांचा एक एका पॉईंट नंतरचा इंट्रेस्ट संपत जातो किंवा त्यांची लायबीलिटी सुध्दा कमी कमी होत जाते. तर आपण माईलस्टोन १.० जो देतो आहे. डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट त्या नंतर आपण त्यांना ४०% अदा करतो आहे. तर त्या ४०% च्या ऐवजी आपण १०% अदा करावे. जे माईलस्टोन २.० ला आपण अदायगी करणार आहोत.Transaction fee process management. त्याला जे आपण १०% रक्कम अदा करणार आहोत. त्यावेळेला ४०% रक्कम अदा करावी.जेणे करुन त्या संस्थेकडुन आपल्याला सहकार्य जास्त काळासाठी चांगल्या पध्दतीने मिळु शकेल. तर हा अंशुता बदल ठरावा मध्ये करावा. बाकी प्रस्तावाच्या मंजुरीला कोणतीही हरकत नाही. नितीनभाऊ माईलस्टोन १.० ला आपण ४०% देतो आहे तर माईलस्टोन १.० ला आपण १०% अदायगी करु या. आणि माईलस्टोन २.० ला आपण ४०% अदायगी करु या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय होईल ताई. आपण जे बोललात ते योग्य आहे. त्याचा इंट्रेस्ट कमी होत जातो आणि नंतर कामाकडे दुर्लक्ष होत जाते. परंतु आपण केव्हाही जर कधी कामाच्या प्रगतीमध्ये योग्य ती सुधारणा दिसली नाही. तर बँक गॅरंटी ही कॅश करु शकते. म्हणुन आपण बँक गॅरटी घेत आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** मला वाटते ही सुचना अंतरभुत करुन घेणेस हरकत नसावी नितीनभाऊ, कारण आपण जी शासनाने ठरवुन दिलेली फि आहे ती आपण त्यांना देणारच आहोत. फक्त आकडा बदलवतो आहे की, फेज-१ ला आपण १०% देऊ या आणि फेज-२ ला आपण ४०% देऊ या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मॅडमांचे म्हणणे काय आहे की, या संदर्भात सर्व गाईडलाईन्स शासनानेच ठरवुन दिलेले आहे. म्हणजे याच्यात आपल्याला फक्त धोरणात्मक निर्णय काय घ्यायचा आहे. या ३ एजन्सी पैकी १ एजन्सी निवडण्याची आपल्याला मुबा आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** एजन्सी निवडीचा काम या वेळेला प्रशासनाने उत्तम केलेला आहे. त्या बद्दल आपण प्रशासनाचे अभिनंदन सुध्दा करु या की, प्रशासनाने चांगली एजन्सी, रेप्युटेड एजन्सी आणली आहे. माझ्या माहिती प्रमाणे या एजन्सीचे जे डायरेक्ट आहे ते आपले माजी आयुक्त जीवन सोनवणे साहेब आहे. उत्तम दर्ज्याचे काम आपल्याला त्यांच्याकडुन मिळणार आहे. पण माझी विनंती ही आहे की, आपल्याकडच्या दर्ज्याची जी घसरण असते. भविष्यात, आरोग्यधिकारी म्हणुन आज आपले उदय बापु काम बघत आहे. उत्तम काम बघत आहे. पण परत आपल्या येथे

ट्रान्सफर झाल्यानंतर आपल्याकडुन जो डिले होतो. आपल्याकडे दर वेळेचे आहे नितीनभाऊ, आपल्याकडुन डिले होतो आपल्याकडुन रिपोर्टस दिल्या जात नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी तुमच्या मताशी सहमत आहे. त्याच्या बद्दल वाद नाही आपल्याला.आणि आपण याच्या विपरीत काही डायरेक्शन दिले. तर पुन्हा असे त्या प्रकरणात डिले होईल त्यामध्ये. तुमच्या सुचना अत्यंत योग्य आहे. फक्त सुचना अश्या करुन घ्या. जर कामामध्ये कुठेही दिरंगाई झाली.तर पुढचे पेमेंटचे टप्पे हे रोखण्यात यावे.

**सौ.शुचिता हाडा :-** या ठरावापासुन २ वर्ष म्हणजे २४ महिने एजन्सीची नियुक्ती आहे. भिती फक्त आपला इतिहास बघता अशी आहे की, दोन वर्षात जर झाले नाही. तर काय ? यासाठीच्या आपल्याला काही प्रोव्हिजन करुन ठेवाव्या लागतील की, त्या एजन्सीने नंतर हात वर करायला नको की, आमची मुदत संपली आमचा कार्यकाळ संपला, आणि तुमच्याकडुनच आम्हाला कॉपरेशन मिळाले नाही म्हणुन ते काम रखडले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ही एक सुचना त्याच्यात देण्यात यावी की, काही कारणाने आपली चुक नसतांना जर कधी लांबत असेल, तर बँक गॅरंटी इनकॅश करण्याचे संदर्भात तश्या सुचना नमुद करुन घेवु.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत विकास विभाग, शासन परिपत्रक स्वमअ/नावि-३४ दि.१४ फेब्रुवारी २०२३ अन्वये सदर अभियान दि.०२ ऑक्टोंबर २०२१ ते दि.०१ ऑक्टोंबर २०२६ पर्यंत राबविले जाणार आहे. त्याअनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत सर्व मंजूर प्रकल्पासाठी घनकचरा प्रकल्प विहित कालमर्यादेत पुर्ण करणे क्रमप्राप्त असून परिपत्रकातील अ.क्र.३ नुसार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प-स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे कामी प्रकल्प सल्लागार म्हणून कामकाज करणेसाठी शासन परिपत्रकातील परिशिष्ट-१ मधील नाशिक विभागातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर नामिकासूचीतील खालील ०३ संस्थाकडून घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन घेणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

१. Mitcon consultancy and Engineering services ltd, Pune
२. MaRS Planning And Engineering Services pvt. Ltd, Gujrat.
३. All India Institute Of Local Self Government

वरील तिनही कंपन्यांनी जळगांव शहर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापनाचा सवस्तिर प्रकल्प अहवाल तयार करुन देण्यास निविदा प्रक्रिया राबविण्यास व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे.

नामसूचीकेतील वरील ०३ संस्थेचा विचार करता All India Institute Of Local Self Government या संस्थेचा खालील बाबींचा अनुभव आहे.

- शासन निर्णय क्रं.घकव्य २०११/प्र.क्र.४६७/पापु २२ दि.०३ सप्टेंबर २०११ मंत्रालय, मुंबई-३२ अन्वये अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था येथे कचरा व्यवस्थापन व संशोधन केंद्राची स्थापना या केंद्राच्या संनियंत्रण समितीचे प्रमुख मुख्य सचिव आहेत.
- केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे विविध कार्यक्रम, प्रशिक्षण, प्रोजेक्ट्स राबविण्याचे काम गेल्या ९६ वर्षापासून करित आहे.
- Ministry of urban development, central govt has empanelled AIILSG for providing technical support to states/ULBs for solid waste management.
- SBM २ मध्ये महाराष्ट्र शासनाने AIILSG ला SWM DPR बनविण्यासाठी empanel केले आहे.

- महाराष्ट्र शासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत २०१५ ला नागपुर विभागाचे एस.डब्ल्यु.एम. व डी.पी.आर बनविण्याची काम दिलेले आहे.
- सदर संस्थेकडे अनुभवी व कार्यकुशल तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध आहे.

वरील बाबींचा विचार करता आयुक्त यांचे दालनात मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाधिकारी व सहा.आयुक्त (आरोग्य) यांचेशी एकत्रीत झालेल्या चर्चेअंती म.न.पा.घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर) तयार करणे, त्यासंबंधीची निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार इत्यादी कामकाज करणेसाठी All India Institute Of Local Self Government यांची नियुक्ती करणेस आयुक्त यांनी मा.महासभेपुढे प्रस्ताव सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत विकास विभाग, शासन परिपत्रक स्वमअ/नावि-३४ दि.१४ फेब्रुवारी २०२३ अन्वये सदर सविस्तर प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राधिकृत करण्यात येत असून त्या करिता प्रकल्प किंमतीच्या १% तांत्रिक मंजूरी शुल्क महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करावे. तसेच सदर १% तांत्रिक मंजूरी शुल्काचा रक्कमेचा प्रकल्प किंमतीमध्ये समावेश करावा असे निर्देश दिलेले आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ भारत मिशन यांचेकडील एम.यु.डी.एम.एस./ एसएमएम/१४१०/ दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या पत्रात खालील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

अ.क्र.३ नुसार एजन्सीची नियुक्ती ही करारनामा झाल्यापासून २ वर्ष (२४ महिने) कालावधीसाठी राहिल.

अ.क्र.४ नुसार करारावर स्वाक्षरी करतांना कराराच्या मुल्याच्या ३% दराने अतिरिक्त बँक हमी नियुक्त एजन्सीकडून करुन घेणे आवश्यक आहे.

अ.क्र.५ नुसार करारनाम्यावर स्वाक्षरी केल्यानंतर करार मुल्याच्या ३% अतिरिक्त कार्यप्रदर्शन बँक हमी ७ दिवसांत भरणा करणे आवश्यक आहे.

अ.क्र.६ नुसार नियुक्त एजन्सीने विमा ५० लाखापेक्षा कमी नसलेल्या रकमेचे व्यवसायीक नुकसान भरपाई विमा संरक्षण राखलेबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ भारत मिशन यांचेकडील एम.यु.डी.एम.एस./ एसएमएम/१४१०/ दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या पत्रासोबतच्या परिशिष्टात खालील प्रमाणे नमुद आहे.

Annexure C-Information Urban Local Bodies in Maharashtra.

| Division | ULB Code | ULB Name | District | Category | Census Population of २०११ | Estimated Project Cost (in Cr) |
|---|---|---|---|---|---|---|
| Nsashik | ८०२६५३ | Jalgaon Municipal Corporation | Jalgaon | A | ४६० २२८ | २८.१९ |

Annexure A-Division Wise consultancy fees of empaneled firms.

Nashik Division-

| Estimated Cost of the Project INR in Cr | Consulting Fees in % of Project Cost | Sedrvice Component Wise Breakup of Consulting Fees (%) | | |
|---|---|---|---|---|
| | | Milestone १- Detailed Project Report | Milestone २- Transaction Advisory including Bid Process Management | Milestone ३- Supervision and Monitoring during Implementation (१२ Months) |
| (A) | (B) | C=४०% x (B) | D=१०%x(B) | E=५०%x(B) |
| ३० | २.५०% | १.००% | ०.२५% | १.२५% |

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी Annexure C मध्ये जळगांव महानगरपालिकेचे डी.पी.आर. Estimated Project Cost २८.१९ कोटी दर्शविलेली असून Annexure A नुसार Consulting Fees in % of

Project Cost २.५०% नमुद केलेली असून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी All India Institute Of Local Self Government या संस्थेची नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०६ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतूदीनूसार सन २०२३-२४ करीता मालमत्ता कराचा (खुला भुखंड करासह) व पाणीपट्टी कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना १० टक्के सुट अनुज्ञेय करणे व तसेच महीलांचे नांवे असलेल्या निवासी मिळकतीस मालमत्ता करात (राज्य शासनाने कर वगळून) अतिरिक्त ५ टक्के सुट देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, याच संदर्भात महिलेचे नावावर मालमत्ता असेल, आपल्या देशाचे सेनेमध्ये जवान सुरक्षा जे करत आहे. त्यांच्यासाठी आपण काही सवलत देतो.एखाद्या कुटुंबामध्ये एक अपत्य मुल आहे. दोन मुली असतील. तर त्या कुटुंबाला सुध्दा आपण मालमत्ता करात सुट देतो. असे ज्या ज्या विविध सुट देत आहोत. त्या नागरीकांना माहिती झाल्या पाहिजे. त्याच्यासाठी प्रत्येक प्रभाग समितीमध्ये त्या कार्यालयात बोर्ड असायला पाहिजे. जेणे करून नागरीकांना त्याचा लाभ घेता येईल. आता कालचाच विषय आहे. खुला भुखंड जो आहे त्याच्यावरती आपण सुट देतो आहे. परंतु आपल्या प्रभाग समितीच्या कर्मचाऱ्यांना सुध्दा माहिती नाही की, खुला भुखंडावर सुट देण्यात येत आहे. ते इकडे चौकशी करतात. माहिती नाही. आम्ही त्यांना सुचना करतात की, असे झालेले आहे. आपण ठराव केलेले आहे. आजही सुध्दा विषयपत्रिकेवर विषय घेतलेला आहे. तर तेव्हा त्या नागरीकाला ती सुट मिळाली. कालच्या दिवसाच्या आधी पर्यंतच्या बऱ्याच नागरीकांना ती सुट दिली गेली. तर नागरीकांना त्याचे ज्ञान मिळावे माहिती व्हावी. त्याच्या साठी आपण प्रत्येक ठिकाणी बोर्ड लावावे. अशी माझी विनंती आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतुदीनुसार " मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलांत विनिर्दीष्ट केलेल्या दिनांकापुर्वी भरत असेल किंवा असा कर संपुर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाव्दारे निर्धारित करील अश्या दराने मालमत्ताकर भरण्यातुन सुट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळया वर्गाकरिता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील. " असे नमूद केले गेले आहेत.

त्या अनुषंगाने कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकत धारकांना मालमत्ता कर (खुला भुखंड करासह) व पाणीपट्टी कराचा भरणा केल्यास १०% (रिबेट) अनुज्ञेय करण्यासंदर्भात तसेच सदर अधिनियमातील तरतूदीनुसार महिलांच्या नांवे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस मालमत्ता करात (राज्य शासनाचे कर वगळून) अतिरिक्त ५% सुट अटी-शर्तीच्या अधिन राहून देणेबाबत मा.महापौर यांनी पत्र देऊन मागणी केलेली असून त्यातील बाबी पुढील प्रमाणे :-

१) महासभा ठराव क्र.८१० दि.३०/०५/२०२२ अन्वये सन २०२२-२३ करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतूदी नुसार मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकत धारकांना मालमत्ता कराचा (खुला भुखंड करासह) व पाणीपट्टी कराचा भरणा करणेसाठी १०% सुट देण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. त्यानुसार यावर्षी सन २०२३-२४ या आर्थीक वर्षा करीता सुध्दा मालमत्ता कराचा (खुला भुखंड करासह) व पाणी पट्टी कराचा भरणा करणेसाठी १०% सुट देण्यात यावी.

२) तसेच "देशात महिला सबलीकरणासाठी तसेच त्यांना समान हक्क/ संधी उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्रशासन व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाव्दारे विविध योजना जसे मोफत शिक्षण, मातृवंदना, उज्वला गॅस कनेक्शन इत्यादी" बाबत विविध योजना राबविण्यात येत असून जळगांव शहर महानगरपालिकेकडून देखील यापूर्वी महासभा ठराव क्र.८११ दि.३०/०५/२०२२ अन्वये महिलांच्या नावे असलेल्या निवासी मिळकतीस मालमत्ता करात राज्य शासनाचे कर वगळून अतिरिक्त ५ टक्के सुट अटी व शर्तीस अधिन राहून मान्यता प्रदान केलेली आहे.

त्याचप्रमाणे यावर्षी सुध्दा सन २०२३-२४ या आर्थीक वर्षा करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतूदीनुसार महीलांच्या नांवे असलेल्या फक्त एका राहत्या निवासी मिळकतीस मालमत्ता करात (राज्य शासनाचे कर वगळून) अतिरिक्त ५% सुट खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात यावी.

अटी व शर्ती :-

१. महिलांच्या नावे असलेल्या मिळकती की ज्या सदर महिलेच्या राहत्या व निवासी आहेत.
२. भाडयाने दिलेल्या मिळकतीस तसेच अनिवासी वापराच्या मिळकतीस सदर सुट लागु राहणार नाही.
३. सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारची थकबाकी असता कामा नये.
४. शहरातील कोणत्याही फक्त एकाच मिळकतीवर सदर सुट देय राहील.
५. सदर मिळकतीचे मालकी हक्काचे कायदेशीर कागदपत्रे महानगरपालिकेकडेस सादर केल्यानंतर सदर सुट देय राहील.
६. सदर मिळकत ही केवळ महिलेच्या नांवे असावी ती संयुक्त रित्या पुरुष व महिला यांचे नांवे नसावी.
७. सदरची सुट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ नुसार दिल्या जाणारा १० टक्के सुट ज्या कालावधीत असेल त्याच कालावधीमध्ये देण्यात यावी.

वरील अटी शर्तींची पूर्तता करीत असल्याबाबतचा अर्ज, स्वयंघोषणापत्र व कागदपत्रे घेऊन सदरची सुट देण्यात यावी.

तसेच यापूर्वी स्थायी समिती ठराव क्र.४३४ दि.२८/०४/२०१६ अन्वये आयुक्त यांचे खालील नमुद केलेल्या बाबींच्या प्रस्तावास मान्यता प्रदान केलेली असून त्याबाबींना मा.महासभा ठराव क्र.८१० दि.३०/०५/२०२२ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्या मंजूर बाबी खालीलप्रमाणे,

१. मालमत्ताकर कराचा संपूर्ण वर्षाकरीता दि.३० एप्रिल पर्यंत पूर्ण भरणा केल्यास १०% रिबेट
२. ३१ जूलै पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना ७% रिबेट
३. १ ऑगस्ट ते ३१ आक्टोंबर पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना ५% रिबेट
४. १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना ३% रिबेट देण्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे.

मात्र सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी काही करदात्यांनी ३१ मार्च २०२३ या आर्थीक वर्षाचे शेवटच्या तारखेचे चेक दिलेले असल्याने सदरचे चेक अर्थ विभागामार्फत बँकेत वटण्यासाठी पाठविण्यात आल्यानंतर एप्रिल महिन्यात बँकेस/ शासकिय कार्यालयास शासकिय सुटया जास्त प्रमाणात असल्याने मिळकत धारकांनी दिलेले चेक वटण्यास विलंब झालेला असल्यामुळे दि.११/०४/२०२३ पावेतो

मालमत्ता कराचा सन २०२३-२४ करीताचा भरणा स्विकृती प्रशासनास करता आलेली नाही. त्यामुळे मिळकत धारकांना मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या नागरीकांना १०% सुटीची सवलत देण्यास विलंब झालेला असल्यामुळे स्थायी समिती ठराव क्र.४३४ दि.२८/०४/२०१६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या मान्यतेनुसार १०% सुट (रिबेट) मुदतीत देता आलेली नाही.

त्या कारणास्तव सदर स्थायी समितीच्या ठरावानुसार आयुक्त यांचे खालील नमुद केलेल्या बाबींच्या अंशत: बदल करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सदर बाबींमध्ये पुढील प्रमाणे अंशत: बदल करण्यात यावा असे प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ कार्यालयाचे मत आहे.

१. मालमत्ताकर कराचा संपूर्ण वर्षाकरीता दि.३१ मे पर्यंत पूर्ण भरणा केल्यास (शासनाचे कर वगळून) १०% रिबेट
२. ३१ जूलै पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना (शासनाचे कर वगळून) ७% रिबेट
३. मागणी देयक प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत संपूर्ण कराचा मालमत्ताकराचा भरणा केल्यास चालू वर्षाच्या करात (शासनाचे कर वगळून) मिळकतधारकांना ५% रिबेट
४. ३१ डिसेंबर पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना (शासनाचे कर वगळून) ३% रिबेट

मा.महापौर यांचे पत्रातील मागणीतील बाबींच्या अनुषंगाने

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतूदीनूसार सन २०२३-२४ करीता मालमत्ता कराचा (खुला भुखंड करासह) व पाणीपट्टी कराचा आगाऊ भरणा (शासनाचे कर वगळून) करणाऱ्या मिळकतधारकांना १० टक्के सुट (रिबेट) अनुज्ञेय करणेस व तसेच महीलांचे नांवे असलेल्या निवासी मिळकतीस मालमत्ता करात (राज्य शासनाने कर वगळून) अतिरिक्त ५ टक्के सुट इ.वरील नमूद सुट देणे बाबतची अंमलबजावणी करणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच मालमत्ता कराचा (खुला भुखंड करासह) व पाणीपट्टी कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना १० टक्के सुट अनुज्ञेय करणे व तसेच महीलांचे नांवे असलेल्या निवासी मिळकतीस मालमत्ता करात (राज्य शासनाने कर वगळून) अतिरिक्त ५ टक्के सुट देणेबाबत तसेच माजी सैनिक यांना देण्यात येणाऱ्या सूट संदर्भात नागरीकांना माहिती होणेसाठी प्रशासनाने प्रभाग समिती क्रं.०१ ते ०४ चे कार्यालयाचे दर्शनीय भागात उपरोक्त सूट बाबत माहिती फलक लावावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०७ :-** जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीत जाहिरात बॅनर प्रदर्शीत करणेकामी आकारण्यात येणारी परवाना फी मध्ये बदल करण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रस्त्यावर असलेले बॅनर होर्डींग याच्यावर रु.७००/- दर आकारलेले आहे. आणि बॅनर होर्डींगसाठी रु.५००/- तर दोघांचे समसमान रु.५००/- करण्यात यावे. एवढी विनंती आहे कारण आपल्याशी झालेली चर्चा व प्रशासनासोबत तसेच व्यावसायीकाच्या चर्चेमध्ये ते रु.५००/-ठरले होते. त्यात रेटच्या संदर्भात रु.७००/- नमुद केलेले आहे. तर ते समसमान रु.५००/- करण्यात यावे ही विनंती.

**श्री.अनंत जोशी :-** आयुक्त मॅडम यात एक विचारायचे होते. यात आपण दिलेले आहे ३ दिवसासाठी, चाटे साहेब ३ दिवसासाठी आपण देत आहोत. ३ दिवसानंतर परत रिनियु करावी लागेल का ती ? आपल्याला परवानगी जी मिळणार आहे ती ३ दिवसाची असणार का ?

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** ही जी परवानगी आहे रु.५०/- प्रति दिवसाची आहे. ही जी आहे ती परमनेंट आहे. आणि राजकीय पक्षांचे नेत्यांचे होर्डींग बॅनर, धार्मिक कार्यक्रम याच्यासाठी आहे.

**श्री.अनंत जोशी :-** याच्यात आपण ३ दिवसाची मुदत दिली. ३ दिवसानंतर परत रिन्युअल करुन घ्यावे लागेल.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** जनरली ३ दिवसाचीच राहते भाऊ.

**श्री.अनंत जोशी :-** नाही नाही, आता विषय असा आहे. क्लासेस असतात. क्लासेसचे महिना महिनाभर बॅनर असतात. तुम्ही म्हणत आहात राजकीय नेत्यांचे. त्याच्यामध्ये आपण ३ दिवस नमुद केलेले आहे म्हणुन सांगतो आहे मी.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** तो जो विषय आहे ना, हा त्या गाईडलाईन मधील नियम क्र.१९ तात्पुरती परवानगी, ती ३ दिवसाची आहे. आणि वर्ग जे आहे ते नियम क्र.२० मधील आहे. ती महिन्याभरासाठी आहे. ती प्रती महिना पण करु शकतात वर्षाला ही करु शकतात.

**श्री.अनंत जोशी :-** म्हणजे ३ दिवसाचाच कालावधी नाही असे मला वाटते, ३ दिवसाचेच कालावाधी मध्ये आहे. महिन्याची ही करु शकतात ते.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- महिन्याची ही करु शकतो आपण.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, याच्यात जे म्हटलेले आहे. ईलेक्ट्रीक प्रकाश असलेले बॅनर व ईलेक्ट्रॉनिक डिस्पले असलेले बॅनर. मागे अश्या काही सुचना दिलेल्या होत्या. दवाखाने ज्यांचे आहे डॉक्टर्सचे. त्यांच्या दवाखान्यांवर त्यांचा नाव असलेला जो बोर्ड असतो. त्याच्या अगेन्स्ट आपल्याकडुन त्याची कर वसुली करण्यात आलेली होती. तर ते सुध्दा याच्यामध्ये अंतरभुत आहे का आणि कसे ? कारण त्या बद्दल डॉक्टर्सच्या खुप मोठया प्रमाणावर तक्रारी आल्या होत्या की, आमचीच मिळकत त्याच मिळकतीवर आम्ही दवाखाना टाकलेला आहे. त्याच्या अगेन्स्ट जे काही कर वसुली आहे तो आम्ही देतच आहोत. आणि आमचा साईनबोर्ड जो आम्ही लावलेला आहे. त्याच्या अगेन्स्ट तुम्ही कर वसुली करत आहे. तर हे असे येथे पुन्हा अंतरभुत केलेले आहे का ?

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** त्यांना स्वत:च्या व्यवसायाची, जेथे ते व्यवसाय करत आहे त्याच जागी जाहिरात करायला प्रतिबंध नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** जर त्यानी भाड्याने घेतलेली आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** तो स्वत: व्यवसाय करत आहे, भाड्याने जरी घेतले तरी तेथे त्याचा दवाखाना आहे तर तो दवाखान्याचे बोर्ड लावु शकतो.

**सौ.शुचिता हाडा :-** त्याच्यासाठी ही कर वसुली होणार नाही. एखादी कोचिंग क्लासेस सुरु आहे. त्यांच्या बिल्डींगवर त्यांनी बोर्ड लावला तर त्याची कर वसुली होणार नाही.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** त्यांना त्यांच्या मिळकतीत बोर्ड लावायला हरकत नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** मागे ही सुचना घडलेली आहे म्हणुन ही सुचना दिलेली आहे की, असे पुन्हा होऊ नये. याची दक्षता प्रशासनाने घ्यावी.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य नितीनभाऊ यांनी केलेल्या सुचनेनुसार बदल प्रशासनाने करावा आणि विषय क्र.०७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढीबाबत प्रस्ताव पुढील प्रमाणे, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीत खाजगी मिळकतींवर जाहिरात बॅनर लावण्यात येतात सदर जाहिरातदारांकडून महासभा ठराव क्रमांक ७६६ दि.२४/०३/२०२२ अन्वये खाजगी जागेवरील बॅनर / होर्डीग परवाना फी रु.२.५० प्रति चौ.फुट प्रति महिना याप्रमाणे आकारणी बाबत निर्णय घेण्यात आलेला होता, परंतु जाहिरात कर हा जी.एस.टी. करांमध्ये समाविष्ठ झाल्याने, काही जाहिरातदारांकडून महानगरपालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या जाहिरात परवाना शुल्क / करांबाबत

मा.जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली आहे. दरम्यान महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात बॅनर / होर्डींग प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करण्याच्या हेतुने महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे दिनांक ०९ मे २०२२ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शीत करण्याचे नियम व नियंत्रण नियम-२०२२ प्रसिध्द केलेले आहे. सदर नियमावली मध्ये परवाना शुल्क हे, परवाना जारी करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या वाजवी मर्यादेपेक्षा जास्त नसावे असे नमुद आहे. त्यामुळे महासभा ठराव क्रमांक ७६६ दि.२४/०३/२०२२ अन्वये खजगी जागेवरील बॅनर / होर्डींग परवाना फी करिता निश्चित केलेल्या धोरणात बदल करणे आवश्यक आहे.

जाहिरात बॅनर / होर्डिंग्ज प्रदर्शीत करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात खालील प्रमाणे तरतूदी दिलेल्या आहेत.

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २४४– कोणत्याही व्यक्तीस आयुक्ताच्या लेखी परवानगी शिवाय कोणतेही आकाश चिन्हे, जाहिरात, बॅनर व फलक उभारता, लावता येणार नाही.
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६(१) - जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रयोजनासाठी लायसन्स किंवा लेखी परवानगी देता येईल अशी या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार तरतूद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा अशा लायसन्स किंवा लेखी परवानगीत, ज्या कालावधीसाठी आणि निर्बंधाच्या व शर्तीच्या अधिन ते देण्यात आले आहे तो कालावधी आणि ते निर्बंध व त्या शर्ती, आणि त्याच्या नवीकरणासाठी अर्ज करता येईल ती तारीख विनिर्दिष्ट केली पाहीजे आणि असे लायसन्स किंवा लेखी परवानगी आयुक्ताच्या किंवा ते देण्यास आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याच्या सही ने दिले पाहिजे.
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६(२) -- या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार अन्यथा तरतूद करण्यात येईल त्याव्यतिरीक्त, अश्या प्रत्येक लायसन्स किंवा लेखी परवानगीसाठी आयुक्त महानगरपालिकेच्या मंजूरीने वेळोवेळी ठरविल अश्या दराने फी आकारता येईल.
- तसेच महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे दिनांक ०९ मे २०२२ चे राजपत्र, महाराष्ट्र महानगरपालिका आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शीत करण्याचे नियम व नियंत्रण नियम-२०२२ यामध्ये आकाश चिन्हे, बॅनर/होर्डिंग्ज प्रदर्शीत करणे बाबत सविस्तर नियमावली दिलेली आहे.

सदर नियमावलीतील नियम क्रं.२० मध्ये परवाना शुल्क जारी करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या वाजवी मर्यादेपेक्षा, परवाना शुल्क जास्त नसावे असे नमुद आहे.

त्यानुसार खाजगी जागा / मिळकतीवर प्रदर्शित करण्यात येणाऱ्या जाहिरात बॅनर / होर्डींग करीता परवाना फी खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार निश्चित करणे योग्य हाईल असे मत आहे.

| अ.क्र. | जाहिरात / आकाश चिन्हाचा तपशील | परवाना फी प्रति महिना | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बॅनर / होर्डिंग्ज | ५००/- | परंतु एक महिन्यापेक्षा कमी कालावधी करिता परवाना फी हि रु.५०/- प्रति दिवसानुसार |
| २ | इलेक्ट्रीक प्रकाश व्यवस्था असलेले बॅनर / होर्डींग | ५००/- | परंतु कोणत्याही खाजगी जागेवरिल इलेक्ट्रीक प्रकाश व्यवस्था असलेले बॅनरची एक महिन्यापेक्षा कमी कालावधी करिता परवाना फि ही रु.७०/- प्रति दिवसानुसार राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले | १०००/- | परंतु कोणत्याही खाजगी जागेवरिल इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बॅनरची एक महिन्यापेक्षा कमी कालावधी करिता परवाना फी हि रु.१००/- प्रति दिवसानुसार |

तसेच सदर नियमावलीतील नियम क्रं.१९ मध्ये महानगरपालिकेने विनिर्दिष्ट केलेल्या जागांवर तात्पूरती जाहिरात जसे की, फलक, कमानी, पथनाटयप्रदर्शन, इमारत वेष्टने, जाहीरात फुगे इत्यादी तीन दिवसापेक्षा अधिक होणार नाही येवढया अवधी करिता परवानगी देता येईल. त्यानुसार तात्पुरत्या स्वरुपात जाहिरात प्रदर्शित करण्याकरिताची परवाना फी हि रु.५०/- प्रतिदिवस (रु.१५०/- तीन दिवसाकरिता) याप्रमाणे निश्चित करणे योग्य होईल असे मत आहे.

जळगांव शहरात खाजगी मिळकतींवर जाहिरातदार / अभिकरणामार्फत विविध क्षेत्रफळांचे अंदाजीत २५० होर्डिंग्ज/बॅनर/इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले प्रदर्शीत केलेले आहेत. तेव्हा जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील खाजगी मिळकतींवर प्रदर्शीत करण्यात आलेल्या बॅनर,होर्डिंग्ज,इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले इत्यादी प्रदर्शीत करणे कामी उपरोक्त नमूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व महाराष्ट्र महानगरपालिका आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शीत करण्याचे नियम व नियंत्रण नियम - २०२२ यानुसार वरिल प्रमाणे परवाना फी आकारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीत तात्पुरत्या स्वरुपातील व खाजगी मिळकतींवर जाहिरात बॅनर प्रदर्शीत करणेकामी आकारण्यात येणारी परवाना फी प्रशासनाने प्रस्तृत केलेनूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे मात्र सभागृहात झालेल्या चर्चेनूसार इलेक्ट्रीक प्रकाश व्यवस्था असलेले बॅनर / होर्डींग परवाना फी प्रति महिना रुपये ७००/- ऐवजी रुपये ५००/- आकारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०८ :-** महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ अंतर्गत ०५ नग E-Vehicle जळगांव शहर महानगरपालिकेस खरेदी करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. फक्त चांगल्या कंपनीची निवड करणे संदर्भातील काळजी प्रशासनाने घ्यावी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त यांनी वाहन खरेदी संदर्भात दि.२८/०२/२०२३ रोजी भ्रमणध्वनीव्दारे E-Vehicle प्रकारातील वाहने खरेदी / वाहने भाडेतत्वावर लावणे बाबत उपायुक्त (महसुल) यांचे समवेत चर्चा करणे संदर्भात निर्देश दिले. त्यानुसार उपायुक्त (महसुल) यांचे दालनामध्ये वाहने खरेदी अथवा भाडेतत्वावर घेणे संदर्भात तसेच महानगरपालिकेकडील सदयास्थितीत कार्यरत असलेले प्रशासकीय वाहनांचा वापराचा कालावधी संदर्भात चर्चा

करण्यात आली. महानगरपालिकेत आज रोजी कार्यरत असलेल्या प्रशासकीय वाहनांमधील बऱ्याच वाहनांची कालमर्यादा येणाऱ्या कालावधीमध्ये संपुष्टात येणार असल्याने नविन वाहने खरेदी संदर्भात प्रचलित शासन निर्णयानुसार महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१ नुसार खरेदी करणे संदर्भात प्रस्ताव सादर करणे बाबत निर्देश दिले. आज रोजी महानगरपालिकेकडे कार्यरत असलेल्या वाहनांचे तपशिलवार विवरण खालील परिशिष्ठ "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे,

| परिशिष्ठ "अ" | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | उत्पादीत वर्ष | स्थायी नोंदणी दिनांक | आज रोजी मनपा सेवेत झालेला कार्यकाळ | सदया कार्यरत विभाग | शेरा |
| १ | एम एच १९ एम ७४७४ | स्विफ्ट डिझायर | मार्च-२०११ | ०८/०४/२०११ | ११ वर्ष १० महिने | आयुक्त कार्यालय | मनपासाठी नविन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. |
| २ | एम एच १९ एम ०४२९ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १७/०१/२००९ | १४ वर्ष ०१ महिना | उपमहापौर कार्यालय | |
| ३ | एम एच १९ एम ०४३० | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १७/०१/२००९ | १४ वर्ष ०१ महिना | सहा.आयुक्त (आरोग्य) | |
| ४ | एम एच १९ एम ०४३१ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १७/०१/२००९ | १४ वर्ष ०१ महिना | अर्थ विभाग | |
| ५ | एम एच १९ एम ०४३२ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | ०४/०२/२००९ | १४ वर्ष ०१ महिना | विरोधी पक्षनेता | |
| ६ | एम एच १९ एम ०४३३ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | ०४/०२/२००९ | १४ वर्ष ०१ महिना | उपायुक्त (महसुल) | |
| ७ | एम एच १९ ए.एस.०००१ | ॲम्बेसेडर | फेब्रुवारी २०१० | २४/०२/२०१० | १३ वर्ष | मुलेप कार्यालय | |
| ८ | एम एच १९ एम ०००७ | ॲम्बेसेडर | फेब्रुवारी २०१० | ०४/०३/२०१० | १२ वर्ष ११ महिने | नगररचना कार्यालय | |
| ९ | एम एच १९ सी.यु.७१९७ | बोलेरो | मार्च २०१८ | ११/०५/२०१८ | ०४ वर्ष ०९ महिने | शहर अभियंता | |
| १० | एम एच १९ सी.वाय.१७५० | टाटा झेनॉन | डिसेंबर २०१७ | १६/०५/२०१८ | ०४ वर्ष ०९ महिने | पाणी पुरवठा | |
| ११ | एम एच १९ एम ९१५७ | टाटा झेनॉन | डिसेंबर २००९ | २६/०२/२०१० | १३ वर्ष | अग्निशमन विभाग | |
| १२ | एम एच १९ एम ६०७ | टाटा मांझा | डिसेंबर २०११ | १६/१२/२०११ | ११ वर्ष ०२ महिने | वाहन विभाग | |

आज रोजी महानगरपालिकेकडील प्रशासकीय सेवेमध्ये कार्यरत असलेल्या वाहनांचा १० वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी झालेला असल्याने वाहनावर देखभाल दुरुस्ती, इंधन खर्च इ. बाबींच्या खर्चामध्ये वाढ झालेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे,

| परिशिष्ठ “ब” (देखभाल दुरुस्ती) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | उत्पादीत वर्ष | आर्थिक वर्षनिहाय दुरुस्ती खर्चाचा तपशिल | | | शेरा |
| | | | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | |
| १ | एम एच १९ एम ७४७४ | स्विप्ट डिझायर | मार्च-२०११ | १,३३,६६६/- | ११,७३९/- | १,९७,२९४/- | मनपासाठी नविन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. |
| २ | एम एच १९ एम ०४२९ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | २६,१००/- | ४८,०८०/- | ६,०७०/- | |
| ३ | एम एच १९ एम ०४३० | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | २९,२९५/- | २२,३४०/- | ६,३००/- | |
| ४ | एम एच १९ एम ०४३१ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १५,२७४/- | ७८,८५५/- | ४७,२९०/- | |
| ५ | एम एच १९ एम ०४३२ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | ६३,१४४/- | ८६,२९२/- | ६८,३६१/- | |
| ६ | एम एच १९ एम ०४३३ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | २८,४५५/- | ९८,००६/- | १,४००/- | |
| ७ | एम एच १९ ए.एस.०००१ | ॲम्बेसेडर | फेब्रुवारी २०१० | १०,८५०/- | ४०,३४०/- | ६,६००/- | |
| ८ | एम एच १९ एम ०००७ | ॲम्बेसेडर | फेब्रुवारी २०१० | १७,२९०/- | ४१,२००/- | २५,७९०/- | |
| ९ | एम एच १९ सी.यु.७१९७ | बोलेरो | मार्च २०१८ | ७४,६५०/- | ५६,६९०/- | ७३,९५२/- | |
| १० | एम एच १९ सी.वाय.१७५० | टाटा झेनॉन | डिसेंबर २०१७ | ६६,७८६/- | ६०,८९३/- | ४१,५९०/- | |
| ११ | एम एच १९ एम ९१५७ | टाटा झेनॉन | डिसेंबर २००९ | ७,२५०/- | ७,७८०/- | ६४,१५२/- | |
| १२ | एम एच १९ एम ६०७ | टाटा मांझा | डिसेंबर २०११ | ६२,७६२/- | निरंक | निरंक | |

| परिशिष्ठ “क” (इंधन खर्च) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | उत्पादीत वर्ष | आर्थिक वर्षनिहाय इंधन खर्च लिटर्समध्ये | | | शेरा |
| १ | एम एच १९ एम ७४७४ | स्विप्ट डिझायर | मार्च-२०११ | ६४८ | ५६६ | १४५८ | मनपासाठी नविन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. |
| २ | एम एच १९ एम ०४२९ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १३२१ | ११४१ | १०८० | |
| ३ | एम एच १९ एम ०४३० | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | ७२५ | ९३२ | ७८५ | |
| ४ | एम एच १९ एम ०४३१ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १८११ | ९४७ | २९० | |
| ५ | एम एच १९ एम ०४३२ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १००१ | १३३८ | १२३६ | |
| ६ | एम एच १९ एम ०४३३ | टाटा इंडिगो | जानेवारी २००९ | १२५९ | ११५५ | ८८४ | |
| ७ | एम एच १९ ए.एस.०००१ | ॲम्बेसेडर | फेब्रुवारी २०१० | ९३८ | ८०४ | ६७५ | |
| ८ | एम एच १९ एम ०००७ | ॲम्बेसेडर | फेब्रुवारी २०१० | १०५३ | ७३४ | ६३० | |
| ९ | एम एच १९ सी.यु.७१९७ | बोलेरो | मार्च २०१८ | ३१७८ | ३३७० | २५४२ | |
| १० | एम एच १९ सी.वाय.१७५० | टाटा झेनॉन | डिसेंबर २०१७ | २६४० | २३०० | १५३७ | |
| ११ | एम एच १९ एम ९१५७ | टाटा झेनॉन | डिसेंबर २००९ | ४०० | ४६४ | २३० | |
| १२ | एम एच १९ एम ६०७ | टाटा मांझा | डिसेंबर २०११ | ६२३ | निरंक | निरंक | |

सदया कार्यान्वित असलेली वाहने व त्यावर होत असलेला इंधन व देखभाल दुरुस्ती खर्च मोठया प्रमाणावर होत असल्याने महानगरपालिकेस आर्थिकदृष्टया परवडणार नाही. शासनाच्या धोरणानुसार व पर्यावरण समतोल

राखण्याच्या दृष्टीकोणातुन E-Vehicle प्रकारातील वाहने खरेदी केल्यास महानगरपालिकेचे देखभाल दुरुस्ती व इंधन इत्यादी पोटी होणाऱ्या खर्चामध्ये मोठया प्रमाणावर बचत होईल.

१)वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२६/१५/विनिमय,मंत्रालय मुंबई दि.१३ ऑगस्ट २०१५, २)पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय क्रमांक: मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४ दि.२३ जुलै २०२१, ३)पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय क्रमांक: मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४ दि.२९ डिसेंबर २०२१, ४)पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय क्रमांक: मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४ दि.४ जानेवारी २०२२ ला पर्यावरण व वातावरणीय विभागाच्या शासन निर्णयातील दि.०१ एप्रिल २०२२ पासून शहरांतर्गत परिचालित होणारी, सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत व शासनाच्या निधी मधून खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असतील. तसेच शासकीय वापरासाठी भाडेतत्वावर घेण्यात येणारी सर्व वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक असतील. त्यामुळे महानगरपालिकेकडे E-Vehicle असणे अथवा खरेदी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे E-Vehicle व्यतिरिक्त इतर कुठल्याही वाहनाची खरेदी (पेट्रोल/डिझेल) ची खरेदी अथवा भाडेतत्वावर घेता येणार नाही असे मत आहे.

वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक:वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनिमय दि.२८ जुलै २०२० अन्वये वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार नविन E-Vehicle प्रकारातील वाहनांसाठी वित्तीय मर्यादा नमूद करण्यात आलेली नाही. वित्तीय मर्यादेसंदर्भात शासनस्तरावरुन आदेश पारीत करण्यात आलेला असल्यास त्याअन्वये वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून वाहन खरेदी बाबतची कार्यवाही प्रस्तावित करता येणे शक्य आहे. वित्तीय मर्यादेमध्ये शासन स्तरावरुन वाढ करुन घेणे अनिवार्य आहे.

वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक:वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनिमय दि.२८ जुलै २०२० नुसार शासकीय वाहनाची किंमत मर्यादा धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर वाहन मर्यादा धोरणाची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय क्रमांक: मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४ दि.२३ जुलै २०२१ नुसार महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ ची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार २.३ मधील धोरण लक्षांक (Targets)

| अ.क्र. | तपशिल | लक्षांक | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शासकीय वाहन ताफा | दि.०१ एप्रिल २०२२ पासून शहरांतर्गत परिचालित होणारी, सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत व शासनाच्या निधी मधून खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असतील. तसेच शासकीय वापरासाठी भाडेतत्वावर घेण्यात येणारी सर्व वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक असतील. | |

दि.०१ एप्रिल २०२२ पासून शहरांतर्गत परिचालित होणारी, सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत व शासनाच्या निधी मधून खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असतील. तसेच शासकीय वापरासाठी भाडेतत्वावर घेण्यात येणारी सर्व वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक असतील त्यानुसार शासकीय वाहन खरेदी धोरण मध्ये आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात यावी. सदर शासन निर्णयाचे अवलोकन करावे.

वाहन खरेदी संदर्भात नामवंत उत्पादीत कंपनीकडे E-Vehicle प्रकारातील वाहनांचे उपलब्ध असलेले मॉडेल व त्यापोटी येणारे खर्चाचे अंदाजपत्रक घेणे आवश्यक असल्याने महिंद्रा & महिंद्रा कंपनीचे अधिकृत डिलर मे.सातपुडा ऑटोमोबाईल्स, नशिराबाद ता.जि.जळगांव यांचे सेल्स मॅनेजर श्री.संतोष ठाकुर (मो.क्र.९२२५१०४३२१) यांचेशी चर्चा केली असता आज रोजी कंपनीमार्फत Mahindra XUV ४०० EV हे मॉडेल प्रकारातील असून आज रोजी जळगांव शहरामध्ये उपलब्ध नाही. खरेदी करावयाचे झाल्यास मेट्रो सिटी मधील डिलर मार्फतच खरेदी करावे लागेल याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

महानगरपालिका महासभा ठराव क्रं.२७ दि.११/१०/२०१८ अन्वये वित्त विभाग शासन निर्णय डी.एस.पी.१०८०/सी.आर.५६४/जी.ई.एन-५ दि.१९/०५/१९८४ शासन निर्णय क्रमांक:- विअप्र-१०९१/प्र.क्र.१२/विनिमय मंत्रालय मुंबई दि.०१ ऑक्टोंबर १९९१ अन्वये (१) निरनिराळया वाहनांचे आयुष्य खालील अटीवरुन ठरविण्यात यावे. धावल्याचे अंतर (किलोमीटर्समध्ये) आणि वाहन वापरण्याचा कालावधी (वर्षामध्ये) यापैकी जे नंतर पुर्ण

होईल शासन निकषानुसार वित्तीय व प्रशासकीय अधिकार वाहन निरुपयोगी ठरविण्याबाबत विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

| | | किलोमीटर्स | वर्ष |
|---|---|---|---|
| १) | लॉरी व इतर अवजड मोटार वाहने | २०००० | १० |
| २) | मोटर वाहने व जीप | २४०००० | १० |
| ३) | मोटार सायकली | ३००००० | १० |

शासन निर्णयानुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची ६३ वाहने निर्लेखित करण्यास महासभा ठराव क्रं.१११८ दि.१६/०८/२०११, महासभा ठराव क्रं.१८२ दि.२९/०१/२०१५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच स्थायी समितीने तक्त्यात नमुद केलेल्या ठरावानुसार सदर वाहने निर्लेखित करुन लिलाव करण्यास सक्षम मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | मा.स्थायी समिती ठराव | कालबाहय/निर्लेखित/लिलावसाठी मान्यता दिलेली एकुण वाहने | निर्लेखित/कालबाहय झालेली प्रशासकीय वाहने |
|---|---|---|---|
| १ | ठ.क्र.९७ दि.१९/०७/२०१४ | १२ वाहने | ०५ |
| २ | ठ.क्र.२४९ दि.२३/०४/२०१५ | १३ वाहने | ०६ |
| ३ | ठ.क्र.२७८ दि.१९/०६/२०१५ | ०४ वाहने | ०१ |
| ४ | ठ.क्र.२७९ दि.१९/०६/२०१५ | ०२ वाहने | ०१ |
| ५ | ठ.क्र.३०२ दि.१४/०८/२०१५ | ३२ वाहने | ०८ |
| | एकुण - | ६३ वाहने | २१ वाहने |

महानगरपालिका प्रशासकीय कामकाजाकरिता यापुर्वी ३५ वाहने प्रशासकीय कामकाजाकरिता कार्यरत होती. शासन निर्णय, महासभा व स्थायी समितीच्या मान्यतेने ३५ वाहनांपैकी विविध प्रकारचे २१ वाहने मनपा कामकाजातुन कायम स्वरुपी बंद करण्यात आलेली असुन प्रशासन गतीमान करण्याकामी प्रशासकीय वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. आज रोजी प्रशासकीय कामकाजाकरिता फक्त १४ वाहने कार्यान्वित आहेत.

मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम २०२१ अंतर्गत शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे नांवे नोंदणीकृत असणारी वाहने स्क्रॅप करणे बाबत केंद्र शासनाने दि.२३/०९/२०२१ च्या अधिसूचनेन्वये संपूर्ण देशात मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम, २०२१ हे धोरण लागू केले आहे. सदर धोरण राज्यात राबविण्यात येत असून या अनुषंगाने तसेच केंद्र शासनाच्या दि.१६/१२/२०२२ व दि.१७/१२/२०२२ च्या पत्रामध्ये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्थ कार्यालयातील नोंदणी दिनांकापासून दि.२७/०१/२०२३ च्या शासन निर्णयाच्या दिनाकांपर्यंत १५ वर्षे किंवा १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने Registered Vehicle Scraping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करण्यात यावीत असे निर्देश जारी करण्यात आलेले आहेत.

केंद्र शासनाच्या दि.१६/१२/२०२२ व दि.१०/०१/२०२३ रोजीच्या पत्रांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, केंद्र शासनाकडून Guideline on the Scheme for Special Assistance to States for capital investment for २०२२-२३ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानासाठी राज्यात १५ वर्षापेक्षा जास्त वय असणाऱ्या जिल्हयातील शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांच्या वाहनांची नोंदणी रद्द करणे आवश्यक असून अशी वाहने Registered Vehicle Scraping Facility मार्फत निष्कासित (Scrap) करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या दि.१६/१२/२०२२ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, Milestone-१ & Milestone-२ असे दोन टप्पे पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्रास रु.१५० कोटींचे अनुदान वितरीत केले जाणार आहे. राज्यास Milestone-१ व २ ची पूर्तता करण्यासाठी राज्यातील १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी सर्व शासकीय, निम

शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम यांचे अधिनस्त कार्यालयातील वाहने वर नमूद केलेप्रमाणे ३१ मार्च २०२३ पर्यंत Registered Vehicle Scraping Facility (RVSF) मार्फत निष्कासित करणे आवश्यक आहे.

आज रोजी कार्यान्वित असलेलया वाहनांना ही एक ते दोन वर्षामध्ये १५ वर्ष इतका कालावधी पुर्ण होवून सदरची वाहने कालबाहय करणे क्रमप्राप्त आहे.

| Sr No | Model | Amount | 100% Charging Range | Qty | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Hyundai KONA | 24,00,000/- | 452 KM | 01 | अधिकारी/ पदाधिकारी यांचेसाठी |
| 2 | Nexon 2.0 EV XZ+ | 18,90,891/- | 450 KM | 01 | |
| 3 | Nexon XZ+ LUX 7.2 | 20,48,193/- | 450 KM | 01 | |
| 4 | Mahindra XUV 400 EV | 15,99,000/- | 456 KM | 02 | |

महानगरपालिकेकडे सदया कार्यान्वित असलेल्या प्रशासकीय वाहनांचा इंधन खरेदी व देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्चाबाबत विचार करता नविन E-Vehicle वाहन खरेदी करणे फायदयाचे आहे. सदर E-Vehicle वाहन हे बॅटरीवर चालत असल्याने व त्यामध्ये मशिनरीचा समावेश नसल्याने महानगरपालिकेचे देखभाल दुरुस्ती व इंधन खर्चामध्ये मोठया प्रमाणावर बचत होईल. व बॅटरी चार्जिंग वाहनासाठी १.२५ प्रति किमी इतका खर्च येईल. वरील सर्व बाबींचा विचार करता वित्तीय मर्यादेसंदर्भात महानगरपालिकेतील पदाधिकारी / अधिकारी यांचेकरिता E-Vehicle वाहने खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त नमूद वाहने खरेदी करताना चांगल्या प्रतीची वाहने खरेदी करावीत.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०९ :-** आरोग्य विभागाकडील वापरात नसलेली २८ नग वाहने व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील वापरात नसलेली ०७ नग मशिनरींची लिलाव प्रक्रीया करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. त्यासोबत साधारणता सिंकफ्लोअर १० नग, गार्बेज हॉपर १५ नग व कॉमपॅक्टर ५ नग असे एकुण ३० वाहने जे प्रस्तावामध्ये समायोजन होऊ शकली नव्हती. परंतु त्यांचे डॉकेट मान्य झालेले आहे. ते सुध्दा याच्यामध्ये समाविष्ट करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** नितीनभाऊंनी केलेल्या सुचनांनुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. विषय क्र.०९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त व सहा.आयुक्त (सार्व.आरोग्य) यांनी टि.बी.एस.हॉस्पीटल येथील वाहनतळाची पाहणी केली असता सदर ठिकाणी मोठया प्रमाणावर वाहने बंद अवस्थेत उभी असल्याचे निर्दशनास आल्याने त्याबाबत सहा.आयुक्त (वाहन) यांना अहवाल ठेवणे बाबत मौखिक सुचना दिल्याच्या अनुषंगाने महानगरपालिका मालकीच्या एकूण २५२ वाहनांपैकी मक्तेदार मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस् नाशिक यांना आरोग्य विभागामार्फत हस्तांतरित केलेली १३० वाहने +१३ वाहने भाडेतत्वावर असे एकूण १४३ वाहने देण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेकडे विविध विभागातील पटलावर वाहने असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| परिशिष्ठ “अ” | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन संख्या | कार्यरत विभाग |
| १ | ट्रॅक्टर | ०१ | आरोग्य विभाग |
| | | ०३ | अतिक्रमण विभाग |
| | | १२ | सार्व.बांधकाम विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | जे.सी.बी. | ०३ | आरोग्य विभाग |
| | | ०१ | पाणी पुरवठा विभाग |
| | | ०१ | सार्व.बांधकाम विभाग |
| ३ | रोडरोलर | ०२ | सार्व.बांधकाम विभाग |
| ४ | पोटव्होल मशिन | ०१ | |
| ५ | फायर फायटर | ०१ | आरोग्य विभाग |
| | | ०६ | अग्निशमन विभाग |
| ६ | मिनी फायर फायटर | ०१ | |
| ७ | मिनी केमीस्ट | ०१ | |
| ८ | टाटा झेनॉन | ०१ | |
| ९ | Emergency Response Vehicle | ०१ | |
| १० | रुग्णवाहीका | ०४ | दवाखाने विभाग |
| ११ | शववाहीका | ०१ | |
| १२ | टाटा एस | ०१ | मलेरिया विभाग |
| १३ | टाटा झेनॉन | ०१ | पाणी पुरवठा विभाग |
| १४ | टाटा ४०७ मिनी ट्रक | ०१ | |
| १५ | स्किपलोडर | ०१ | आरोग्य विभाग |
| १६ | टाटा ४०७ पिकअप | ०१ | |
| १७ | जेटींग मशिन | ०१ | |
| १८ | मैला व्हॅक्युम | ०१ | |
| १९ | वॉटर टँकर | ०२ | |
| २० | हायड्रोलिक लॅडर | ०३ | विदयुत विभाग |
| २१ | टाटा इंडिगो | ०५ | प्रशासकीय विभाग |
| २२ | ॲम्बेसेडर | ०२ | |
| २३ | बोलेरो | ०१ | |
| २४ | स्विप्ट डिझायर | ०१ | |
| २५ | TATA Tigor EV XZ+ | ०१ | |
| २६ | टाटा मांझा | ०१ | |
| | एकुण वाहने - | ६३ | |

आज रोजी एकूण ६३ वाहनांचा वापर महानगरपालिका विविध विभागामध्ये होत आहे.

टि.बी.एस.हॉस्पीटल वाहनतळ येथे आरोग्य विभागात वापरात नसलेली वाहने अनेक वर्षापासून नादुरुस्त २८ वाहने खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे :-

| परिशिष्ठ “ब” (आरोग्य विभाग) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | उत्पादीत वर्ष | शेरा |
| १ | MH-19 M 9076 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| २ | MH-19 M 9078 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| ३ | MH-19 M 9079 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| ४ | MH-19 M 9080 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००९ | १३ वर्ष |
| ५ | MH-19 M 9082 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००९ | १३ वर्ष |
| ६ | MH-19 M 9083 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००९ | १३ वर्ष |
| ७ | MH-19 M 9084 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००९ | १३ वर्ष |
| ८ | MH-19 M 9085 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| ९ | MH-19 M 9088 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| १० | MH-19 M 9089 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| ११ | MH-19 M 9095 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| १२ | MH-19 M 9096 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | MH-19 M 9097 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| १४ | MH-19 M 9098 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| १५ | MH-19 M 9100 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| १६ | MH-19 M 9102 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| १७ | MH-19 M 9103 | गॉर्बेज हॉपर | एप्रिल २००८ | १४ वर्ष |
| १८ | MH-19 M 9193 | गॉर्बेज हॉपर | जुलै २०१० | १२ वर्ष |
| १९ | MH-19 M 9196 | गॉर्बेज हॉपर | जुलै २०१० | १२ वर्ष |
| २० | MH-19 M 9197 | गॉर्बेज हॉपर | मे २०१० | १२ वर्ष |
| २१ | MH-19 M 9198 | गॉर्बेज हॉपर | मे २०१० | १२ वर्ष |
| २२ | MH-19 M 9202 | गॉर्बेज हॉपर | मे २०१० | १२ वर्ष |
| २३ | MH-19 M 9204 | गॉर्बेज हॉपर | मार्च २०१० | १२ वर्ष |
| २४ | MH-19 M 9206 | गॉर्बेज हॉपर | जुलै २०१० | १२ वर्ष |
| २५ | MH-19 M 0358 | स्किप लोडर | मे २००७ | १५ वर्ष |
| २६ | MH-19 M 0367 | स्किप लोडर | मे २००७ | १५ वर्ष |
| २७ | MH-19 M 9128 | नाला एक्सेव्हेटर | नोव्हेंबर २००८ | १४ वर्ष |
| २८ | MH-19 M 9129 | | | १४ वर्ष |

गिरणा टाकी, मनपा डिझेल पंप येथे सार्व.बांधकाम विभागाची वापरात नसलेली मशिनरी अनेक वर्षापासुन नादुरुस्त / उभी असलेली ०७ मशिन खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे :-

| परिशिष्ठ "क" (सार्व.बांधकाम विभाग) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | उत्पादीत वर्ष | शेरा |
| १ | J - 11435 | रोड रोलर | इ.स.१९८६ | ३६ वर्ष |
| २ | J - 11436 | रोड रोलर | इ.स.१९८६ | ३६ वर्ष |
| ३ | J - 11437 | रोड रोलर | इ.स.१९८६ | ३६ वर्ष |
| ४ | J - 12506 | रोड रोलर | एप्रिल १९९६ | २६ वर्ष |
| ५ | J - 12507 | रोड रोलर | एप्रिल १९९६ | २६ वर्ष |
| ६ | J - 12508 | रोड रोलर | एप्रिल १९९६ | २६ वर्ष |
| ७ | D - 6 | बुलडोझर | १९९९-२००० | २३ वर्ष |

वर नमूद परिशिष्ठ "ब" मधील २८ वाहने आरोग्य विभागाकडील असून जळगांव शहर साफ-सफाईचा मक्ता ५ वर्ष कालावधीसाठी मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस् नाशिक यांना मक्ता ऑगस्ट-२०१९ पासून दिलेला असल्याने मनपा ताब्यातील सदर २८ वाहने वाहनतळ येथे नादुरुस्त / बंद अवस्थेत उभी आहेत. सदयास्थितीत सदर वाहनांचा वापर आरोग्य विभागामार्फत करण्यात येत नाही. सदर वाहनांचा वापराचा कार्यकाळ सुमारे १२ वर्षापेक्षा जास्तीचा झालेला आहे. आरोग्य विभागामार्फत सदर वाहनतळ येथे उभी असलेली वाहने भविष्यात वापरात घेणार किंवा कसे ? याबाबत आरोग्य विभागाचा अभिप्राय घेणे उचित होईल असे मत आहे. परिशिष्ठ "ब" मधील वाहनांचा झालेला कार्यकाळ व साफ-सफाई मक्ता संपुष्टात येणेसाठी सुमारे १८ महिने एवढा कालावधी बाकी आहे. शासन निर्देशानुसार वाहन वापर मर्यादा ही १०+५ (Registration Renewal) असा १५ वर्ष कालावधी नंतर सदर वाहने स्क्रॅप करणे बाबत तरतुद आहे.

तसेच परिशिष्ठ "क" मधील नमूद मशिनरी संदर्भात यापुर्वी पारीत झालेला महासभा ठराव क्रं.७२ दि.१८/०२/२०१४ मधील नमूद वाहनांमधील रोडरोलर- ८ नग, बुलडोझर -१ नग निर्लेखित न करणेसंदर्भात मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. लिलाव प्रक्रीयामध्ये सदर मशिनरी संज्ञेमधील मशिनरीचा लिलाव करावयाचा झाल्यास महासभेने पारीत केलेला ठरावाने दुरुस्ती करुन नव्याने मशिनरींचा लिलाव संदर्भात धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. तत्पुर्वी सदर मशिनरीचा वापर सार्व.बांधकाम विभागामार्फत करणार किंवा कसे ? याबाबत सार्व.बांधकाम विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

आरोग्य विभाग / सार्व.बांधकाम विभागाच्या अभिप्रायाअंती उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय,जळगांव यांना पत्र देवून त्यांचे मार्फत सदर वाहनांची / मशिनरीची पाहणी व तपासणी करुन लिलाव प्रक्रीया राबविणेसाठी महासभेच्या धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव सादर करता येईल असे विभागाचे मत आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील २८ नग वाहने व ०७ नग मशिनरीची तांत्रिक तपासणी व पाहणी करुन अहवाल व मार्गदर्शन मिळणे कामी उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय जळगांव यांना जा.क्र./ ज.श.म.न.पा./वा.व्य.वि./१५०/२०२२-२३ दि.२७/०२/२०२३ अन्वये पत्र देण्यात आले होते. त्याअनुषंगाने वर नमूद २८ नग वाहने व ०७ नग मशिनरीची उप-प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील मोटार वाहन निरीक्षक श्री.अविनाश दुसाने यांनी तपासणी केली असून त्याबाबतचा अहवाल सादर केलेला असून तसेच त्यांनी जा.क्र./ १०२९/परिवहनेत्तर/उपप्रापका/जळ/२०२३ दि.०३/०४/२०२३ अन्वये महानगरपालिकेस पत्राव्दारे कळविलेले आहे.

सदर पत्रामध्ये ०६ मशिनरी ही रोडरोलर वाहने व ०१ वाहन हे बुलडोझर प्रकारचे असून सर्व मशिनरी ही १५ वर्षापेक्षा अधिक जुनी आहेत. वाहनांची प्रत्यक्ष पाहणी केली असता वाहनांचे साठे व इतर प्रणाली प्रचंड गंजलेल्या स्थितीत असून रस्त्यावर न वापरण्याच्या परिस्थितीत आढळून आले तसेच मशिनरी बऱ्याच वर्षापासून वापरात नसल्याचे आढळून आले. सबब सदर मशिनरी मोडीत काढण्यात यावी. तसेच २८ गॉर्बेज हॉपर वाहने ही गंजलेल्या स्थितीत तसेच लोड बॉडी देखील सडलेली व गंजलेली स्थितीत असल्याने व ३ ते ४ वर्षापासून वापरात नसल्याने त्यांना पुन्हा दुरुस्ती देखभाल करुन पुनश्च वापरात घेणे आर्थिकदृष्टया किफायतशीर राहणार नाही. तसेच सदर वाहने ही १५ वर्षाची कालमर्यादा अलिकडच्या एक वर्षाच्या काळात पुर्ण करणार असल्याने त्यांचेवर पुन्हा दुरुस्ती देखभाल करणे किफायतशीर राहणार नाही. सबब सदर वाहने निकामी व मोडीत काढण्यात हरकत नाही. याबाबत नमूद केलेले आहे.

उप-प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत वाहनाचे आयुष्यमान किमान १५ वर्ष पुर्ण झालेनंतरच वाहनाची कालबाहय / निर्लेखन प्रक्रीया राबवून वाहनांचा लिलाव करण्यात येतो. महानगरपालिका मालकीची वाहने ही आरोग्य व सार्व.बांधकाम विभागाकडची असून सदर काही वाहनांचा कालावधी पुर्ण होण्यास किमान ०१ वर्ष व काही वाहनांसाठी ०३ वर्ष अदयाप बाकी आहेत. आरोग्य व सार्व.बांधकाम विभागामार्फत भविष्यात देखील सदर वाहनांचा वापर होणार नसल्याने लिलाव कार्यवाही करण्यास हरकत नाही त्याअनुषंगाने वर नमूद केलेनुसार सदर वाहनांची प्रचलित शासन निर्णयान्वये विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन नियमोचित लिलाव प्रक्रीया राबविणेस व नियमोचित कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सूचनेप्रमाणे आरोग्य विभागाकडिल वापरात नसलेली व बरीच जुने झालेली १० नग लोडर, १५ नग गार्बेज हॉपर, व ५ नग कॉम्पॅक्टर असे एकूण ३० वाहने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन व नियमोचित कार्यवाही करुन लिलाव प्रक्रिया राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १० :-** प्रभाग क्र.०५, युवक माहिती केंद्र / आभ्यासिका बांधकाम करणेबाबत (महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत) प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया, प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, महापौरताई, आयुक्त मॅडम, प्रभाग क्र.०५ मध्ये जो अभ्यासिकेचा विषय आलेला आहे. तर एक सुचना आहे. ज्याच्या आजुबाजुला शाळा कॉलेज अशी संख्या कमी दिसते. आणि जेथे शाळा, कॉलेज, हॉस्टेल जास्त प्रमाणात आहे. जसे एम.जे.कॉलेज आहे, इंजिनिअरींग कॉलेज आहे नॅशनल हायवेला लागुन, ज्या ठिकाणी जास्त प्रमाणात विद्यार्थी संख्या आहे तेथे करण्यात यावी ही सुचना आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया, हा जो प्रस्ताव मांडलेला आहे, तेथे एक वाचनालय, नगरपालिकेपासुन ते आज महानगरपालिकेपर्यंत तो चालु आहे. आज रेल्वे स्टेशन असेल, बस स्टॅण्ड असेल, या माध्यमातुन असेल किंवा नुतन मराठा कॉलेज असेल, विविध महाविद्यालय गावात आहे. अभ्यासिका या मोठया प्रमाणावरती, प्रॅक्टीसच्या दृष्टीने जे स्टेडीअम असेल,हे भर भागात आहे. त्याचा फायदा जास्त या भागात होईल. नक्की त्यांना आवश्कता असेल, तर त्यांनी पुढील याच्यात प्रस्ताव द्यावा. प्रशासनातर्फे या प्रस्तावाला मान्यता देण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माझी विरोध नाही या गोष्टीला पण तिकडच्या भागात जास्त प्रमाणात विद्यार्थी आहे. इकडच्या भागात रेल्वे स्टेशन असतील, बस स्थानक असतील, पण येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या ज्या शाळा आहे. तर ते स्पेसिफिक विद्यार्थ्यांना त्याचे लाभ व्हायला पाहिजे. इतके लांबुन शाळेमधुन कॉलेज मधुन ते पायी येऊ शकत नाही. त्याच्याकरिता वाहनांची आवश्कता असते. त्यामुळे महापालिकेच्या इतर जागा असतील तेथे करण्यात यावी ही सुचना आहे.

**मा.महापौर :-** ताई, या संदर्भात अजुन एक अभ्यासिका उभारण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आपल्याला निधी सुध्दा उपलब्ध झालेला आहे. आपल्या नजरेत जर एखादी जागा असेल, आपल्या वार्डात असेल तरी हरकत नाही. आपण जागा सुचवावी, आपण त्या ठिकाणी नविन अभ्यासिका सुरु करु. आपण कळवावे प्रशासनाला.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण आपण जो आता शब्द दिलेला आहे. तो पाळला गेला पाहिजे. येथे असच होते, महासभेमध्ये शब्द दिला जातो. पण तो पाळला जात नाही. महासभा झाली की, त्याचा विसर पडुन जातो. माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाही. आयुक्त मॅडम गोड गोड बोलवुन, हसुन हसुन रवाना करुन देतात. हो हो सांगतात मागच्या प्रश्नांचे पण उत्तरे मिळालेली नाही. तीन महासभेपासुन मी मागितलेले आहे. पण कुठलीच कार्यवाही त्याच्यावर झालेली नाही. अश्या प्रकारचे प्रश्न उदभव नये. म्हणुन इतिवृत्तात पण नोंद करुन घ्या की, पुढची जी अभ्यासिका असेल, आम्ही जी जागा सुचवु तेथे करण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अनुमोदन आहे.

(श्री.अनंत जोशी यांनी मा.महापौर महोदया यांना प्रस्ताव दिला)

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताईंनी आम्हाला सुचित केल्याप्रमाणे नितीनभाऊ बरडेंकडे ऑलरेडी तयार होता तो विषय. याबाबत अभ्यास करुन तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

**मा.महापौर :-** ठिक आहे, पुढील महासभेमध्ये आपण हा विषय ठेवु.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आम्हाला ठिकाण कोणते आहे ते सांगावे.

**मा.महापौर :-** ठिक आहे. आपलाच वार्ड आहे. आपल्याच वार्डात ती सोय होणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मी तेच म्हणत आहे. आम्हाला फक्त ठिकाण सुचवावे.

**मा.महापौर :-** बिल्कुल प्रस्ताव याच प्रमाणे महासभेत येणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कोणीही केले तर हरकत नाही. श्रेय वादावर मी कधीच म्हणणार नाही की, यानी केले आहे की, त्यानी केले आहे. मुलांच्या विकासासाठी जे योग्य असेल त्याला माझी मान्यता आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१११० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद" योजने अंतर्गत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.मनपा २०२२ प्र.क्र.४२५-अ-२७ (३) नवि १६ दि.१९ मार्च २०२३ अन्वये शासन निर्णयानुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सेवा सुविधांच्या विकासाठी या योजने अंतर्गत जळगांव महानगरपालिका यांना महानगरपालिका हद्दीमध्ये युवक माहिती केंद्र / अभ्यासिका बांधकाम करणे, फर्निचर करणे व डिजीटलायझेशन करणे या कामाकरीता रक्कम रु.१,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी मात्र) इतका निधी वितरीत करण्यास अटी व शर्तीच्या अधिन राहुन शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गतची कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असुन सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्यशासनाचा आहे. या बाबतचा शासन निर्णय सोबत जोडलेला आहे.

जळगांव महानगरपालिका क्षेत्रात मनपा मालकीचे सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय असुन त्यांच्या पश्चिमेस खुली जागा असुन सदर जागेवर लायब्ररीचे रिजर्वेशन आहे. सदरची जागा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असुन वाचनालय / ग्रंथालयाचे शेजारी आहे. तसेच सदरचा परिसर हा शांत असुन अभ्यासिकेसाठी योग्य असल्याचे दिसुन येते.

प्रस्तुत जागेवर युवक माहिती केंद्र / अभ्यासिका बांधकाम करणे करीता नगरचना विभागाच्या विकास आराखडयानुसार अनुज्ञेय असलेबाबत व याठिकाणी अभ्यासिकेचे बांधकाम करणेस हरकत नसलेबाबत अहवाल मागविणे व प्रस्तुत मनपा हद्दीतील महानगरपालिका मालकीची वाचनालयाकरीता आरंक्षीत असलेली T.P. स्किम II मधील जागेवर युवक माहितीकेंद्र / अभ्यासिका बांधकाम करणे, फर्निचर करणे व डिजीटलायझेशन करणेचे काम शासन निर्णयानुसार व मंजुरी शासकीय निधीतुन करणे ही बाब धोरणात्मक असुन त्यास महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

नगररचना योजना जळगांव क्र.०२ अंतिम भुखंड क्र.२८२ मंजुर विकास योजना जळगांव (जुनी हद्द) नुसार प्रस्तुतची जागा अस्तित्वातील लायब्ररी या वापराकरीता दर्शविण्यात आलेली आहे. मंजुर यु.डी.सी.पी.आर ४.१० नुसार सदर जागेवर Educational Complex, Training Institute Library इ. हे वापर अनुज्ञेय आहे. त्यानुसार प्रस्तावित वापर अनुज्ञेय करता येईल असे नगररचना विभागाचे मत आहे.

शासन निर्णय क्र.मनपा/२०२२/प्र.क्र.४२२ अ २७ (३) नवि/१६/मंत्रालय, मुंबई दि.२९ मार्च २०२३ अन्वये मनपा क्षेत्रात मुलभुत सोईसुविधाच्या विकासासाठी विशेष तरतुद या योजने अंतर्गत मनपा क्षेत्रामध्ये युवक माहिती केंद्र / आभ्यासिका बांधकाम करणे, फर्निचर करणे व डिजीटीलायझेशन करणे, या कामाकरीता १.०० कोटी रुपये निधी मंजुर असुन मनपाच्या अस्तित्वातील लायब्ररी दर्शविण्यात आली असुन नगररचना विभागाच्या अहवाला नुसार प्रस्तावित वापर अनुज्ञेय असल्याने प्रभाग क्र.०५, युवक माहिती केंद्र / आभ्यासिका बांधकाम करणेस (महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत) मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- भंगाळे विष्णू रामदास** |
| **अनुमोदक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |

**नगरसचिव :- विषय क्र. ११ :-** जळगांव शहरातील प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मधील रस्ते दुरुस्तीचे काम मनपा निधी रस्ते व्यवस्था दुरुस्ती या लेखाशिर्षातुन करणे कामी येणारा एकुण अंदाजीत रक्कम रु.१,९९,८३,४२४/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१११११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ परिसरातील रस्ते अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा पाईपलाईन व अंडर ग्राऊंड ड्रेनेज पाईप लाईन यांचे करीता केलेल्या रस्त्याच्या खोदकामामुळे खराब झाले आहे. ते दुरुस्त करणेबाबत वार्डातील नागरिक व सन्मा.नगरसेवक तक्रारी करीत असतात लवकरच पावसाळा सुरु होत असल्याने सदरचे रस्ते तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या करीता म.न.पा.निधी अंतर्गत प्रत्येक प्रभाग समिती करिता खालील प्रमाणे दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| | |
|---|---|
| १) प्रभाग समिती क्र.०१ मधील रस्ते दुरुस्ती करणे | :- ४९,९९,०३४/- |
| २) प्रभाग समिती क्र.०२ मधील रस्ते दुरुस्ती करणे | :- ४९,९९,१२५/- |
| ३) प्रभाग समिती क्र.०३ मधील रस्ते दुरुस्ती करणे | :- ४९,९९,३४८/- |
| ४) प्रभाग समिती क्र.०४ मधील रस्ते दुरुस्ती करणे | :- ४९,८५,९१७/- |
| एकुण रक्कम रु | :-१,९९,८३,४२४/- |

वरील प्रमाणे चार स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करण्यात आले असुन सदरचे काम मनपा निधी रस्ते व्यवस्था दुरुस्ती या लेखाशिर्षातुन करणे कामी येणारा एकुण अंदाजीत रक्कम रु.१,९९,८३,४२४/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.१२ (तहकुब विषय):-** तहकुब विषय :- स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे कामी मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद मार्फत मे.न्यायालयात दाखल दाव्या प्रकरणी बाजु मांडणेबाबत व वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
(सन्मा.सदस्या. ॲड.शुचिता हाडा यांनी मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी सो यांना सदर विषयासंदर्भात पत्र दिले)
**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- महापौर महोदया, शुचिताताई यांनी जे पत्र दिले आहे त्याला सर्व भारतीय जनता पार्टीच्या सर्व नगरसेवकांची संमती आहे.

**मा.महापौर** :- या ठिकाणी या पत्राचे वाचन करण्यात यावे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौरताई या विषयाला आमचा येथे विरोध आहे. सदरचा विषय हा नामंजुर करण्यात यावा अशी मागणी येथे करण्यात आलेली आहे. तर या विषयाच वाचन येथे करण्यात याव आणि ईतिवृत्तात नोंदविण्यात याव आणि त्यानुसारच पुढील निर्णय प्रक्रीया ही राबविण्यात यावी.

**मा.महापौर** :- पत्राचे वाचन करण्यात यावे.

**नगरसचिव:-** सन्मा.सदस्या. सौ.ॲड.शुचिताताई अतुलसिंह हाडा यांच विषय क्रं. १२ संदर्भात या ठिकाणी मा.महापौर महोदया यांचेकडेस पत्र प्राप्त झालेले आहे. मा. महापौर महोदया यांचे निर्देशानुसार सदर पत्राच वाचन करण्यात येत आहे.

मा.महापौर,
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव.

विषय :- महासभा क्रं. ४३ दिनांक ३०/०५/२०२३ विषय क्रं. १२ नामंजुर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, स्थायी समिती सभागृहाने यापुर्वीच मूळ निविदेला मान्यता दिलेली आहे. सदर प्रकरणी निविदेतील Clause ३७ प्रमाणे निविदेतील मंजूर /quantity २५% वाढविता येणे कायद्याने अभिप्रेत आहे. मात्र त्याकरीता महासभेची काणेतीही वेगळी मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

या व्यतिरीक्त वाढीव कामांची रक्कम ही मंजूर मूळनिविदा किमती पेक्षा अडीच पट जास्त होत आहे. जून २०२१ पासुन DPR मंजूर होऊन सुध्दा आता पावेतो प्रशासनाने कोणतीच कार्यवाही ( निविदा प्रक्रीया राबवणे) केली नाही हे खरे तर दुर्देवी आहे आणि नियुक्त ठेकेदारालाच कोणत्याही प्रकारची स्पर्धा न करता वाढीव कामे देणे ही बाब बेकायदेशीर सदरात मोडते. या ठेकेदारास निविदा प्रक्रीया न राबवता वाढीव कामे देण्याचा अट्टाहास केला जात आहे.

शासनाने सुधारीत डि पी आर ला मंजूरी दिली मात्र त्याच ठेकेदाराला उर्वरित वाढीव कामे द्यावीत असे कुठेही सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे आदेशात शासनाने नमूद केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. मजिप्र कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या पत्रामध्ये निविदा करारनामा कलम ३७ चा उल्लेख कलम ३८ केला आहे . म्हणजेच त्यांनी दिलेले मार्गदर्शन पत्र देण्याबाबत ते किती गंभीर आहेत हे दिसून येत आहे.

दि.१०/०५/२०२३ रोजीचे प्रमुख विधी सल्लागार, जळगांव यांचे प्रकल्प विभागास प्राप्त अभिप्रायानुसार त्यांनी शेवटच्या पॅरामध्ये नमूद केले आहे की, ते कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्वीकारत नाही. म्हणजेच सदर प्रकरणी काहीतरी बरे वाईट होईल याची त्यांना सुध्दा धास्ती आहे हे स्पष्ट होत आहे.

डॉकेट मधील विभाग प्रमुखांनी दिलेल्या अभिप्रायावर मुलेप यांनी अभिप्राय दिलेला आहे. त्या अभिप्रायानुसार त्यांनी फक्त कार्यादेशाप्रमाणे १२५ % ची कामे १६-१७ च्या रेट प्रमाणे द्यावीत असे म्हटले आहे. त्यांनी भविष्यात लेखापरिक्षणाचे आक्षेप निघू शकतात असे म्हटले आहे. म्हणजेच मुलेप यांनी दिलेला अभिप्राय स्पष्ट नाही.

एकंदरीत पाहता विभाग प्रमुख प्रकल्प अभियंता, विधी सल्लागार , मुलेप आणि मक्तेदार यांचे संगनमत स्पष्टरित्या दिसून येत आहे आणि येनकेन प्रकारे सक्षम प्राधिकरण म्हणजे आपण सर्व - सभागृहाचे सदस्य यांची दिशाभूल करून कसेही ठराव मंजूर करून घ्यावा हे स्पष्ट दिसून येत आहे.

त्यामुळे ठरावाच्या बाजूने मतदान करणारे सदस्य यांच्यावर संस्थेचे नुकसान केले म्हणून भरपाईची पाळी येऊ शकते ही शक्यता नाकारता येत नाही.

२५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढीचे काम सी.व्हि.सी गाईडलाईन प्रमाणे त्याच मक्तेदारास देता येतच नाही. त्यासाठी नव्याने निविदा प्रक्रीया राबवणे हेच क्रमप्राप्त आहे. केंद्रीय दक्षता आयोगाचे नियमाप्रमाणे निविदा अटी शर्तीमध्ये बदल करून घेणे हे कृत्य सुध्दा बेकायदेशीर सदरात मोडते.

धुळे जिल्हा न्यायालय येथे चाललेला स्पेशल मुकदमा नंबर १/२०१४ (न.पा.जळगांव घरकुल प्रकरण ) मध्ये न्यायालयाने मक्तेदारास निविदेमध्ये नमूद केल्यापेक्षा जास्तीचा वाढीव दर (Price escalation) मंजूर करून दिल्यामुळे सदस्यांवर गंभीर आरोप निश्चित केलेले आहेत.

सबब वाढीव कामांसाठी नव्याने निविदा प्रक्रीया राबवण्यात यावी असे माझे स्पष्ट मत असून यापूर्वी सुध्दा दि.१४/०२/२०२२ रोजीच्या ऑनलाईन झालेल्या महासभेत याच विषयाच्या ठराव क्रं. ७४० ला मी माझा विरोध नोंदवला होता.

वास्तविक पाहता मक्तेदरास दिलेल्या कार्यादेशाची मुदत आणि सोबत झालेल्या करारनाम्यातील मुदत ही कधीच संपून गेलेली आहे. प्रशासनाने आज पावेतो एकदाही मुदत वाढ दिलेली अगर असा विषय सभागृहासमोर आणलेला नाही. त्यामुळे ही निविदा प्रक्रीया अशीही व्यपगत होऊन रद्द झालेली आहे. तरीही वारंवार सभागृहाचे खांद्यावर का बंदूक ठेवली जाते हे न उलगडणारे कोडे आहे.

तरी विषय क्रं. १२ नामंजुर करण्यात यावा.

सही/-xxx
ॲड . शुचिता अतुलसिंह हाडा
नगरसेविका,मनपा,जळगांव.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मा.महापौरताई, याच्या संदर्भात आपण फक्त थोडीशी पार्श्वभुमि जर बघितली ताई तर त्यामध्ये की मक्तेदाराला कार्यादेश दिल्याच्या सगळ्या गोष्टींना महानगरपालिका प्रशासन म्हणा किंवा महानगरपालिकेचे सभागृह म्हणा. हे सगळे कारणीभुत आहे त्या गोष्टींसाठी कारण हा ज्या-ज्या वेळेला प्रस्ताव सभागृहासमोर आला. त्यावेळेला सगळ्या गोष्टी कायदेशीररित्या होत्या. मुदतीच्या आतमध्ये होत्या. त्या-त्या वेळेला कुठेतरी सभागृहाने तो विषय तहकुब ठेवण्याच्या दृष्टीकोनातुन निर्णय घेतला. काहीवेळेला वेगळ्या अटी-शर्ती टाकल्यामुळे त्यावेळेला प्रशासन त्या ठरावाची अंमलबजावणी करू शकले नाही. म्हणुन आता या संपुर्ण प्रकरणाला आतापर्यंत याच्यामध्ये विलंब झालेला आहे. हा एक मुद्दा झाला, दुसरा मुद्दा असा आहे की सदरहु मक्तेदार त्याची कुठलीही तांत्रिक चुक नसतांना मनपा प्रशासन किंवा मनपा सभागृह यांच्या दिरंगाईमुळे तो आज काम सुरू करू शकलेला नाहीये आणि वेळेमध्ये त्याला कार्यादेश न मिळाल्यामुळे मक्तेदार हा न्यायालयात गेलेला आहे. न्यायालयात गेलेला असल्याकारणाने काय झालय की मक्तेदाराची जर कधी चुक असती किंवा मक्तेदाराच्या दिरंगाईमुळे जर कधी हा विषय रेगांळला गेला असता किंवा आपण कार्यादेश देवु शकलो नसतो तर ती बाब आपण समजु शकलो असतो. परंतु न्यायालयात गेल्यानंतर हा कधीतरी डिफॅमिनेशनचा सुट (defamation suit) महानगरपालिकेविरूध्द फाईल केलेले आहे. म्हणजे ऑलरेडी फाईल केलेले असुन.

**ॲड.शुचिता हाडा :-** ऑलरेडी त्याने मिडीयेशन ॲप्लिकेशन फाईल केलेले आहे पुर्वी सुध्दा त्याने

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** यात सुध्दा चांगल्या पध्दतीने ज्ञात आहे की मिडीयेशन ॲप्लिकेशनच या सगळ्यांच गुढ या ठिकाणी प्रशासनाने या सभागृहाच्या लक्षात आणायला पाहीजे होत. मिडीयेशन आणि ॲप्लिकेशन म्हणजे काय असत अगदी साधा प्रकार आहे की तो तडजोडीसाठी न्यायालयासमोर आलेला आहे. तर आपल्याला मागचा डॉकेट जर आठवत असेल की, काय टाकलेले होते मागच्या डॉकेटमध्ये आपल्या विद्यमान प्रशासनाने की, इतक्या रकमेचा त्याने दावा दाखल केलेला आहे आणि मिडीयेशन ॲप्लिकेशन केलेल आहे. त्यापेक्षा दोन-चार कोटींने वाढीव त्याला देण हे केव्हाही संयुक्तिक होणार आहे. हि अशी दिशाभुल करायची सभागृहाची करायची का? मिडीयेशन ॲप्लिकेशन म्हणजे ते निवाडा झालेला नाहीये. किंवा त्यानी कोर्टात केसही दाखल केलेला नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे. तो एक पर्याय म्हणुन आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** कोर्टात तो गेल्यानंतर आपण आपले जाबजबाब दिले पाहीजे आपण त्याची तयारी केली पाहीजे प्रशासन म्हणुन की आपण सभागृहाची अशी दिशाभुल केली पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- परंतू ताई आपल्या मनपा प्रशासनाच्या बाबतीतला विधीशाखेतील आतापर्यंतचा अनुभव पाहता. आज आपण हा विषय

**ॲड.शुचिता हाडा :-** आज आपण आजचा सुध्दा अभिप्राय बघा नितीनभाऊ तुम्ही या अभिप्रायावर आपण अवलंबुन होतो. या अभिप्रायासाठी आपण मागच्या सभेमध्ये आपल्याच सुचनेनुसार आपली सुचना होती पदाधिकाऱ्यांच्या मिटींगमध्ये सुध्दा आपणच मला विनंती केलेली होती की तुम्ही तुमच एक लेखी पत्र द्या. तुमचे आक्षेपीय मुद्दे काय आहेत हे विधी विभागाला द्या. त्यानुसार मी माझ पत्र विधी प्रमुखांना सुध्दा दिल आणि माझ्या पत्राच आजपर्यंत उत्तर देण्याची दखल सुध्दा घेण्यात आलेली नाही. आजचा अभिप्राय सुध्दा अत्यंत मोघम स्वरूपाचा आहे ज्याचा शेवट हा आहे की माझे मत आपल्यावर बंधनकारक नाही. माझ्या मतामुळे भविष्यात काही नुकसान झाल्यास मी जबाबदार नाही. मग कोणी घ्यायची ही जबाबदारी आणि का घ्यायची.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही माझ ताई या मताशी...

**ॲड.शुचिता हाडा :-** भाऊ आपला येथे फार चांगला अनुभव आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ताई मी तुमच्या मताशी सहमत आहे फक्त माझ म्हणण हे आहे की आता या संपुर्ण प्रकरणामध्ये...

**ॲड.शुचिता हाडा :-** आता जो मुद्दा मांडला नितीनभाऊ की त्याच्या बाजूने डेडलाईन झाली आपल्या बाजूने डेडलाईन झाली तर कोण जबाबदार आहे याला, प्रशासन जबाबदार आहे. सभागृह, तुम्ही किंवा मी किंवा हे सगळे लोकप्रतिनिधी जबाबदारी नाहीये. आपण ज्यावेळेला १२ तारेखला जी महासभा झालेली होती त्यावेळेला आपण तहकुब केलेला होता हा विषय , तहकुब केलेला होता कशासाठी, जबाबदारी निश्चितीसाठी, मला वाटत २०२१ ची महासभा होती ती त्यावेळेला हा विषय तहकुब केलेला होता. मग काय केल प्रशासनाने काहीच केले नाही प्रशासनाने, जर आपण तहकुब केला, आपण तहकुबीच्या वेळेला स्पेसिफीक मागण्या दिल्या होत्या. पण त्यानंतर प्रशासनाने कोणताही विचार केलेला नाही, कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली नाही, तहकुब केला याचा अर्थ प्रशासन काय घेतो, विषय आपसात बांधुन गुंढाळुन ठेवुन घ्यायचा. मग जेव्हा असे विषय प्रशासनाच्या नाका-तोंडाशी येते त्यावेळेला या अशा प्रकारचे डॉकेट बनवुन आपल्याकडे पाठवुन देतो.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ताई त्या मक्तेदाराला काम द्यायचे असेल, नाही असेल किंवा तो विषय वेगळा आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** मक्तेदाराला काम देण्याबद्दलचा काहीच विषय नाहीये. पुढच वाढीव काम त्याच मक्तेदारालाच द्यायच असेल. तर प्रशासनाने द्याव. प्रशासनाचा जर तो इतका लाडाचा मक्तेदार असेल तर प्रशासनाने कशी निविदा प्रक्रीया मॅनेज करावी आणि त्यालाच ते काम मिळेल अस बघाव पण हे सगळ कायदेशीर मार्गाने कराव.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मी तेच म्हणतो आहे ना

**ॲड.शुचिता हाडा :-** आमच्या गळयाला गळफास लावुन हे काम करू नये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ताई मी काय म्हणतो आपण निर्णय घेतांना हा तातडीने हा असा निर्णय घ्यावा की जेणेकरून चुकीच्या पध्दतीने असेल तर तो रद्द करण्यात यावा. या मक्तेदाराला काम नाही द्यायचे असेल तर तो रद्द करण्यात यावा.परंतू जर कधी तातडीने नविन निविदा प्रक्रीया राबवायची असेल तर तसा निर्णय धोरणात्मक पध्दतीने घेण्यात यावा.

**ॲड.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ आपण बघत आहात मागच्या सभेत मी बोलली होती.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना

**ॲड.शुचिता हाडा :-** आता जुलै मध्ये याला एक वर्ष होवुन जाईल भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- कारण काय आहे की हा विषय अविरत असाच चालत राहील.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई, आयुक्त महोदया आमची मागणी आजही तीच कायम आहे की हे कायद्याने करता येत नाही. नव्याने निविदा प्रक्रीया राबवा आणि कायदेशीर मार्गाने हा विषय मार्गी लावा

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई याच्यामध्ये दोन्हीही ऑप्शन दिलेले आहेत आणि याच्यात काय होत आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** भाऊ त्याचेही ऑप्शन कन्फ्युजींगच आहे नितिनभाऊ कारण काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही काय आहे की

**ॲड.शुचिता हाडा :-** त्यामुळे आज आमच्या प्रशासनाने जो प्रस्ताव दिलेला आहे माझा या विषयाला विरोध आहे आणि हा विषय नामंजुर करण्यात यावा अशी मी भारतीय जनता पार्टीतर्फे एकमुखाने मागणी करते.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई आपण याच्यासंदर्भात निर्णय तोच घेवु ना की सदरहु मक्तेदाराच काम रद्द करण्याच्या संदर्भातील भुमिका सभागृहाने स्विकारावी आणि तदनंतर नविन निविदा प्रक्रीया राबवुन आणि तातडीने या निधीचा युटिलाईजेशन करण्यात याव.

**ॲड.शुचिता हाडा :-** युटिलाईजेशन कराव आमचीही हिच मागणी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे काय होत की इतक्या दोन अडीच वर्षापासुन आलेला निधी आपण युटिलाईज करू शकत नाही याच्यामुळे आपली प्रतिमा शासनाकडेही खराब होत आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** निश्चितच खराब होत आहे.

**मा.उपमहापौर** :- महापौर महोदया याच्यामध्ये तर सी.बी.सी गाईडलाईन्स मध्ये अस नमुद आहे की आपण दराचे १२५% पर्यंत म्हणजे २५ % पर्यंतचे अधिकचे जे काम करून घ्यायच आहे. तर ते त्याच दराप्रमाणे करून घ्यायच आहे. वाढीव दराने करून घेता येणार नाही असे स्पष्ट निर्देश आहे का ?

**ॲड.शुचिता हाडा :-** नाही करता येणार, वाढीव दराने करताच येणार नाही. घरकुलच्या वेळेचा मुद्दाच हा होता की प्राईज एसकीलेशन त्या वेळीच्या स्टँडींग ने दिल. आणि म्हणुनच ती आपल्याला मुश्कील झाली होती. नितीनभाऊंना चांगल ज्ञात आहे.

**मा.उपमहापौर** :- ताई याच्यामध्ये आपल्याला

**ॲड.शुचिता हाडा :-** प्राईज डेस्टिनेशन आपण करूच शकत नाही. २०१६-१७ च्या रेटनेच आपल्याला कराव लागेल

**मा.उपमहापौर** :- आता जे काम २५ % ने देतोय आपण प्रचलित दराप्रमाणे देवु शकत नाही का

**ॲड.शुचिता हाडा :-** नाही आताच्या प्रचलित दरामध्ये आपण देवु शकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आपण नव्याने निविदा प्रक्रीया राबवुन घेवु.

**मा.उपमहापौर** :- भाऊ नाही नव्याने प्रक्रीया राबवण्याची गरज काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही भाऊ मक्तेदार काय आहे की ते काम करायला तयार नाहीये. म्हणुन वाढीव दराने त्याला काम द्यायच काय आहे की

**ॲड.शुचिता हाडा :-** नाही नितीनभाऊ आपण ही निविदा प्रक्रीया मंजुर केलेली आहे बरोबर, मुळ निविदा जी काम आहे त्याच्या २५ टक्के ॲटम्सनुसार आपण वाढवु शकतो सी.बी.सी गाईडलाईन्स नुसार

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर

**ॲड.शुचिता हाडा :-** २५ टक्के जर आपल्याला काम करायला त्याच रेटने मंजुर मुळ निविदा केलेली आहे त्यानुसारच द्यावे लागतील.

**मा.उपमहापौर** :- नाही ताई २५ टक्के मध्ये बसवता येईल का देता येईल का त्याच्यामध्ये पण आपल्याला एकदा देता येईल का हे पाहु प्रशासनाकडून पाहू जर बसले तर पाहू आपण

**ॲड.शुचिता हाडा :-** हो ना मग प्रशासनाने

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही काय झाल आहे ताई या संपुर्ण विषयामध्ये काय झाल आहे की, संशयाच वातावरण निर्माण झालेल आहे आणि मग संशयाच वातावरण निर्माण झाल्यानंतर मग त्यात पारदर्शकता ठेवलेली जास्त चांगली आहे. आपल्याला माहित आहे की त्याच्यामध्ये मनपाच आर्थिक हित जोपासल जाणार नाही म्हणुन पैसा मनपा आपला जास्त जाईल परंतू काही अंशी ताईंच म्हणण जे आहे. उलट संशयाच वातावरण आणि त्याच्यामध्ये भविष्यात जर कधी काही क्युरीज निघाल्या तर आणि आपण सदस्य असु किंवा नसु आणि मग नंतर या गोष्टींचे कम्पलाईज करण्याकरीता आपल्याला नाकीनाऊ येतील. त्यापेक्षा नव्याने नविन निविदा प्रक्रीया जी आहे ती नव्याने राबवण्यात यावी आणि निधी हा लवकरात लवकर कसा खर्च होईल याच्याबाबतीत प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**मा.उपमहापौर** :- याच्यामध्ये जो फंड आपल्याकडे आता अव्हेलेबल आहे. तर त्याच्यामध्ये प्रचलित दरानुसार करण्यामध्ये आपल्याला काय हरकत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- काय आहे याच्यामध्ये प्रशासकीय दृष्टया १०० टक्के

**ॲड.शुचिता हाडा :-** तो जर १६-१७ नुसार काम करण्यास तयार नाही तर त्याला ते रद्द नाकारू द्या.

**मा.उपमहापौर** :- ताई त्याचा मिडीयेशन आणि ॲप्लीकेशन फाईल केलेल आहे ताई

**ॲड.शुचिता हाडा :-** जाऊ द्या मिडीयेशन आणि ॲप्लीकेशन करू द्या. मिडीयेशन आणि ॲप्लीकेशनला का घाबरतोय आपण , कुलभुषणभाऊ कायदा काय म्हणतो १६-१७ च्या रेटप्रमाणे म्हणजे मुळ निविदेच्या मंजुर दरामध्ये त्याने काम करायला पाहिजे.

**मा.उपमहापौर** :- ताई प्रकल्प राबवला तरी अडचण आहे नाही राबवला तरी अडचण आहे काय करायचे आता

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रकल्प हा राबवला गेलाच पाहीजे. कुलभुषणभाऊ प्रकल्प राबवला गेलाच पाहीजे. परंतू तो कायदेशीर मार्गानेच राबवला गेला पाहीजे. १६-१७ च्या रेटनुसार म्हणजे मुळ मंजुर निविदेच्या रेटनुसार काम करणे हे ठेकेदारावर कायद्याने बंधनकारक आहे. त्याने त्याला नकार दिला तर त्याला कोर्टात येवु द्याना.

**मा.उपमहापौर** :- ताई काय आहे की कुठलही काम सुरू करत असतांना महानगरपालिका प्रशासनाला प्रॉपरली त्या प्रोजेक्टची लाईनआऊट हे दिल्यानुसार केले पाहीजे हे महानगरपालिका प्रशासनाला अपेक्षित असत.

**ॲड.शुचिता हाडा :-** हि प्रशासनाची चुक आहे.

**मा.उपमहापौर** :- ताई आता मला सांगा की हा प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात निर्देश दिलेले आहेत.

**ॲड.शुचिता हाडा :-** मान्य आहे कुलभुषणभाऊ या प्रशासकीय चुका आहेत. या लोकप्रतिनिधींनी केलेल्या चुका नाहीत आणि माझ म्हणण हेच आहे की प्रशासकीय चुकांचा भुर्दंड लोकप्रतिनिधींवर टाकु नका माझी एवढीच रास्त मागणी आहे. १६-१७ च्या रेटनुसार तो नाकारतो आहे ना स्वत: १६-१७ नुसार

**श्री.नितीन लढ्ढा** :- काय आहे ताई निविदा प्रक्रीया जी आहे ना ती पुन्हा नव्याने राबवुन

**मा.उपमहापौर** :- भाऊ विस्तृत चर्चा जी आहे आता त्याचा अहवाल तयार करण्यासाठी याच्यामध्ये जर करत असेल तर उशिर होणार आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** तो करत असेल म्हणुन बेकायदेशीर करायचे का ? १६-१७ नुसार तो करायला तयार नसेल तर त्याला नाकारू द्या ना.

**श्री.नितीन लढ्ढा** :- काय आहे ताई त्याला

**मा.उपमहापौर** :- नाही पण प्रशासनाचे स्पष्ट मत त्याच्यात केव्हा येईल.

**मा.आयुक्त** :- सर ते तसच असत.

**मा.उपमहापौर** :- नाही मॅडम ते तस नसत

**श्री.नितीन लढ्ढा** :- कुलभुषणभाऊ मला काय वाटत काय आहे की आपण हा विषय रद्द करून नव्याने प्रकरण तयार करून नविन निविदा प्रक्रीया राबवावी आणि या निधीचा तातडीने कशा पध्दतीने विनियोग करता येईल याची प्रशासनाने खबरदारी घ्यावी.

**श्री.दिलीप पोकळे** :- महापौरताई ज्यावेळेस त्याला हे काम दिल गेल होत, भाऊ आपण ज्यावेळेस त्याला हे काम दिलेल होत आणि नंतर हे काम व्यवस्थित चालल आणि हा डिपीआर चुकीचा बनला. तर हा डिपीआर चुकीचा बनल्यामुळे त्या समितीने ती चौकशी करावी आणि मॅडम ऐका ना दोन मिनिंट आयुक्त मॅडम, आयुक्त मॅडम, दोन मिनिंट ऐका, डिपीआर चुकीचा बनल्यामुळे त्याला टेन्डर झाले सगळ झाल नंतर लक्षात आल की डिपीआर चुकीचा बनला आहे. आता समितीने त्याच्यावर आक्षेप नोंदविलेले आहेत आणि आयुक्त साहेबांकडे सुनावणी झाली आणि त्या सुनावणीच्या वेळेस काय झाले याची माहिती घेण्यासाठी तो ठराव आपण तहकुब केला होता. ठराव तहकुब ठेवण्याच कारण अंदाज समितीने घेतलेले आक्षेप आणि तुम्ही बनवलेला चुकीचा डिपीआर तर त्याच्यानंतर वेळ गेला. वेळ गेल्यानंतर नियुक्ती झाली हे झाल ते झाल मग याच्यामध्ये दिशाभुल होते आहे ना सभागृहाची १०० टक्के ही प्रशासनाची चुक आहे. डिपीआर राज्य शासनाकडे जातो, तो कुणाकडेही जातो. तर त्याच्यामध्ये आता जे एकमत झालेल आहे की यामध्ये नविन निविदा प्रक्रीया राबवावी. पैसे कमी देण आणि जास्त देण हे दरवेळेस घाबरवता आहे.शहराचा प्रकल्प आहे दोन पैसे जास्त जातील तर काय फरक पडणार आहे. कमीही येवु शकत दरवेळेस काय तेच-तेच आणता. मिडीयेशन टाकुन तो जास्त पैसे मागतो आहे तर तुम्ही त्याला सांगा याच्यापेक्षा जास्त पैसे आम्ही देवु शकते नाही आणि देवुन हा विषय आटपावा.

**ॲड.शुचिता हाडा :-** कायद्याने त्यानुसार काम करण्यास मक्तेदार नकार नसेल तर आपोआप त्याच काम रद्द होणार आहे. खर सांगायच तर आता मी जे नमुद केलेल आहे पत्रामध्ये तर ऑलरेडी त्याची मुदत संपलेली आहे. मला वाटत एप्रिल २०२१ ला त्याची मुदत संपलेली आहे. तर त्याचा मुदतवाढीचा प्रस्ताव प्रशासनाने सभागृहापुढे आणलेला नाही. असही टेक्निकली बघता त्याच काम हे रद्दच झालेल आहे. व्यपगतच झालेल आहे. १६-१७ च्या रेटमध्ये जर तो काम करत असेल तर त्याला मुळ नेमुण दिलेल काम ते करू द्याव. तो नकार देत असेल त्याचा लेखी नकार घ्यावा आणि पुढची निविदा प्रक्रीया राबवावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई या विषयात नविन निविदा काढण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा** :- महापौरताई, शुचितातार्इ जसे म्हणता आहेत ना की १२५ टक्क्यापर्यंतच काम जर कधी मक्तेदार त्यावेळेच्या २०१६-१७ च्या त्यावेळेला निविदा प्रक्रीया झालेली आहे. त्या दरामध्ये तयार असेल करायला तर त्याच्याकडून तेवढ काम करून घेण्यात याव. अन्यथा तातडीने नविन निविदा प्रक्रीया सुरू करण्यात यावी ठिक आहे.

**मा.उपमहापौर** :- सन्मा.सदस्य. नितीनभाऊंनी सुचविलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई , शुचिताताईंनी जे सुचवलेले आहे त्याला भारतीय जनता पक्षाच्या वतीने, आमच्या सगळयांच्या वतीने हे सुचवत आहे आणि याची नोंद व्हावी आणि आमचा विरोध नोंदवण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ताई विरोधाचा याला काही प्रश्न नाहीये.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तशी नोंद घेण्यात यावी फक्त हेच सांगते आहे आणि नंतर बदल होतात.

**सौ.दिपमाला काळे :-** शुचिताताईंनी मांडलेल्या सुचनांची नोंद घेण्यात यावी अस भारतीय जनता पार्टीच्या वतीने सांगते.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई हा जो निर्णय आहे ना ती सर्व सभागृहाची तीच भुमिका आहे नविन निविदा प्रक्रीया सुरू करण्याबाबत तीच भुमिका स्विकारलेली आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नविन निविदाच सुरू करायची आहे ना मग विरोधाचा विषयच नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- भाऊ आता तुम्ही जे बोलले पाठय होवू द्या थोडीशी की १२५ टक्के जर काम होत असेल तर त्याला काम द्याव आणि एकीकडे त्याच ॲग्रीमेंट संपले आहे. मग त्याला कस काय हे वाढीव काम द्यायच. मग सभागृह परत संभ्रमात येतय की हे

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही

**श्री.विशाल त्रिपाठी** :- म्हणजे सभागृह परत संभ्रमात येतोय की.

**ॲड.शुचिता हाडा :-** कोणताही संभ्रम सभागृहाने ठेवु नये. हे क्लियर विषय आहे. मुळ निविदा प्रक्रीया जी आहे त्या मुळ निविदा जी मंजुर केलेली आहे २०१६-१७ नुसार,मुळ निविदेचे मंजुर रेट नुसार मंजुर, काम २५ टक्के ॲटम्समध्ये वाढ करून सी.बी.सी गाईडलाईन नुसार त्याला मंजुरी देता येवु शकते म्हणुन जर ती काम निविदाकार मुळ निविदेतील काम करण्यास तयार असेल तर ती काम त्याच्याकडून करून घेण्यात यावी उर्वरीत सगळ्या कामांसाठी नव्याने निविदा प्रक्रीया राबवावी.

**श्री.नितीन लढ्ढा** :- तो जर २०१६-१७ च्या दरामध्ये काम करायला तयार असेल तर करून घ्यावे असेच म्हणतोय मी

**ॲड.शुचिता हाडा :-** २०१६-१७ चेच दरामध्ये ना

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग

**ॲड.शुचिता हाडा :-** १६-१७ च्या रेट मध्ये जर करायला तयार असेल तरी सुध्दा नविन कामांसाठी नविन निविदा प्रक्रीया ही आपल्याला करावीच लागणार आहे. नविन प्रक्रीया ही पुढच्या नविन कामांसाठी करावीच लागणार आहे.

**मा.उपमहापौर** :- सर्व सदस्यांनी सुचविलेल्या सुचनांना माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्य. नितीनभाऊ आणि सन्मा.सदस्या हाडाताईंनी मांडलेल्या सगळ्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि त्याप्रमाणे कार्यवाही करून नविन निविदा प्रक्रीया राबविण्याची नोंद घेवुन प्रशासनाने कार्यवाही करावी. सर्वानुमते विषय क्रं. १२ हा रद्द करण्यात येत आहे. नामंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव** :- सर्वानुमते नामंजुर आहे हा विषय , रद्द आहे सर्वानुमते

**मा.उपमहापौर** :- याच्यामध्ये काय आहे की प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे तो ऑप्शनल आहे.

**मा.आयुक्त :-** ऑप्शनल दिलेल आहे.

**मा.उपमहापौर:-** आपण जर कधी तो रद्द केला तर क्वचित पुर्ण प्रक्रीया ही नविन राबवायची आहे आपल्याला आणि त्याची नोंद ठरावामध्ये येईल त्यामुळे नामंजुर नाही करता येणार आपल्याला.

**ॲड.शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेब, सुचना दिलेल्या आहेत त्या क्लियरकट सुचना आहेत. आपल्याला लेखी हव असेल तर आमच्याकडून लेखी घेवुन घ्या. मांडलेल्या सुचना

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, शुचिताताई आणि नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनांनुसार करावा.

**नगरसचिव :-** आपण जो विरोध नोंदविलेले आहे, या सुचनांना तर विरोध नाही ना. आता जे विरोध नोंदविले या सुचनांना नाही ना.

**मा.उपमहापौर** :- ताई गोराणे साहेबांचे म्हणणे असे आहे की, सुरुवातीला आपण म्हटले आहे की, सदरील प्रस्तावाला आमचा विरोध आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** विषय नामंजुर करण्याबद्दल म्हंटलेल आहे. हा विषय नामंजुर करणे का नामंजुर करतोय आम्ही की प्रशासनाने प्रस्ताव दिलेला होता की वाढीवच काम त्याला द्यायच हा मुद्दा आम्ही नामंजुर केला बरोबर, प्रशासनाचा एक प्रस्ताव आहे की १६-१७ च्या रेट प्रमाणे १२५ पर्यंतची कामे त्याच्याकडून करून घ्यायची हेच आमच पुर्वीपासुनच आमच म्हणण आहे. १२५ टक्क्यापर्यंत जर तो १६-१७ च्या रेटमध्ये जर तो करायला तयार असेल तर मुळ निविदेच्या मंजुर दराप्रमाणे तर करून घ्या. जर तो नकार देत असेल तर त्याचा नकार रेकॉर्डवर घ्या. त्याचा नकार रेकॉर्डवर आल्यानंतर नविन निविदा प्रक्रीया राबवा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मा.महापौरताई त्यावेळेला आपण हा प्रस्ताव करणार ना त्यावेळेला आपण बसुन याच्यामध्ये कुठे शब्द रचनेच्या कुठे काही अनुषंगाने

**ॲड.शुचिता हाडा :-** बसुन बोलु या

**श्री.नितीन लढ्ढा** :- जर वर खाली होत असेल तर ते दुरूस्त करून नंतर अंतिम करूया.

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रशासनाला पुर्ण सहकार्य राहील त्यासाठी आमचे त्यानंतर आपण त्या अनुषंगानेच ठराव करू.

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्या अनुषंगाने करून घेवु.

**मा.महापौर :-** काय म्हणायचे.

**मा.आयुक्त :-** सुचनेनुसार मान्य.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १२ सन्मा. सदस्यांच्या सुचनेप्रमाणे मान्य करण्यात येत आहे. पुढचा विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१११२ पारित करण्यात आला.**

स.नं.८६४ आव्हाणे शिवार येथे घनकचरा प्रकल्पाचे कामी मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांनी मे.न्यायालयात दाखल केलेल्या तडजोडीच्या दाव्याच्या अनुषंगाने प्रकरणी बाजू मांडणेबाबत निर्णय घेणेसाठी दिनांक २१/०३/२०२३ रोजी महासभेत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी महासभेने महासभा ठराव क्र.१०२५ दि.२१/०३/२०२३ प्रस्ताव तहकूब केलेला असून या प्रकरणी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिका विधी सल्लागार यांचे सदर प्रकरणी परिपूर्ण व कायदेशीर स्पष्ट मत घेवून पुढील महासभेत तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. मध्यंतरीच्या कालावधीत निविदा तरतूदीनुसार वाढीव परीमाणाचा व अंदाजपत्रकातील १२५% वरील परिमाणे प्रचलित दरसूची नुसार सुधारीत प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी शासनास मा.प्रधान सचिव,नगरविकास विभाग यांना दिलेले पत्र क्रं.जमनपा/२१८८/२०२३ दि.१२/०१/२०२३ नुसार सादर केलेला होता. सदर प्रस्तावास शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०२३/प्र.क्रं.३८/नवि-३४ दिनांक २०/०३/२०२३ अन्वये शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर प्रकरणी, निर्देशांनुसार विधी सल्लागार यांचे अभिप्राय दि.१६/०५/२०२३ रोजी प्राप्त झालेले आहे. सदर प्रकरणी तांत्रिक मुदयांच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जळगांव यांचेकडून अभिप्राय मागविलेले होते. त्यानुसार त्यांचे अभिप्राय दि.०८/०५/२०२३ रोजी प्राप्त झालेले असून त्यात नमूद केलेप्रमाणे,

१) सदर कामाची निविदा रक्कम रु.१२.१४ कोटी कार्यादेश रकमेपेक्षा जास्त रु.३०.३९ कोटी झालेली असून कलम ३७ नुसार वाढीव कामास शासनाची मान्यता मिळालेली असल्याने वाढीव खर्चाची कामे नियुक्त मक्तेदाराकडून मनपाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर करुन घेता येईल.
२) निविदेतील बाबी अधिक २५% पर्यंतची परीमाणे (१२५%) यांची अदायगी मक्तेदार यांचे मागणी प्रमाणे सन २०२२-२०२३ च्या दरसुचीनुसार देणे योग्य होणार नाही.

विधी सल्लागार यांचे अभिप्रायातील/ मत मुख्य मुद्दे पुढील प्रमाणे-

- मक्तेदाराकडून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कडेस तडजोड करण्याचा प्रयत्न म्हणून मध्यस्थाकडे अर्ज सादर केलेला आहे. सुनावणी दरम्यान मध्यस्थांनी आदेशित केलेनंतरच लेखी म्हणणे सादर करणे योग्य होईल.
- मध्यस्थांसमोरील सुनावणी अंती तडजोड न झाल्यास, केवळ सदर प्रकरणी तडजोडीचा प्रयत्न झाला परंतु तडजोड होवू शकली नाही एवढेच निष्पन्न होईल व यापुढे मक्तेदाराने मे.न्यायालयात दावा दाखल केल्यास, नियमित प्रक्रियेनुसार दाव्या प्रकरणी कार्यवाही करता येईल.
- महासभा ठराव क्रं.७४० दि.१४/०२/२०२२ नुसार व महासभा ठराव क्रं.१०२५ दि.२१/०३/२०२३ नुसार मक्तेदार, महानगरपालिका यांचेत झालेल्या कराराचे, पत्रांचे, नोटीसींचे व या क्षेत्रातील तज्ञ कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जळगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाचे एकत्रितरित्या अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की, कराराच्या अट क्रं.३७ नुसार वाढीव कामास शासनाची मान्यता मिळालेली असल्याने वाढीव खर्चाची कामे नियुक्त मक्तेदाराकडून महानगरपालिका सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवून करुन घेता येईल. मक्तेदाराच्या मागणी नुसार निविदेतील २०१६-१७ चे मंजूर दराऐवजी सन २०२२-२३ च्या दरसूचीनूसार परीमाणांची अदायगी करावी ही मागणी करारानुसार नसल्याने मान्य करता येणार नाही. सबब करारातील अट क्रं.३७ नुसार मंजुर निविदेतील १२५% पर्यंतची परीमाणे ही निविदेतील मंजूर दर (२०१६-१७) प्रमाणे अदायगी करणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी विधी सल्लागार, कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग जळगांव यांचे अभिप्राय पाहता,

१) शासनाच्या शासन निर्णय क्रं.स्वमअ-२०२३/प्र.क्रं.३८/नवि-३४ दिनांक २०/०३/२०२३ अन्वये प्राप्त सुधारीत मान्यतेनुसार (१२५%पर्यंतची परीमाणे निविदा मंजूर दरानुसार [२०१६-१७] व त्यापुढील परीमाणे प्रचलित दरसूची २०२२-२३ वर ४.९१% कमी दराने) मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद काम करणेस तयार असल्यास त्यांचे कडून करुन घेण्यास येणारा वाढीव खर्च रु.३.८१ कोटी खर्चास मान्यतेस सादर.

२) उपरोक्त क्रं.०१ नुसार मक्तेदार काम करण्यास तयार नसल्यास, मान्यतेतील एकुण कामांपैकी आवश्यक अशी कामे मक्तेदार यांचेशी चर्चा करुन पूर्ण करुन घेण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करुन निश्चिती करणेस मान्यतेसाठी सादर किंवा प्राप्त निधीपैकी शिल्लक निधीतून आवश्यक कामे नव्याने निविदा प्रक्रिया राबवून करुन घेण्यास व उर्वरीत कामे स्वच्छ भारत अभियान २.० मध्ये नव्याने प्रस्तावित करुन पूर्ण करणेस मान्यतेसाठी सादर. याप्रमाणे विभागाचा अभिप्राय आहे.

महासभा ठराव क्रं.७४० दि.१४/०२/२०२२ नुसार व महासभा ठराव क्रं.१०२५ दि.२१/०३/२०२३ नुसार मक्तेदार व महानगरपालिका यांचेत झालेल्या करारनाम्याचे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जळगांव यांचे दि.०८/०५/२०२३ रोजीचे तांत्रिक अभिप्राय, तसेच मनपा जळगांव प्रमुख विधी सल्लागार यांचे दि.१०/०५/२०२३ रोजीचे कायदेशीर अभिप्राय यांचे एकत्रितरित्या अवलोकन केले असता, मक्तेदार व मनपा जळगांव यांचेतील करारनाम्यातील अटीनुसार वाढीव कामास शासनाची प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने वाढीव खर्चाचे काम मक्तेदाराकडुन सक्षम प्राधिकरणाची मंजूरी मिळालेली असल्याने करुन घेता येईल. तथापि, करारनाम्यातील अटीनुसार सदर मक्तेदाराकडून मंजूर निविदेच्या १२५% पर्यंतची परीमाणे ही निविदा मंजूर दरानुसार म्हणजेच सन २०१६-१७ च्या दरसूचीनुसार अदायगी करणे आवश्यक आहे.

एकुण १२५% बाबींचे (मूळ निविदेतील बाबी अधिक २५%) परीमाणाची सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार केलेली मक्तेदाराची मागणी व त्यानुसार अदायगी करणे योग्य होणार नाही, याबाबत

भविष्यात लेखापरीक्षण आक्षेप देखील निघण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय आहे.

असा ठराव करण्यात येतो की, उपरोक्त प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्य तसेच मा.महापौर तथा पिठासिन अधिकारी यांनी केलेल्या सूचनेनूसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे कामी मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद हे मुळ मंजुर निविदेतील कामे + २५% वाढीव परिमाणे १२५% पर्यंतची परिमाणे सन २०१६-१७ च्या मंजूर निविदा दरानूसार काम करायला तयार असल्यास त्यांचेकडून मुळ निविदेच्या मंजूर दराप्रमाणे काम करुन घेणेस तसेच मंजूर निविदा दराप्रमाणे निविदाधारक काम करायला नकार देत असल्यास तातडीने वाढीव व उर्वरीत सगळया कामांसाठी नविन निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. वाढीव कामांसाठी मात्र नविन निविदा प्रक्रियाच राबवावी.

प्रशासनाने उपरोक्त संबंधीत शिल्लक निधीचा तातडीने कश्या पध्दतीने विनियोग करता येईल याची खबरदारी घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**नगरसचिव , विषय क्रं. १३** :- नविन बस स्टॅन्ड शेजारील भजे गल्लीतील चौकात शिलान्यासाच्या ठिकाणी “महात्मा बसवेश्वर चौक ” नांव देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- सदर प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १३ सर्वानमुते मान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१११३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महात्मा बसवेश्वर लिंगायत समाज बहुउद्देशिय संस्था जळगांव यांनी नविन बस स्टॅन्ड शेजारील भजे गल्लीतील चौकात शिलान्यासाच्या ठिकाणी “महात्मा बसवेश्वर चौक ” नांव देणे बाबत मागणी केलेली आहे.

नविन बस स्टॅन्ड शेजारील भजेगल्लीतील चौकास या पूर्वी कोणतेही नांव दिले नाही असे अभिलेख पाहता आढळुन येते. तसेच सदर मार्गास “महात्मा बसवेश्वर मार्ग ” असे नांव दिलेले असल्याचे आढळुन येते. त्यामुळे सदर चौकास “महात्मा बसवेश्वर चौक ” असे नामकरण करणेस खालील अटी व शर्तीनुसार परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) सदर चौकास या पूर्वी कोणतेही नांव दिलेले असल्यास सदर प्रस्तावास स्थगिती देण्यात येईल.
२) या बाबत कोणत्याही नागरिकांनी अथवा संस्थेने हरकत घेतल्यास सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येईल.
३) चौकाचे नामकरण करतांना वाहतुकीस व रहदारीस अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी.
४) सदर चौकाचे सुशोभिकरणाचे काम आपल्या संस्थेमार्फत करण्यात यावे त्यासाठी मनपा कोणताही खर्च करणार नाही.

वरील अटी व शर्तीस बंधनकारक राहुन नविन बस स्टॅन्ड शेजारील भजे गल्लीतील चौकात शिलान्यासाच्या ठिकाणी “महात्मा बसवेश्वर चौक ” नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. १४**:- उप विभागीय अधिकारी सार्व.बांधकाम विभाग, जळगांव यांच्या मार्फत दि.१०/०५/२०२३ च्या पत्रातील नमुद १ ते ०८ कामांना ना-हरकत दाखला देण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मनपा हद्दीत काम करत आहे म्हणुन एन.ओ.सी.द्यायची आहे त्यांना. ते काम करायला काही हरकत नाही.

**ॲड.दिलीप पोकळे :-** ते काय आहे तसे कळवा ना सभागृहाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभागृह.

**ॲड.दिलीप पोकळे :-** याच्या आदी पण त्यांनी कामे केलेली आहे. मग त्याला ना-हरकत का घेतली नाही. याच्या आदी एवढी कामे केली त्यांनी त्याला ना-हरकत का घेतली नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ही सार्वजनिक बांधकाम विभागाची यंत्रणा आहे आणि महापालिकेच्या क्षेत्रातील कामे असल्यामुळे महापालिकेने महासभेत ठराव करुन एन.ओ.सी. दिली तरच त्यांना प्रशासकीय मान्यता मिळेल.

**ॲड.दिलीप पोकळे :-** आता मला सांगा सोनगिरे साहेब, ही जी यादी आपल्याकडे आलेली आहे.या यादी विषयी सांगा,

**श्री.**सचिन पाटील :- अरे १५ वा विषय आहे बापु तो.

**ॲड.दिलीप पोकळे :-** १४ व १५ सारखे विषय आहे. आता याच्यामध्ये प्रभाग क्र.१ तर नाहीच.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** १०० कोटीचा विषय आहे तो भाऊ त्याच्यातुन ते काम होणार आहेत.

**ॲड.दिलीप पोकळे :-** मी कॉमनली बोलत आहे. आपल्याला एन.ओ.सी. कोणाला द्यायची आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** बी ॲण्ड सी ला.

**ॲड.दिलीप पोकळे :-** कशाबद्दल दिली आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्या-त्या प्रभागात काम करण्यासाठी, आपल्या प्रभागात त्यांना काम करण्यासाठी आपली कुठलीही हरकत नाही.

**ॲड.दिलीप पोकळे :-** ज्या बी ॲण्ड सी ला. माझ्या प्रभागाची जी माहिती दिली आहे. त्याला मी काय करू, त्याला मी काय करू शकतो ते समजावुन सांगा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही विषय असा आहे की १०० कोटींच्या बाबतीत जर बोलायच झाल तर

**ॲड.दिलीप पोकळे :-** मी पॉलीसीवर बोलतोय, महापालिकेच्या पॉलीसीवर बोलतोय.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आज जे काम चालु आहेत हे पुर्ण शहरातील प्रमुख रस्ते आहेत. हे कुठलेही प्रभागातले किंवा वार्डातले नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण जळगांव शहरात मनपा हद्दीमध्ये कुठलेही काम करतांना सार्वजनिक बांधकाम विभागाला काम करतांना महानगरपालिकेची ना-हरकत घेणे गरजेचे आहे. आणि त्याची मागणी त्यांनी केलेली आहे. आणि मला वाटते काही गैर नाही, योग्य विषय आहे. फक्त याच्यातले मा.आयुक्त महोदया, याच्या मधला विषय क्र.८ जो आहे. रस्त्यांचे संदर्भातला, राष्ट्रीय मार्ग क्र.४० ते राष्ट्रीय मार्ग क्र.७५३ ही जाणारा रस्ता किलो मिटर ००३ ची सुधारणा करणे, आता याच्यात सेक्टर-६ आणि ७ मध्ये ही जागा आहे. मुळात याच्या संदर्भातली जागा आज आपल्या ताब्यात नाही. निधी मंजुर झालेला आहे. आनंदाची गोष्ट आहे काही अडचण नाही.परंतु या कामाची अंमलबजावणी होणे कामी रस्त्यासाठी जमिन एरियाच्या मोबदल्यात उच्च न्यायालयाने सुध्दा निवाडा दिलेला आहे. आणि टी.डी.आर.च्या मोबदल्यात सेक्टर - ६ आणि ७ मधील जमिनी या तातडीने मनपाने ताब्यात घेण्याच्या संदर्भातली सुचना मी यापुर्वी ही सभागृहात मांडली होती. आपल्याला याच्यासाठी एक विशेष पथक तयार करावे लागेल. त्या जमिनी ताब्यात मिळतील त्यानंतर कामाला सुरुवात करता येईल. नाही तर काय होईल निधी आलेला असेल, आणि जमिनीच ताब्यात नसतील, तर पुन्हा त्या कामांना विलंब होईल. या जमिनी तातडीने ताब्यात घेणे संदर्भात टी.डी.आर.च्या संदर्भात मनपा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी.आणि त्या पध्दतीने कार्यवाही करावी. विषय क्र.१४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१११४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, उप विभागीय अधिकारी सार्व.बांधकाम (बांध) उपविभाग,जळगांव यांचे पत्र क्रं.साबा/(बांध)उविज/४९८/सन २०२३ दि.१०/०५/२०२३ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमुद ०१ ते ०८ कामे हे जळगांव महानगरपालिका क्षेत्रातुन जाणारे रस्ते असल्याने सार्व.बांधकाम विभागाकडील फेब्रुवारी २०२३ च्या अर्थसंकल्पात मंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व.बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन नाहरकत प्रमाणपत्र व महानगरपालिकेचे सभेचे ठराव मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने सदरचे रस्ते मनपाच्या ताब्यात आहे किंवा कसे याबाबत नगररचना विभागाकडुन अभिप्राय मागविला असता नगर रचना विभाग यांनी खाली नमुद कामांच्या समोर दर्शविल्या प्रमाणे त्यांच्या कडील पत्र क्रं.जा.क्रं.नर/३१४/२०२३ दि.१९/०५/२०२३ अन्वये अभिप्राय दिलेला आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लक्ष) | नगररचना यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | जळगांव जिल्हयातील रा.मा.क्रं.०६ पासुन बांभोरी- निमखेडी- जळगांव- आसोदा- भादली रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रं.५९ किमी ५/०० ते ८/०० ची सुधारणा करणे ता.जळगांव जि.जळगांव (भाग निमखेडी ते सुरत रेल्वे गेट) | ९००.०० | सदरील रस्ता हा जळगांव महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीत समाविष्ट असुन सदरचा रस्ता २४.०० मी रुंद (जुना हायवे) दर्शविलेला आहे. प्रत्यक्ष जागेवरील रस्ता असल्याने विकास करणेस हरकत नाही. |
| २. | जळगांव ते गिरणा पंपींग रस्ता प्रजिमा-५५ किमी ०/०० ते २/०० ची सुधारणा करणे ता.जळगांव (भाग- वाघनगर स्टॉप ते गिरणा पंपींग) | ७००.०० | सदरील रस्ता हा जळगांव महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीत समाविष्ट असुन सदरचा रस्ता १८.०० मी रुंद वि.यो.रस्ता दर्शविलेला आहे. प्रत्यक्ष जागेवरील रस्ता असल्याने विकास करणेस हरकत नाही. |
| ३. | जळगांव जिल्हयातील रा.मा.क्रं.०६ पासुन बांभोरी निमखेडी जळगांव आसोदा भादली रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रं.५९ किमी ८/०० ते ११/५०० ची सुधारणा करणे ता.जळगांव जि.जळगांव (भाग दुध फेडरेशन ते टॉवर चौक मार्गे आसोदा रेल्वे गेट) | १२००.०० | सदरील रस्ता मनपा जुनी व वाढीव हद्दीत समाविष्ट असुन प्रत्यक्ष जागेवरील रस्ता असल्याने विकास करणेस हरकत नाही. |
| ४. | जळगांव कलेटोरेट रस्ता प्रजिमा-५४ किमी ०/०० ते ३/२२० ची सुधारणा करणे ता.जळगांव जि.जळगांव (टॉवर चौक ते काव्यरत्नावली चौक) | २५००.०० | सदरील रस्ता हा जळगांव महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीत समाविष्ट आहे. सदरचा रस्ता अस्तिवातील रस्ता आहे. प्रत्यक्ष जागेवरील रस्ता असल्याने विकास करणेस हरकत नाही. |
| ५. | जळगांव मोहाडी धानोरा शिरसोली दापोरे लमाजन म्हसावद दहिगांव वरसाडे माहेजी गिरड पिंपळगांव भाडगांव महिंदळे टिटवी मंदाणे तामसवाडी तरडी उंदीरखेडा पारोळा रस्ता प्राजिमा-३९ किमी ०/०० ते ३/०० चे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता.जळगांव (भाग नुक्कड कॉर्नर ते खुबचंद साहित्या नगर) | ५००.०० | सदरील रस्ता मनपा जुनी व वाढीव हद्दीत समाविष्ट असुन जुन्या हद्दीतील अस्तित्वातील रस्ता असुन वाढीव हद्दीत १८.०० मी रुंद वि.यो.रस्ता दर्शविलेला आहे. प्रत्यक्ष जागेवरील रस्ता असल्याने विकास करणेस हरकत नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | पहुर जळगांव इंदौर रस्ता रा.मा.४२ किमी ३९/६०० ते ४०/६०० ची सुधारणा करणे ता.जळगांव (भाग अजिंठा चौफुली ते टॉवर चौक) | ३५०.०० | सदरील रस्ता मनपा जुन्या हद्दीत समाविष्ट आहे. प्रत्यक्ष जागेवरील रस्ता असल्याने विकास करणेस हरकत नाही. |
| ७. | चोपडा खेडी भोकर रस्ता रा.मा.४० किमी ५०/९०० ते ५२/०० ची सुधारणा करणे ता.जळगांव (भाग) श्रीकृष्ण लॉन्स ते रायसोनी कॉलेज पर्यंत | ३५०.०० | सदरील रस्ता मनपा वाढीव हद्दीत समाविष्ट आहे. प्रत्यक्ष जागेवरील रस्ता असल्याने विकास करणेस हरकत नाही. |
| ८. | रा.मा.४० ते रा.म.७५३ एफ ला जोडणारा रस्ता किमी ०/०० ते ३/०० ची सुधारणा करणे ता.जळगांव (भाग- श्री कृष्ण लॉन्स ते गितांजली केमिकल्स एम आय डी सी पर्यंत) | १०००.०० | सदरील रस्ता मनपा वाढीव हद्दीच्या वि.यो.शिट नं.०६ व ०७ (सेक्टर नं.०६) मध्ये समाविष्ट आहे. प्रस्तावित रस्ता मनपाचे ताब्यात नसल्याने सदरचा रस्ता प्रथमत: मनपाचे ताब्यात आल्यावरच प्रत्यक्ष जागेवर विकास करणे शक्य होईल. |

वरील प्रमाणे सार्व.बांधकाम विभागास अ.क्रं.०१ ते ०८ कामांना ना हरकत दाखला देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार अ.क्रं.०८ मध्ये नमूद रस्त्याची जागा ताब्यात घेण्यासाठी प्रशासनाने टि.डी.आर.देवून तातडीने मनपाचे ताब्यात घेणेकामी कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. १५**:- शासनाच्या रक्कम रु.१००.०० कोटी निधी अंतर्गत शहरातील विविध भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण सार्व.बांधकाम विभाग, जळगांव यांच्या मार्फत करण्याच्या कामास ना-हरकत दाखला देण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला फक्त आता एकच सांगायचे आहे. जसा आता रिंग रोड आहे. बुध विहारापासुन ते कानळदा रस्त्यापर्यंतचा विषय आहे. मागच्या सहा महिन्यापासुन चालु आहे. तो रस्ता आपल्याला बनवायचा आहे बनवायचा आहे. आता ते नाही म्हणत आहे तर आपल्याला ३-३.५ कोटी रुपये मागत आहे. मग बी ॲण्ड सी वाल्यांनी त्या रस्त्याचे सर्वेक्षण का केला नाही. आपल्याला का कळविले नाही की, हा रस्ता घेण्यात आलेला नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** बरोबर आहे, आपण मागच्या वेळेला जेव्हा कलेक्टर साहेबांनी बैठक घेतली होती. सर्व हिस्ट्री आपल्याला माहिती आहे. पुर्वी या रस्त्यासाठी १०० कोटीमध्ये डांबरी करण्याचे प्रकरण तयार झाले होते. नंतर सांगितले की, कॉंक्रीटचे रस्ते करा. आणि त्या कॉंक्रीट रस्त्यांसाठी ज्या वेळेला जिल्हाधिकारी साहेबांकडे बैठक झाली. त्या वेळेला आपल्याला सांगितले होते की, आमच्या काही भागांमध्ये, ज्या भागांमध्ये अंडरग्राऊंड ड्रेनेज बाकी आहे वगैरे या सर्व गोष्टी त्या बैठकीत झाल्या होत्या. आणि कुठले रस्ते समाविष्ट करायचे. त्याचे बोध आम्हालाच नव्हते. त्यांनी प्रशासनाला देखील विचारलेले नव्हते. ज्या वेळेला त्यांना विचारले गेले तेव्हा त्यांनी असे सांगितले की, आम्ही प्रत्येक प्रभागात जाऊन सन्मा.सदस्यांना भेटुन त्यांच्याकडुन रस्त्यांची यादी घेतलेली आहे. त्या रस्त्यांची पाहणी करुन आम्ही त्याचा समावेश केलेला आहे. पण बऱ्याच नगरसेवकांना विचारल्यानंतर अनुभव असा मिळाला की, आम्हाला कोणीच भेटलेले नाही. पण काही नगरसेवकांना भेटलेले आहे. काहींना भेटले नसतील. याच्यामध्ये त्यांनी अ,ब,क,ड,ची यादी दिलेली आहे. आपल्याकडे अशी कुठलीही यादी दिलेली नाही. आपल्याकडे एकच वार्ड आहे. परंतु त्यांनी ही रस्त्यांची कामे केल्यानंतर, ज्या वेळेला ते एन.ओ.सी. मागायला आले. त्या वेळेला आपण त्यांना डिटेल रस्त्यांची नावे मागितली. ती त्यांनी दिली ती आम्ही तुमच्याकडे सादर केलेली आहे. आता याच्यामध्ये जर काही बदल करायचा आहे. बघा ही रस्त्यांची नावे फक्त माहितीसाठी दिलेले आहे. बघा जे दिलेले हेडींग आहे. प्रभाग

क्र.१ मध्ये रस्त्यांची कामे करणे, ही हेडींगच एन.ओ.सी.साठी लागणार आहे. पण इंटरनल आपल्याला माहिती पाहिजे की, आपण ही यादी मागविलेली होती. त्याच्या मध्ये एखाद्या सन्मा.सदस्याला एखादे काम बदलुन घ्यायचे असेल त्यासाठी तुम्हाला बी ॲण्ड सी शी संपर्क साधुन करुन घ्यावे लागेल.

(एकाच वेळी सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना कोण काय बोलले ते समजले नाही.)

**ॲड.दिलीप पोकळे :-** एन.ओ.सी. दिल्यानंतर आपले काय संबंध.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही, आपले काही राहणार नाही. आणि मागच्या वेळेस आपल्या आमदार महोदय यांनी बैठक घेतली होती. त्यावेळेला नितीनभाऊंनी हेच सांगितले होते की, या प्रभागांमध्ये, अनेक प्रभागांमध्ये अंडरग्राऊंड ड्रेनेजची कामे झालेली नाही. तर त्यावेळेला बी ॲण्ड सीच्या सोनवणे साहेबांनी हे सांगितले होते की, आम्ही त्याची पण प्रोव्हीजन करणार आहोत. रस्त्याच्या सेंटरला २ ते ३ मिटर पर्यंत डांबरीकरण करु. किंवा पेव्हर ब्लॉक करु. तसा ठरावामध्ये आपण स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, ज्या भागात अंडरग्राऊंड ड्रेनेज झालेले नाही. त्या भागांमध्ये भविष्यात अंडरग्राऊंडची प्रोव्हीजन होऊ शकेल अश्या प्रकारे ते करण्यात यावे.

**ॲड.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, माझी अशी मागणी आहे. या कामांना महानगरपालिकेचे कुठे ना कुठे तरी नियंत्रण पाहिजे. आपले इंजिनिअर तेथे सुपरव्हिजनला पाहिजे. बी ॲण्ड सीचे लोकं केव्हा वार्डात येतात केव्हा जातात.आम्हाला माहिती नाही. त्यांचे नंबर आम्हाला माहित नाही. त्यांचे रिस्पॅन्स मिळत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझ्या वार्डातले ४ रस्ते आहे. तुम्ही पाहायला चला जे रस्ते चांगले आहे ते याच्यात आलेले आहे. आम्ही हे म्हणत नाही रस्ते केले नाही. पण जेथे नाही आहे ते टाकायला पाहिजे ना. हे रस्ते आहे ना तेथे. चांगले रस्ते आहे.

**ॲड.दिलीप पोकळे :-** १०० कोटीचा निधी हा महापालिकेला मिळत आहे.महानगरपालिकेचे कामे होत आहे. आणि महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, आयुक्त कोणाचेच त्याच्याशी संबंध नाही.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया, आयुक्त महोदया, विषय क्र.१५ मध्ये कॉंक्रीट रस्त्यांचे आपण घेतलेले आहे. आपले जळगांव शहराचे लाडके आमदार राजुमामा भोळे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सर्वांनी कॉंक्रीट रस्ते करावे. हे अतिशय चांगले उपक्रम आहे की, जेणे करुन येणाऱ्या महासभांमध्ये भविष्यात रस्त्यांच्या बाबतीत बोलायची गरज पडणार नाही. परंतु येथे असे जे म्हटलेले आहे. ४२ रस्त्यांची कामे जी म्हटलेली आहे. त्या मलनिस्सारण योजना भुमिगत गटारींची जेथे प्रस्तावीत होणार आहे. त्या ठिकाणीचे धोरण आता जे तुम्ही बोलले सोनगिरे साहेब की, सोनवणे साहेब बांधकाम चे २ मिटर ३ मिटर, आणि सायमलटेनियस तुम्ही असे ही बोलले की, ही यादी टेन्टेट्यु आहे. मग ही यादी महासभेपुढे आणली का ? चुडा खाण्याकरीता आणली आहे का ही यादी.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आपण ही यादी याच्यासाठी उपलब्ध करुन दिली की, आपल्याला अंदाज आला पाहिजे की, कुठल्या वार्डातुन कुठल्या कामांना आपण एन.ओ.सी. देत आहोत. सोनगिरे साहेब आपण लिखीत अधिकारी आहे. बापु, बापु,

**ॲड.दिलीप पोकळे :-** आम्हाला नगरसेवक म्हणुन जे काही अधिकार दिलेले आहे. त्यात स्पष्ट म्हटलेले आहे त्या अधिकार दिलेले आहे कामे सुचविण्याचे. त्या अधिकारात स्पष्ट म्हटलेले आहे की, कामे सुचविणे, हे काम जर आम्ही सुचविलेले नाही तर आम्ही कसे यादी घेणार.

**श्री.सचिन पाटील :-** बापु, बापु, तुम्ही जी सुचना दिलेली आहे की, भुमिगत गटारी त्या ठिकाणी होतील, त्या ठिकाणी आपण प्रोव्हीजन करु. पण जळगांव शहरामध्ये असे ही काही विस्तारीत एरिया आहे. पावसाळयाच्या दिवसात चालणे ही मुश्कील आहे. म्हणजे आपण एका बाजुला कॉंक्रीटचे रस्ते कराल. आणि एका बाजुला चालणे मुश्कील होईल असे रस्ते आहेत. म्हणजे हा किती विरोधाभास आहे. आणि या विरोधाभासाला कसे सामोरे जायचे. फक्त आम्हालाच जाव लागत ते. माझ्या प्रभागातील रस्ते घेतले आहे. चांगली गोष्ट आहे. ७ब मधुन ७क मधुन रस्ते घेतलेले आहे. त्यातील एक नाव वाचतो मी फक्त उदय कॉलनी रोड, तुमचे सोनवणे ज्या पण दिवशी घेऊन याल अधिकाऱ्याला, मी पण उपस्थित राहील सोनगिरे साहेब, ६ मिटरची गल्ली आहे. भुमीगत गटारी करतांना काय तुम्ही मार्जीन सोडणार आहे. तुम्ही मार्जीन काय सोडणार ६ मिटरच्या रस्त्यामध्ये. तुमची आजच गटार ३ मिटरची चालली गेलेली आहे. ४.५ मिटर रस्ता उरला आहे. ४.५ मिटर मध्ये भुमिगत गटार करतांना ३ मिटर कोरला जाईल.हा कोणता इंजिनिअर आहे. त्याला महासभेपुढे आणा पहिले. कोणता सार्वजनिक बांधकामचा इंजिनिअर आहे. ज्याची पैसे खाण्याकरीता अक्कल वाहुन चालली आहे. कॉंक्रीट रस्ते, कॉंक्रीट रस्ते तर. एका बाजुला डांबरी रस्ते करा ना चांगल्या प्रकारे, हे काय लावला उपक्रम, याच ७ नंबर प्रभागामध्ये लोकं आम्हाला बोलतात की, भाऊ तिकडे कॉंक्रीटचे रस्ते बनत आहे आपल्याकडे डांबरी बनत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** आता सोनगिरे साहेबांनी सांगितले पी.डब्ल्यु.डी.बाबत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हा विकासाचा विषय आहे आणि मा.नितीनभाऊ यांनी मंजुर केलेला आहे. तर बाकीच्या गोष्टींवर चर्चा करायला काही अर्थ नाही. बी ॲण्ड सी वाल्यांनी त्याची प्रोव्हीजन केलेली आहे. त्यांची कुशलता आहे म्हणुन ते बी ॲण्ड सी मध्ये इंजिनिअर आहे. हा विषय असा आहे. हे १०० कोटीचा विषय आम्ही नगरसेवकांनी मंजुर करुन आणलेला आहे. तर काही जणांचे पोट दुखत आहे. तर या विरोध कसा करायचा अडचण कशी आणायची. हेच चालु आहे फक्त. शहरात विकास होत आहे ना, कामे होत आहे ना. मग काय अडचण आहे तुम्हाला, लोकं बोलत नाही. आम्हाला लोकं बोलतात.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ, मी विरोध करत नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नितीन भाऊंनी जर मंजुरी दिली. तो विषय मंजुर केला, काय गरज आहे विरोध करण्याची.

**श्री.सचिन पाटील :-** मी फक्त माझे मत मांडत आहे सभागृहापुढे, सभागृहापुढे मत मांडणे चुकीचे आहे का ? मत मांडणे चुकीचे असेल तर सांगा.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**श्री.सचिन पाटील :-** मत मांडणे चुकीचे आहे का ?

**मा.उपमहापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी खाली बसुन घ्यायचे आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आता जेव्हा मिटींग झाली तेव्हा सर्वांना बोलविले होते. ते का आले नाही. यायला पाहिजे होते, विषय मांडायला पाहिजे होते.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**श्री.अश्विन सोनवणे :-** नितीन भाऊं १५ दिवसांपुर्वी मिटींग झाली या विषयावर. सर्वांना कळविलेले होते. मग यायला पाहिजे होते ना तेव्हा. सर्व गटनेते होते, नगरसेवक होते. महापौर होते, मॅडम होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** शहरात रस्त्यांसाठी आपले मुख्यमंत्री असतील, उपमुख्यमंत्री असतील,

**मा.महापौर :-** विशाल भाऊ तुम्ही बसुन घ्या खाली.

**ॲड.दिलीप पोकळे :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी खाली बसुन घ्यायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, हे एक डॉक्युमेट दिलेले आहे. त्यात ही जी खालती टोटल आहे ५१६९५.६० ही कसली टोटल आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** रस्त्यांच्या लांबीची टोटल आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मग तसे लिहा ना त्याच्यावर लांबी टोटल.

**मा.महापौर :-** एक मिनीट, सर्व खाली बसा, सभागृहात काही शिस्त आहे की नाही. परमिशन घेऊन बोलायचे तुम्ही विसरलात का ? जो उठुन तो बोलतो, जो उठुन तो बोलतो. परमिशन घ्या आणि बोला ना. मी प्रत्येकाला संधी देते. सभागृहात प्रत्येकाला संधी मिळणार आणि प्रत्येकाचा अधिकार आहे. पण ते शांततेमध्ये. बोला पोकळे साहेब.

**ॲड.दिलीप पोकळे :-** मी जळगांव महापालिकेचा सदस्य आहे. जळगांव महापालिकेचे बांधकाम विभाग अत्यंत शस्त्र आहे. मागच्या १०० कोटीचे ते कामे व्यवस्थीत करत आहे. असे असतांना १०० कोटीचे काम आपण त्यांना देतो आहे ठिक आहे. परंतु त्या १०० कोटीच्या कामावर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे नियंत्रण नाही तर कोणाचे तरी नियंत्रण पाहिजे. आम्हाला फोन करुन तरी विचारायला पाहिजे. हे पी.डब्ल्यु.डी.चे अधिकारी हे आमचे संपर्कात असतात का ? आमच्याकडे सोनगिरे साहेबांचा नंबर आहे, जावळे साहेबांचा नंबर आहे. आपल्याकडे नंबर नाहीत. मग आपण जर हे काम देत असतांना अशी एक अट टाकली की, यावर बांधकाम विभागाला सुपरविझनला ठेवा. आपले इंजिनिअर सोबत जोडा काय अडचण आहे. पी.डब्ल्यु.डी.चा अधिकारी जळगांव महापालिकेचा अधिकारी हे सोबत तेथे सुपरविझनला राहतील. कुठेतरी आपली एक सही ठेवा. १०० कोटी रुपये आपल्याला भेटलेले आहे.

**मा.महापौर :-** पोकळे साहेब, एक मिनीट, एक मिनीट मला बोलु द्या. तुमचे म्हणणे ऐकले मी. या जळगांव शहर महानगरपालिकेच्या प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यांना कोणत्याही बाबतीत संगनमताने सोबत घेतले जात नाही. इवन या रस्त्यांच्या बाबतीत ज्या वेळेला मिटींग झाली. त्यावेळेला असे ठरले होते की, पी.डब्ल्यु.डी.चे आणि आपले अधिकारी एकत्र रस्त्यांची पाहणी करतील आणि त्यानंतर रस्ते फायनल करतील. परंतु पी.डब्ल्यु.डी.अधिकाऱ्यांकडुन आपल्याला कोणत्याही सुचना प्राप्त झाल्या नाही. आपण वारंवार विचारुन सुध्दा त्यांनी आपली कुठल्या प्रकारची नोंद घेतली नाही. किंवा आपल्याला त्यामध्ये इनक्ल्युड केलेले नाही. याबाबतची तुमची तक्रार असेल. तुम्ही आमदार साहेबांकडे

तक्रार करा. मंत्री महोदयांकडे तक्रार करा. येथे बोलुन उपयोग नाही . कारण यातील कोणतेही अधिकार महापालिकेला दिलेले नाही. म्हणुन जर जळगांव शहराचा विकास होत असेल. तर हे सगळे आपल्याला मंजुर करणे गरजेचे आहे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**ॲड.दिलीप पोकळे :-** माझे तेच म्हणणे आहे. समायोजन, यात बांधकाम विभागाला ठेवायलाच पाहिजे.

**मा.महापौर :-** तुम्ही बसुन घ्या खाली. बसुन घ्या.

**ॲड.दिलीप पोकळे :-** दोन मिनीट, माझे पुर्ण बोलुन झालेले नाही. मी या सभागृहाचा सदस्य आहे. माझे एवढेच बोलणे आहे. जळगांव महानगरपालिकेचे बांधकाम विभागाचे अधिकारी आहे त्यांना पी.डब्ल्यु.डी.वाल्यांसोबत ठेवा. त्यांची कुठेतरी सही राहु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे. त्यांची मागणी अत्यंत योग्य आहे. शेवटी महानगरपालिका हद्दीत काम करत असतांना जर कधी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले जात नसेल. प्रशासनाला त्याची कल्पना नसेल.कारण शेवटी प्लॅनींग अथॉरिटी ही महानगरपालिका आहे. आणि जर प्लॅनींग अथॉरिटीलाच जर अंधारात ठेवले जात असेल तर. ही बाब योग्य नाही. या अनुषंगाने आपल्या ठरावामध्ये तशी सुचना लिहुन घेण्यात यावी की, महानगरपालिका क्षेत्रामध्ये काम करत असतांना नाहरकत तर आपण दिलेलीच आहे. त्या बद्दल वाद नाही. परंतु महानगरपालिका हद्दीत काम करत असतांना सार्व.बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी महानगरपालिका प्रशासनाला पुन्हा पुन्हा विश्वासात घेऊन नेमक्या काय काय अडचणी येत आहे. या अडचणींवरती एकत्रीत चर्चा करुन संबंधीत लोकप्रतिनिधी जोपर्यंत लोकप्रतिनिधी अस्तीत्वात आहे. तोपर्यंत लोकप्रतिनिधींना सुध्दा विश्वासात घेणे गरजेचे आहे. या पध्दतीने समनव्याचे एक धोरण ठरविले गेले पाहिजे आणि तश्या पध्दतीचे सुचना सार्व.बांधकाम विभागाला, सन्मा.लोकप्रतिनिधींना सुध्दा कळविण्यात याव्या. जेणे करुन कामे व्यवस्थीत होतील. आणि त्याच्यातुन कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्‌भवणार नाही. ऐवढी काळजी घ्यावी आणि तशी नोंद ठरावात घेण्यात यावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** याला आपण किती रस्त्यांना एन.ओ.सी. दिलेली आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** तुम्हाला माहित आहे ना राजुभाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** थांबा ना आता मी शांततेत विचारत आहे. एन.ओ.सी.दिली आहे की नाही आपण काही रस्त्यांना. यापुर्वी बघा आमदार महोदयांनी येथे मिटींग घेतली. त्यांनी काय सांगितले होते पी.डब्ल्यु.डी.चे अधिकारी आणि महापालिकेचे अधिकारी यांनी प्रभागात जाऊन प्रत्येक रस्त्याची तपासणी करावी संयुक्तीक रित्या सांगितलेले होते. मग आपल्याला त्यासाठी बी ॲण्ड सी मार्फत काही आला निरोप. तुमच्याकडे आलेले नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही. आम्ही त्यांच्याकडे पाठपुरावा केला, त्यांनी हो सांगितल, पण आले नाही. शेवटी मी माझ्या इंजिनिअरला यादी दिली. त्या ठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम झालेले आहे की नाही, एवढी खात्री करायला लावली.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**श्री.विष्णु भंगाळे :-** राजुभाऊ, बारीक पाहायला गेले तर खुप आहे. बाकीच्या प्रभागात तर काहीच नाही. तुम्ही बोलायला लावु नका, सोडा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** संयुक्तीक पाहणी केल्याशिवाय एन.ओ.सी.मिळणारच नाही ना. ते मागणी केलेली आहे. तर एन.ओ.सी.देतांना ते तर होईलच ना. एन.ओ.सी. त्याच्याशिवाय दिली जाईल का आपल्याकडुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आम्ही मोठया मनाने एन.ओ.सी.देतो आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आम्हीही मोठया मनाने सगळे करत आहे भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्ही यादी बघाल ना. प्रभाग क्र.१,२,३,४ आणि डायरेक्ट जंम्प करुन ६. आमच्या प्रभागात नागरीक राहत नाही का ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** एक मिनीट सुनिलभाऊंचे वाक्य आहे. आमच्या प्रभागात कामे झालेले आहे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**मा.उपमहापौर :-** अश्विनभाऊ, अश्विनभाऊ.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ४२ कोटीच्या रस्त्यांमध्ये तुम्ही तुमच्या प्रभागामध्ये सगळयात जास्त कामे करुन घेतलेले आहे. सगळयात जास्त निधी प्रभाग क्र.५ ला आहे विष्णुभाऊ. पहिले तपास करा माहिती घ्या. जेव्हा तुम्ही सत्तेत बसले ना. जेव्हा शासनाकडुन निधी आला ना तुम्ही तुमच्या वार्डात टाकुन घेतले, कशाला बोलायला लावता, तेव्हा तुम्हाला बाकीचे नगरसेवक नाही दिसले का ? जेव्हा तुम्ही तुमच्या वार्डात निधी टाकला तेव्हा बाकीचे नगरसेवक नाही दिसले का ? आम्ही पण आमच्या नेत्यांना भेटुन, माझ्या प्रभागाचा विषय नाही. पुर्ण १०० कोटीचा विषय करीत आहे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**श्री.अश्विन सोनवणे :-** ४२ कोटी तर आम्हीच मंजुर केले ना. आमच्या नेत्यांनीच मंजुर केले ना.

**श्री.सुनिल महाजन :-** सगळे तुम्हीच मंजुर केले.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सगळयात पहिले २५ कोटी, त्याच्यानंतर १००, मग परत १०० कोटी. आणि गुलाबभाऊंनी तुम्हाला जो निधी दिला तुम्ही सत्तेत असल्यावर तुम्ही तुमच्या वार्डातील कामे करुन घेतले.कशाला बोलायला लावत आहे.

**मा.महापौर :-** अश्विनभाऊ शांत बसा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही मला एकट्यालाच का बोलत आहे. ते पण बोलत आहे ना. तुम्ही सगळयांचे महापौर आहे. फक्त एकच पक्षाचे नाही. संपुर्ण शहराचे आहे. ते बोलत आहे तर तुम्ही त्यांनाही बोला. पण हे काय म्हणत आहे हे केले ते नाही केले.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अश्विनभाऊ अभिनंदन करायचे आहे का महानगरप्रमुख म्हणुन

**श्री.अश्विन सोनवणे :-** नाही तसा काही विषय नाही. मला महानगराशी काही घेणे देणे नाही. आम्हाला आमच्या प्रभागाच्या कामांशी घेणे देणे आहे. तुम्ही त्या वेळेला तुमचा स्वार्थ पाहिला.तुम्ही तुमचे कामे टाकुन घेतले, तुम्ही तुमचे रस्ते चकाचक करुन घेतले. बोलायला नका लावा. त्यावेळेला आम्ही मागणी केली की, आम्हाला पण द्या. उपमहापौर मला माहिती आहे. सगळयात जास्त निधी तुमच्या प्रभागात गेलेला आहे. बोलायला लावु नका. तुम्ही संपुर्ण शहराचे महापौर आणि उपमहापौर आहे फक्त एका वार्डाचे नाही. एकापक्षाचे नाही. सर्वांचे आहे. तुम्ही तुमच्या प्रभागात वळविला सगळा निधी कशाला बोलायला लावत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊ हाच मुद्दा आहे. १०० कोटी आमदारांनी दिले ना. या १०० कोटीसाठी आमदार हे संपुर्ण जळगांव शहराचे आहे. आमदार महोदय संपुर्ण जळगांव शहराचे प्रतिनिधीत्व करतात. त्यांनी अश्यापध्दतीने फक्त भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांच्या वार्डात निधी दिला.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**श्री.अश्विन सोनवणे :-** २५ कोटी ज्या वेळेला दिले त्यावेळेस तुमची सत्ता होती.नंतर १०० कोटी आणले त्यात पण तुमचे कामे घेतले.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ इतर प्रभागात सुध्दा टाकलेले आहे. असे नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आमदार महोदय संपुर्ण जळगांव शहराचे प्रतिनिधीत्व करतात.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ओ अश्विनभाऊ.

**श्री.अश्विन सोनवणे :-** एक मिनीट, प्रशांत नाईक, प्रशांत नाईक, टाकले की नाही, गणेश, गणेश टाकले ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ही कोणती पध्दत आहे, १अ, २ब, ३क, प्रभागात तर ४ नगरसेवक तर आहेच ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बी ॲण्ड सीची यादी आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नगरसेवकांनी दिलेले पत्र आहे ते.

**श्री.सुनिल महाजन :-** अश्विनभाऊ, एक मिनीट, एक मिनीट, जसे तुम्ही सांगितले ना, महापौर संपुर्ण जळगांव शहराचे आहे, उपमहापौर जळगांव शहराचे आहे. आमदार सुध्दा जळगांव शहराचे आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** २५ कोटी, १०० कोटी, परत १०० कोटी हे काय आहे मग. गुलाबभाऊंनी निधी दिला, तुम्ही तुमचा प्रभाग चांगला करुन घेतला, उपमहापौरांनी चांगला करुन घेतला, कशाला बोलायला लावता, मला बोलायला नका लावा तुम्ही.

**श्री.सुनिल महाजन :-** विरोधीपक्ष नेता असतांना, विरोधीपक्ष नेता असतांना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही विरोधपक्ष नेता आहे तुम्ही का नाही मुद्दा उचलला की, सर्व नगरसेवकांना द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** यांनी ठराव मंजुर केला.

**श्री.सुनिल महाजन :-** महापौर झाल्यानंतर केले का दाखवा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** २५ कोटी निधी नाही केले.

**श्री.सुनिल महाजन :-** २५ कोटी कोणते.

**श्री.अश्विन सोनवणे** :- अहो तुमची सत्ता होती. गिरीषभाऊंनी, जेव्हा उपमुख्यमंत्री आले होते. फडणवीस साहेब, त्या वेळेला २५ कोटी मंजुर केले ना. तेव्हा तर तुम्ही होते ना. खर्च करुन टाकला तो निधी. नंतर १०० कोटी आणला, १०० कोटी पैकी ४२ कोटीचे रस्ते केले. प्रभाग तर आमचे राहिले ना. आता इतके प्रतिक्षेनंतर आम्हाला भेटत आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** मग दिली ना एन.ओ.सी.

**मा.उपमहापौर :-** अश्विनभाऊ, कारण पी.डब्ल्यु.डी.चा विषय असा आहे भाऊ.

**श्री.अश्विन सोनवणे :-** म्हणुन तर भांडतो आहे कारण लोकांना आम्हाला उत्तर द्यायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, आपण एन.ओ.सी. देत आहोत त्या बद्दल वाद नाही. परंतु बऱ्याच भागातल्या मलनिस्सारण योजना बाकी आहे. असे प्रशासनाने आपल्या अहवालात सुध्दा म्हटलेले आहे. मलनिस्सारण योजना पुर्णत्वास जातांना या रस्त्यांवरती खर्च केलेला हा वाया जाणार नाही याची सुध्दा दक्षता सार्व.बांधकाम विभागाने योग्य पध्दतीने घ्यावी. एवढी सुचना त्याच्यामध्ये नमुद करुन घ्यावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आता विष्णु भाऊंनी सांगिते, एक मिनीट, महानगरप्रमुखच जसे. अश्विन सोनवणे ठरवेल की, व्हायचेच. त्या दिवशी मी बनवुन दाखवेल. लक्षात ठेवा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, ज्या भागात मलनिस्सारणचे काम राहिलेले आहे. तर चालु कधी होणार. म्हणजे किती दिवसात. आता आपले प्लॅन्टचे काम चालु आहे तर किती वेळ लागणार.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ, प्लॅन्टचे काम झालेले आहे. फक्त त्याची जोडणी बाकी आहे. त्या जोडणीचा प्रस्ताव आपण शासनाला मंजुरीला पाठविलेला आहे. त्याची बैठक होईल. ते मंजुर झाल्यानंतर आपले काम चालु होईल.

**श्री.**विष्णु भंगाळे :- किती लागेल.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** मंजुरीसाठी तर दिड ते दोन महिने.

**श्री.अनंत जोशी :-** आता मगाशी अश्विनभाऊ म्हटले की, प्रश्न आहे माझा की, २५ कोटी दिले गिरीषभाऊंनी. तत्पुर्वी जेव्हा ललितभाऊ महापौर होते, नितीनभाऊ महापौर होते. ते खर्च करता आले नाही. शेवटी जेव्हा जयश्रीताई महापौर झाल्या, ते आम्हाला खर्च करावे लागले. शेवटी त्याला नियोजन पण आम्हीच केले.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सत्तेत तुम्हीच होते ना.

**श्री.अनंत जोशी :-** ऐका ना, तुमचे पण महापौर होते ना, अडीच वर्ष तुमचे पण महापौर होते ना. त्याच्यानंतरही खर्च केले ना. ८२ लाख रुपये घेऊन गेलो त्यातले. दुसरा विषय अश्विनभाऊ म्हटले की, १०० कोटी दिले. मला प्रशासनाला विचारायचे आहे की, मॅडम की, १०० कोटी जमा होते त्यातले, ३८ कोटीचे कामे आपले मंजुर आहे. रस्त्यांचे कामे सुरु आहे आता गावामध्ये. ६२ कोटीचा काही पत्ता नाही. आहे का काही पत्ता. मग १०० कोटीचा आकडा नाही म्हणायचा, ३८ कोटीच म्हणायचे. बरोबर आणि ते ३८ कोटीचे मंजुर आहे. बरोबर आहे ना आयुक्त मॅडम. मग ते १०० कोटी बोलायचे नाही.

**मा.महापौर :-** ३८ पण नाही.

**श्री.अनंत जोशी :-** ऐका ना. ३८ कोटी मंजुर झाले. त्यात मनपाचा हिस्सा किती.

**मा.आयुक्त :-** ५ कोटी.

**श्री.अनंत जोशी :-** आपल्याला ३८ कोटी पैकी शासनाने किती दिलेले आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्यांनी ९ कोटी दिलेले आहे. आपण आपला हिस्सा ५ कोटी टाकलेला आहे. असे १४ कोटी.

**श्री.अनंत जोशी :-** त्यांनी ९ कोटी दिले. जेव्हा आपल्याला काही रस्ते अर्जंट लावायचे होते. त्यावेळेस ५ कोटी मनपाने वर्ग केलेले. त्या ५ कोटींनी कामांना सुरुवात झाली मुख्य रस्त्यांना. त्यानंतर ९ कोटी आले. म्हणजे ५ कोटी आपण टाकले तेव्हा ९ कोटी शासनाने दिले. किती पैकी ३८ कोटी पैकी. म्हणजे १०० कोटीचा तर विषय नाहीच. ज्या वेळेला आपले कामे मंजुर झाले, तर ३८ कोटी मंजुर, त्यातुन पण ९ कोटी आले. मक्तेदाराचे बिले दिले नाहीत.मक्तेदार कारपेट सिलकोट करत नाही. मक्तेदार कामे करत नाही. शासनाने १०० कोटी नाही. मंत्र्यांनी १०० कोटी जाहिर केले होते. तसे त्यांनी १०० कोटी जाहिर केले होते त्यावेळेस. त्यातील ३८ कोटीच मंजुर झाले. त्याच्यातील ९ कोटी आजपर्यंत प्राप्त झालेले आहे. मंजुरी किती आहे ही १०० कोटीची, ३८ कोटीची,

**मा.उपमहापौर :-** २०१८ मध्ये.

**श्री.अनंत जोशी :-** ३८ कोटीची यादी कधी फायनल झाली आणि मंजुरी मिळाली.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** १ एप्रिल २०२२ ला.

**श्री.अनंत जोशी :-** आता काय सुरु आहे. ९ कोटीच रुपये मिळाले, त्यामुळे पत्रकारांनी दखल घ्यायची, मिडीयाने दखल घ्यायची. आकडे १००, ५०, ८०, १०० हे ऐकायला खुप छान वाटतात. शहरातल्या लोकांना पण आपल्याला पण खरी परिस्थिती माहिती आहे. आपणास २५ कोटी मिळाले होते, फडणवीस साहेबांनी दिले होते. गिरीषभाऊंनी दिले होते. त्यातला निधी खर्च करता आला नाही. ते पण आम्ही नियोजन करुन खर्च केले. नितीनभाऊ आणि महापौर जयश्रीताई असतांना. त्याच्यानंतर १०० कोटीतील ३८ कोटीच मंजुर झाले, ६२ कोटी उडालेले आहे. ते हवेत आहे. ३८ कोटी मधुन पण शासनाने आजपर्यंत ९ कोटीच दिलेले आहे. आणि आता जे १०० कोटी, भाऊ एकच मिनीट,

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** बी अण्ड सी ने या १४ कोटीची झालेली कामांची बिले तयार करुन यु.सी. पाठवली, त्या यु.सी.च्या आधारे आपण शासनाकडे उर्वरित निधीची मागणी केलेली आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** याचा पाठपुरावा प्रॉपर चालु आहे का आता.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** हो.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हे म्हणतात की, कामे करत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ, मी कधी म्हटलो कामे करत नाही. आणि पुढचे १०० कोटी जे आहे त्याची अवस्था आणि त्याची परिस्थिती येणाऱ्या महापालिकेत निवडणुका किंवा आमदारकी पर्यंत कागदावर आणु नये. आणि त्या १०० कोटीच्या मागचा जो घोळ आहे.जो ३८ वर आला आता ९ वर आला. तसे याचे होत नाही. शुभेच्छा यांना सगळयांना कारण यांच्या वार्डातले कामे आहे.

**ॲड.दिलीप पोकळे :-** आपण हे किती खर्च करु शकले, याचे पण अंदाज घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** गुलाबभाऊंनी किती निधी दिला.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.१५ ला माझे अनुमोदन आहे.

**ॲड.दिलीप पोकळे :-** अमृतच्या केलेल्या कामांची एन.ओ.सी. घ्यायला किती दिवस फिरले. तुम्ही वर्षभराची एन.ओ.सी.देऊ शकत नाही कामांची. शासन तुम्हाला कुठुन पैसे देईल. तुम्ही वर्षभराची एन.ओ.सी. देऊ शकत नाही. शासन तर पैसे देत आहे ना. आपण खर्च करत नाही त्याचा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई. महापौरताई, आता जो गोंधळ चालु होता. आमचे प्रभागातील रस्ते या यादी मध्ये नाही. आता मी महापालिकेची मनपा निधीची यादी, मागच्या महासभेमध्ये मिळवली. हे बघा. प्रभाग क्र.५ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे, रु१,४२,९९,५९७/- त्या ठिकाणी कामे झाली, करा विष्णु भाऊ टोटल करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ,

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ, बोलु द्या ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** जळगांव शहर मार्केट एरिया आहे, त्यांना समजायला पाहिजे. आमच्या प्रभागामध्ये ज्या भागात मतदार राहतात. ते भाग राहिलेले आहे. हा निधी जरी टाकला असेल, हा आपला सर्वांचे कर्तव्य आहे जळगांव शहराचे लोकांचे, आमच्या प्रभागामध्ये मेन एरिया आहे. महापालिका असेल, मार्केट असेल, बस स्टॅण्ड असेल रेल्वे स्टेशन असेल, हा मोठा परिसर असुन हे मेन मेन रोड त्याच्यामध्ये धरले जातात. हा निधी आमच्या एरियेत धरला जातो. आमची एकच मागणी अशी आहे. आम्हाला आमच्या प्रभागातल्या लोकांचे नेतृत्व करत असतांना आमच्या वार्डातील नागरीकांच्या सोयी किती झाल्या.याचा विचार आपण येथे करा, आणि या भागामध्ये किती निधी टाकला गेला, याचा विचार आधी करा. तुम्ही मेन रोड टाकले म्हणजे तुम्ही आमचा प्रभाग धरुन घ्याल का ?

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक मिनीट ऐका, जसा तुमचा प्रभाग आहे. तसा आमचा ही प्रभाग आहे. आमचा नविन विस्तारीत झालेला प्रभाग आहे. तेथे कच्चे रस्ते आहे. चालायला जागा नाही. आम्ही १०० वेळा पत्र व्यवहार करुन ही कामे झालेले नाहीत मनपाचा निधी आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हा जळगांव शहराचा मुख्य भाग आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर :-** विषय तर घेऊ द्या.विषय क्र.१५ मध्ये सर्व सन्मा.सदस्य यांनी ज्या सुचविलेल्या सुचना आहे. त्याच्या अटीशर्तीची प्रशासनाने बारीक बारीक नोंद घ्यावी.त्याच प्रमाणे ही कामे सुरु असतांना व ही कामे अंतिम करीत असतांना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊनच काम अंतिम करावे. ही अट सुध्दा या ठिकाणी नमुद करण्यात यावी. आणि विषय क्र.१५ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१११५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-मनपा २०२३/ प्र.क्रं.२३६/भाग३/२/नवि-१६ मंत्रालय मुंबई दिनांक ५ एप्रिल २०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे (३०४१००९) या योजने अंतर्गत जळगांव मनपास रक्कम रु.१००.०० कोटी इतक्या निधीस तत्वत: मान्यता देण्यात आली असुन या प्रकल्पा अंतर्गतची कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव आहे.

सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत तयार करण्यात आलेल्या या प्रस्तावाअंतर्गत एकुण ४२ कामांचा समावेश असुन ४२ कामांच्या प्रत्येक प्रस्तावात विविध प्रभागातील अनेक रस्ते कॉक्रीटीकरण करणे प्रस्तावित आहे.

जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकुण १९ प्रभाग असुन शासनाच्या अमृत योजने अंतर्गत जलवितरण वाहीनी टाकण्याचे काम पुर्णत्वास आलेले आहे. मात्र भुमिगत मलनिस्सारण योजने अंतर्गतची कामे काही प्रभागात पुर्ण झालेले आहेत तर उर्वरीत प्रभागात भुमिगत मलनिस्सारण योजनेचे काम अदयाप शासनाची मान्यता प्राप्त नसल्याने सुरु झालेले नाहीत, मात्र भविष्यात त्या भागात मलनिस्सारण योजना राबवण्यात येणार आहे. रक्कम रु.१००.०० कोटी निधी अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत प्रस्तावीत ४२ कामांना मनपा मार्फत ना हरकत प्रमाण पत्र मिळणे बाबत मागणी करण्यात आली असुन त्याबाबत सविस्तर अहवाल देण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रभागातील रस्ते कॉक्रीटीकरणाचे काम शासनाच्या निधीतुन सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्यास खालील अटी व शर्तीस बंधनकारक राहुन ना हरकत दाखला देण्यास हरकत नाही.

अटी व शर्ती :-

१. प्रत्येक कामाचा प्रस्ताव तयार करतांना प्रस्तावात समाविष्ठ करण्याच्या रस्त्यांचे स्थळ निरिक्षण करणे आवश्यक राहील सदर रस्त्यांवर भुमिगत गटारीचे काम झाले आहे किंवा नाही याची खात्री करणे बंधनकारक राहील.
२. प्रस्तावातील रस्ता इतर कोणत्याही योजनेतुन यापुर्वी मंजुर झालेला नसल्याबाबत खात्री करणे आवश्यक राहील.
३. ज्या रस्त्यांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या क्रॉक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारीसाठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्याप्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.
४. सदर रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे, खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.
५. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्ट भागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील.
६. प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावरील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल.

शासनाच्या रक्कम रु.१००.०० कोटीच्या निधीतुन शहरातील विविध प्रभागात रस्ते कॉक्रीटीकरण करणेसाठी वेळोवेळी विविध स्तरावर झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या सुचनेनुसार व झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने वरील अटी व शर्तीस बंधनकारक राहुन शासनाच्या रक्कम रु.१००.०० कोटी निधी अंतर्गत शहरातील विविध भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण सार्व.बांधकाम विभाग, जळगांव यांच्या मार्फत करण्याच्या कामास ना-हरकत दाखला देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार शहरातील बऱ्याच भागात मलनिस्सारणाची कामे प्रलंबीत आहेत. मलनिस्सरणाची कामे मार्गी लावतांना कॉंक्रीट रस्त्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभागाने घ्यावी. सदरची कामे तसेच रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करतांना सार्वजनिक बांधकाम विभागाने जळगांव महानगरपालिका प्रशासनास विश्वासात घेवुन त्यामध्ये महानगरपालिका अधिकाऱ्यांचा

समावेश करावा जेणे करुन कामाची गुणवत्ता व कामे सदोष पध्दतीने करणे कामी मदत होईल. व जळगांव महानगरपालिकेशी समन्वय ठेवावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई मी फक्त एकच मिनीट बोलणार आहे.

**मा.महापौर :-** हा बोला.

**सौ.शुचिता हाडा :-** आता सगळे सभागृहाचे मनपा फंडाबद्दल खुप अशी आस्ता आहे. जसे आता विष्णु भाऊंनी सांगितले की, आमचा प्रभाग हा शहराचा मध्यवर्ती प्रभाग आहे. आणि मध्यवर्ती भागातील महत्वाची कामे असतात. अगदी खरं आहे. त्यांच्या सांगण्याला आम्ही १००% सहमती दिली. त्यांचा आणि माझा दोघांचाही मध्यवर्ती प्रभाग आहे. आणि खरं तर म्हणुनच मध्यवर्ती प्रभाग म्हणुन मी वारंवार आरोग्याचे कर्मचारी मिळणे संदर्भात माझी मागणी जवळपास अडीच वर्षापासुनची आहे. त्यांची आजपर्यंत पुर्तता झालेली नाही. प्रशासनाने कोणतीच दखल घेतलेली नाही. हा एक पार्ट झाला, दुसरा पार्ट मनपा फंडातली कामे. मनपा फंडातील ज्या काही याद्या बनतात, ज्या कामांना मंजुरी मिळते. काय निकष लावले जातात. आता आमच्या उज्वलाताईंकडुन मला कळालेले होते. गटारीसाठीचा या आर्थिक निधी जो मंजुर झालेला होता. तो निधी संपलेला आहे. बजेट तरतुद संपली आता नितीनभाऊ,

**मा.महापौर :-** बोलत आहे ते.

**सौ.शुचिता हाडा :-** अतिशय गंभिर बाब आहे महापौरताई नोंद घ्या. बंटी भाऊंची साक्ष लागेल या विषयासाठी, माझ्या प्रभागातला अगदी छोटा विषय आहे. अश्विनी मेडीकल जवळची, जितु काका जोशींनी तुम्हाला सुध्दा फोन केला होता त्याबद्दल, माझे फार पारिवारिक रिलेशन असलेला कुटुंब आहे. बंटीभाऊंचे काका, या विषयासाठी सोनगिरे साहेब आम्ही किती काळापासुन प्रयत्न करतो आहे. एक छोटयाश्या कल्व्हर्टचा आणि त्रासदायक ठरणारा विषय. मार्केट एरिया आहे तो. नवाल हॉस्पीटल समोरचा, भास्कर मार्केट समोरचा एरिया, तेथे दर वेळेला चोकअप होतो, गटार कल्व्हर्ट करणे हा उपाय सुचवलेला आहे.आमचे एक छोटासे काम मंजुर होत नाही. या कामी बंटीभाऊंनी सुध्दा वैयक्तीक फोन केलेला आहे. केला आहे ना बंटीभाऊ तुम्ही फोन, काय झाले, मनपा फंडातील कामांना नेमक काय निकष लागतो. कोणत्याही प्रभागातले होऊ द्या मनपा फंडातील कामे. त्या कामांमधुन त्या त्या भागातील नागरीकांची सोयच होते. त्या बद्दल मी निश्चितच आनंदच व्यक्त करेल. आभारच मानेल. पण सगळया प्रभागांचा काही तरी निकष असला पाहिजे. कधी होणार आहे. आमचे छोटे छोटे गटार कल्व्हर्टच्या कामांची मागणी आहे. कधी होणार आहे आमचे हे कामे. आता तर त्याची तरतुद संपली असे डिक्लेअर केलेले आहे. म्हणजे पुढच्या आर्थिक वर्षापर्यंत थांबायचे का ? आमची टर्म संपुन जाईल तो पर्यंत. अत्यंत गंभिर दखल घ्यायची आहे. जितुभाऊंचा हेच सगळ म्हणण्याचा उद्देश होता. त्यांनी जे अभ्यास केला त्यांनी जो यादी मिळविली. त्यांनी त्यांचे काही तास याच्यासाठी खर्च केले. श्वेतपत्रिका अजुन पर्यंत दिलेली नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ, आम्ही तुम्हाला सन्मा.जेष्ठ सदस्य मानतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आहेच ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** हो ना. पुर्ण वाक्य ऐका ना विष्णुभाऊ, पुर्ण वाक्य ऐका.या सभागृहामध्ये तुम्ही ज्या ज्या वेळेला मांडतात.तुमच्याकडे लक्ष देऊन ऐकतो की, ही व्यक्ती व्यवस्थीत पध्दतीने हाताळते आहे. मला सांगा भाऊ या सगळया नियोजनामध्ये तुमच्याकडे गटारीचे, आज तुमचा गटारींचा बजेट संपला, आता किती महिने झाले भाऊ, एक महिना, ते दिड महिन्यात बजेट संपला, लोकांच्या आऊटलेट मधुन पाणी अक्षरशः, रोडावर येत आहे. मी मॅडम आपल्याला घेऊन गेलो होतो. बरोबर, इतक्या ठिकाणीच्या प्रॉब्लेम आहे. पन्नास पत्र, १०-१० लाखाचे तुकडे, ५-५ लाखाचे तुकडे, विष्णु भाऊ, मित्र, जे.ई. म्हणुन आहे. आपण फोन केला होता मला, बरोबर, त्यांच्या गटारीचा काम, भाऊ तितक्याच कामांसाठी आम्ही पण अर्ज फाटे करतो, हे जर विशेष एरिया मध्ये आणि विशेष प्रतिनिधींनाच जर मिळत असेल, म्हणजे याच्यावर बोलायचेच नाही का कोणी, प्रशासन ॲक्शन घेत नाही. तुम्ही जेष्ठ सदस्य आहे तुम्ही सगळयांना समजवुन सांगा, सगळयांना एक विभाजन करुन द्या ना. बजेटची तरतुद जी आहे ती शहरासाठी आहे. विशेष प्रभागासाठी नाही ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय झाले जितुभाऊ, आपण बजेट तरतुद वाढुन घेण्याच्या संदर्भामध्ये प्रस्ताव ही तयार केला, तोपर्यंत अजेंडा निघुन गेलेला होता. परंतु आपण पुढच्या महासभेमध्ये गटारींची तरतुद करणेसाठी ती वाढुन घेऊ.

आणि मा.महापौर आणि आयुक्त महोदया, आपल्याला विनंती आहे की, असे जे अत्यावश्यक तातडीने होणारे कामे. येथे आपण स्वत: किंवा आपले शहर अभियंत्यांचे माध्यमातुन स्पॉट वेरिफिकेशन करुन तातडीने त्याच्यावर होणारे कामे अपेक्षित आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** काय झाले आहे नितीनभाऊ आता.

**सौ. दिपमाला काळे :-** माझ्या वार्डात १८ लाखाची गटारीची कामे आहे. पण काय होते.ते बिल्कुल मंजुर होत नाही. एक ठराविक वार्डालाच का दिलं जाते. आमच्या वार्डाकडे का नाही लक्ष दिले जाते. मनपा निधी सर्व प्रभागांमध्ये कॉमनली डिवाईड व्हायला पाहिजे. आणि किती वेळा आम्ही फोन करतात मॅडमांना.

**सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ, आता आमची जी भावना आहे. आमचे अत्यंत छोटे छोटे कामे का मंजुर होत नाही मनपा फंडातले कारण आम्ही सभ्य भाषेत बोलतो. आम्ही सन्मानपुर्वक ट्रिटमेंट देतो. आता येथे दादागिरी करावी लागेल.जो दादागिरी करतो, जो दुकानदारी मांडतो ना जो पुर्ण दिवस येऊन बसतो ना. त्याचे सगळी कामे धडाधड मंजुर होतात. शिव्या द्यावे लागतील आता येथे येऊन.ही सभ्यता आता आम्हाला सोडावी लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता जी बजेट तरतुद करु ना ताई. तर ते जे काही सदस्य म्हणतील, अश्या पध्दतीने समसमान वितरीत करु.

**श्री.राजेंद्र पाटील:-** त्या अर्थ संकल्पात त्याची तरतुद केली, तो अर्थ संकल्प काल आमच्या हातात पडला. त्याच्या आधीच निधी संपुन गेला,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** रस्त्याचे पण, रस्त्याचे पण.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण केलेल्या तरतुदी पैकी, कोण कोणत्या निधी संपल्या साहेब. फक्त गटारींचे संपले का? रस्त्यांचे आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** रस्त्यांचे किती आहे. रस्त्यांचे किती आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** २१ कोटी संपले, ७ कोटी बाकी आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** २१ कोटी संपले, याची आम्हाला माहिती पाहिजे. कोणत्या कोणत्या प्रभागात गेलेले आहे. माहिती द्या. नितीनभाऊ लक्ष घाला, समसमान दिले गेले पाहिजे. प्रत्येक नगरसेवकाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नक्की व्यवस्थीत बसवु. जे जे कोणी सदस्य असतील ना त्यांना व्यवस्थीत देऊ.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सगळयांना सारखं सारखे वाटप व्हायला पाहिजे. एवढी काळजी करा. कोणालाच नाराज करु नका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नक्की, नक्की,

**श्री.मनोज चौधरी :-** वारंवार मी त्या कचरा फॅक्टरी रोडाबद्दल बोलत आहे. काय झाले त्याचे. मॅडम तुम्ही असे दर्लक्ष करु नका. ३-३, ४-४ महिने झाले त्या कामाला. आता शुचितातार्ई हाडांनी जे सांगितले ना ते करावे लागेल असे वाटते आम्हाला.

**मा.आयुक्त :-** मामांच्या बैठकीत झालं ना ते विषय.

**श्री.मनोज चौधरी :-** केव्हा होईल हो.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** घेतल ना आता १०० कोटीच्या यादीत.

**श्री.मनोज चौधरी :-** १०० कोटीची निविदा पण झाली नाही. केव्हा होईल तो. तो कचरा फॅक्टरीचा रोड केव्हा होणार आहे. लक्षातच घेत नाही मॅडम तुम्ही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्यांना त्रास आहे. त्या रस्त्याचे खुप.

**श्री.मनोज चौधरी :-** त्याभागात ३-४ महिने झाले ना भाऊ. कॉंक्रीटचे रस्ते घेतल आहे. केव्हा होईल ते कॉंक्रीटचा रस्ता तेथे गटार झालेली आहे ना भाऊ. त्याला अडचण येणार आहे ना परत.

**श्री.सुनिल महाजन :-** महिन्याभरात.

**श्री.मनोज चौधरी :-** तुम्ही देता का शब्द ? नाही झाले तर मी लोकांना घेऊन तेथे येऊन बसेल. तेथे खुप अडचणी आहे म्हणुन सांगत आहे. माझे आमदार महोदयांबद्दलही बोलणे झाले नाही, मुख्यमंत्र्यांबद्दल ही बोलणे झाले नाही.त्यांनी निधी दिलेला आहे. पण तो निधी वापरला जाईल का ? भाऊ मी ४ महिन्यापासुन तेच सांगत आहे तुम्हाला.

**श्री.सुनिल महाजन :-** ते पी.डब्ल्यु.डी.कडे आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** अरे, पी.डब्ल्यु.डी.कडे काम दिलं ना तर ते आपल्याकडे लक्ष पण देणार नाही. एन.ओ.सी. घेतली संपला विषय.जेथे काम चालु असते तेथे विचारना ही होत नाही. नगरसेवकांना ही तुम्हाला माहित आहे का आम्ही एक छोटुसे मटेरियल वरती पडले तर कोणाला सांगायचे काणाला विचारावे आपल्या अधिकाऱ्यांना तर

आपल्या हातात काही नाही. असे उत्तरे देतात.मला ठोस उत्तर पाहिजे आता मला काही सांगु नका आता. नाही तर मी तुमच्या गाडया बंद करुन दाखवतो.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हे काम आपण १०० कोटींच्या निधीमध्ये समाविष्ट केले आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- ते काम समाविष्ट केले असेल, दोन महिन्यापुर्वी ठराव मंजुर केला असेल, मी किती वेळा बोललो त्याच्यावर मग तुम्ही काय करता आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- बरोबर आहे

**श्री.मनोज चौधरी** :- त्याच उत्तर द्या ना

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- बरोबर आहे, परंतू महापालिका फंडातुन करणे ते शक्य नव्हत.

**श्री.मनोज चौधरी** :- गटार झालेली नाहीये त्या रस्त्याला तिथे मग कस काय करणार आहे तुम्ही तिथे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- इतर निधिमधुनच करणे ते योग्य राहील अस महासभेत

**श्री.मनोज चौधरी** :- केव्हा होईल तो रस्ता

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- आता हे १०० कोटींच्या याच्यामध्ये होईल.

**श्री.मनोज चौधरी** :- काहीतरी वेळ सांगा ना दोन-तिन-चार महिने

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- भाऊ या कामाचे कार्यादेश B&C कडून मिळेल

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.मनोज चौधरी** :- मी या एका रस्त्याबद्दल इथे मा.आमदार महोदयांनी आमच्या प्रभागातील भरपुर काम टाकलेले आहेत. त्याबद्दल त्यांचे आभार आहे. पण या रस्त्याबद्दल दुख: व्यक्त करतो आहे हे सांगतो आहे मी तुम्हाला, मी प्रभागाचा विषय करत नाहीये. फक्त या रस्त्याचा विषय करतो आहे कारण की जळगांव शहरातील पुर्ण कचरा त्या रस्त्यावरून जातो आणि तुम्ही काहीच दखल घेत नाहीये त्याची, दोन- दोन वर्ष झाले त्या रस्त्याला परिस्थिती जावुन पाहा ना तुम्ही

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.अश्विन सोनवणे** :- काहो दोन वर्ष झाले बोलत आहेत ते मग तुम्ही काय करत आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- अश्विनभाऊ त्या रस्त्यावर चालु पण शकत नाहीये माणुस, तुम्ही बदलुन जाणार तुम्ही बदलले नंतर आम्हाला पुन्हा लोकांना ५ वर्ष हे करायचे आहे ना

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- भाऊ या कामाचा समावेश १०० कोटींमध्ये करण्यात आलेला आहे आणि त्याचे कार्यादेश देण्याचे काम बाकी आहे भाऊ जस सगळ्यांच म्हणण होत की ज्या रस्त्यांचे काम प्रस्तावीत झालेले आहेत आणि काम झालेले नाहीत ते रस्ते प्रस्तावित करू नये. त्यासाठी वेळ लागतोय.

**श्री.मनोज चौधरी** :- याच उत्तर कोण देईल. ड्रेनेज गटारी बाकी आहे याचे उत्तर कोण देईल की प्रशासन देईल, तुमच्या आदेशात काय लिहले आहे, ड्रेनेज गटारी झाल्याशिवाय आर.सी.सी रस्ते करू नये.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- बरोबर आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- मग याचा अर्थ काय आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- याच्याबद्दल B&C च्या अधिकारी आणि कलेक्टर साहेबांसोबत बैठक झ ाली होती.

**श्री.मनोज चौधरी** :- काही B&C करू नका साहेब तुम्ही महापालिकेला आपल्याला उत्तर द्यायचे आहेत ना लोकांना दोन दोन वर्ष काम होत नाहीये.

**श्री.विष्णू भंगाळे** :- रस्त्यांचे कामाकरीता महापालिकेच बांधकाम विभागच बंद करा ना सर्व काम B&C कडे देवून टाका ना कशाला पाहीजे आपल्याकडे , काय लावल आहे B&C काही समजत नाही. का बर सक्षम नाहीयेत का आपले इंजिनियर सर्व लोक, सर्व देवुन टाका तिकडे

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.मनोज चौधरी** :- महापौरताई, आयुक्त मॅडमांकडून याच उत्तर पाहीजे आहे मला की या रस्त्याच काम कधी सुरू होईल. नंतर मी विषय काढणार नाही.

**सौ.रंजना सोनार:-** महापौर ताई व आयुक्त मॅडम मी मागच्या सभेमध्ये सुध्दा सांगीतले होते की लीला पार्क ते वांद्रे दवाखाना हा मेन रोड आहे मी सोनगिरे साहेबांना विचारू ईच्छिते की या रोडाचे काम कधी चालु होणार आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- लीला पार्क पासुनचा रस्ता ना

**सौ.रंजना सोनार:-** मेन रोड आहे. अयोध्या नगरमधील

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- ताई तो रस्ता मंजुर झालेला आहे परंतू त्याठिकाणी अमृतच काम बाकी होते. आता परवा पासुन त्यांनी स्वामी समर्थ केंद्राच्या समोर मोठा खड्डा करून ठेवल आहे त्या मंदीराजवळ त्यामुळे आणि त्याठिकाणी एक पाईपलाईन टाकायची बाकी आहे. अगोदर जी त्यांची पाईपलाईन टाकुन झाली आहे तर त्याठिकाणची पाईपलाईन टाकुन झाल्यानंतर जोडणी झाली की नंतर ती जेव्हा पुर्ण होईल आणि पाणी पुरवठयाकडून जी NOC भेटली की त्यावेळेला ते काम चालु होईल.

**सौ.रंजना सोनार:-** ते लवकरात लवकर करावे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- बर ताई

**श्री.मनोज चौधरी** :- महापौरताई, आयुक्त मॅडम आता काही काही एरीयामध्ये पाणी येत नाही तर मी तुम्हाला फोन केला होता एक दोन वेळेस तर अजुनही तुमचे इंजिनियर ते आज येथे समोर आहेत. बोलवा त्यांना, त्यांना चारदा फोन लावले आहे मी

**मा.महापौर** :- विषयाशी संबंधित असेल तरच चर्चा करा.

**श्री.मनोज चौधरी** :- नाही नाही मॅडम हा जिव्हाळयाचा , पाण्याचा प्रश्न आहे.

**मा.महापौर** :- इतर चर्चा करू नये.

**श्री.मनोज चौधरी** :- पाणी पुरवठा जळगांव शहरात पुर्णपणे पाणी मिळतच नाहीये तर काय उपयोग आहे त्या अमृत योजनेचा, लोकांना पाणी मिळत नाहीये.

**मा.महापौर** :- मनोजभाऊ विषयपत्रिकेवरील विषय झाल्यानंतर चर्चा करा.

**श्री.मनोज चौधरी** :- नाही नाही महापौरताई या चुका ज्या आहेत ना त्या व्हॉलमनांच्या आहेत.

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.मनोज चौधरी** :- मॅडम हा जो अमृतचा विषय सांगतोय मॅडम

**श्री.नितीन लढ्ढा** :- महापौरताई पुढील विषय घेण्यात यावा.

**मा.महापौर** :- पुढील विषयाकडे वळुया आपण

**श्री.मनोज चौधरी** :- नितीनभाऊ महत्वाचे विषय आहेत ना हे.

**मा.महापौर** :- आपण नंतर चर्चा करू.

**श्री.मनोज चौधरी** :- सुनिलभाऊ पाणी येत नाही व्हॉलमन यांना आदेश द्या ना ते कामच करत नाही. पाईपलाईन झाली, कनेक्शन पण झाले व्हॉलमनच लक्ष देत नाहीये मी तेच सांगतोय

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.मनोज चौधरी** :- मॅडम जर कर्मचाऱ्यांनी व्यवस्थित काम केल तर पाणी जाईल ना सगळयांना, एकाच नळावर चार-चार नळ चालणार आहे तर पाणी कस काय जाणार आहे शेवटच्या घरांना पाणीच जात नाही. आपल्या कर्मचाऱ्यांच्या मिटींगा घ्या त्यांना बोलवा मॅडम त्यांना समजावुन सांगा किंवा त्यांच्यावर कारवाई करा. तुम्ही जोपर्यंत या अधिकाऱ्यांवर कारवाई करत नाही ना तोपर्यंत हे प्रशासन निट काम करणार नाही. तुम्ही एक दोन कर्मचाऱ्यांना घरी पाठवा मग बघा कसे बरोबर काम करतील ते

**श्री.अनंत जोशी** :- NOC दिलेली आहे. महापौरांचा म्हणा की आयुक्तांचा काही संबध नाहीये याच्यामध्ये हे काम कधी सुरू होतील आणि कधी संपतील हे अश्विनभाऊंना विचारा आता.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ते तुम्ही काळजी करु नका आम्ही करु बरोबर.

**श्री.अनंत जोशी** :- ती तुम्ही काळजी करू नका ते आम्ही करू भाऊ.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १६ घेण्यात यावा.

**नगरसचिव , विषय क्रं. १६**:- मनपा सार्व.बांधकाम विभागाच्या ट्रॅक्टरवर तसेच रस्ते दुरुस्तीच्या ट्रॅक्टरवर दैनंदिन कामकाजाकरीता कंट्राटी पध्दतीनुसार मक्तेदार/पुरवठादार यांच्या मार्फत मजुर पुरविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- सदर प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.अनंत जोशी** :- महापौरताई, कायम स्वरूपी देण्याची मागणी सुध्दा केलेली आहे बऱ्याचदा त्याअनुषंगानेच बोलतोय पुर्वी भोसलेसाहेब होते ते बदलले, सोनवणीसाहेब आले ते बदलले आणि आता सोनगिरे साहेब आलेत तेही बदलतील आणि आपल्याकडे एकच हे आहे की आपल्याकडे फुकटचा पगार घेणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या पाहणीतही आढळले आता त्यांना कामाला लावा येथे पर्याय हा आहे आणि दुसरा पर्याय जे कंत्राटी पध्दतीने भरती केली आहे त्यातील दोन माणस द्या. तिसरा पर्याय तुम्हाला माझा प्रश्न महापालिका प्रशासनाला असा आहे की प्रशासनाने , सभागृहाने मला तेथे खोली बांधण्याची परवानगी द्यावी. कारण की खुप सुंदर वातावरण आहे कारण की, सकाळ संध्याकाळ हेच आहे येथे आणि रात्री ११ ते ११.३० वाजता मला लोक फोन लावुन सांगतात की मग मी तिथे ११- ११.३० वाजता जायच असे काम चालतात हे तुम्ही बघा की लोक कसे बसलेले आहेत ते काही झोपलेल आहेत मला खुली प्रशासनाने परवानगी दयावी. मी राहातो मी पाहतो फक्त मला परवानगी द्यावी.

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.सुनिल महाजन,विरोधी पक्ष नेता** :- पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- घ्या.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १६ सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- महापौरताई ते उत्तर द्यायला लावा ना ते उत्तर देत नाहीयेत.

**मा.आयुक्त** :- दिले ना सोनगिरे साहेबांनी उत्तर

**मा.उपमहापौर** :- भाऊ विषयपत्रिकेवरील विषय झाले की आपण चर्चा करू.

**श्री.मनोज चौधरी** :- नाही नाही भाऊ हे असच होत मी प्रश्न विचारले की कोणतेही उत्तर मिळत नाही.

**मा.उपमहापौर** :- मनोजभाऊ तो जो विषय आहे ना अमृतच्या संदर्भातील जी आता चर्चा झाली त्यानुसार आपले विषय संपले की आपण चर्चा करू या विषयावर

**श्री.मनोज चौधरी** :- नाही ना मी मागील दोन वर्षापासुन उत्तर मागतोय ना, त्याच्यावर काय करत आहेत तुम्ही दोन वर्ष होवुन गेले ना, चार-सहा महिने होवून गेले हा विषय आला आहे आपल्याकडे त्या रस्त्याची परिस्थिती अशी आहे की कोणी गर्भवती बाई असली ना तर तिथेच डिलेव्हरी होवुन जाईल. समजणार पण नाही तुम्हाला परिस्थिती एवढी खराब आहे.समजुनच घेत नाही तुम्ही मी काय सांगतो आहे ते आपल्यालाच फेस करायच आहे दोन महिन्यांनी आपल्याला लोकांकडे जायच आहे ना, प्रशासन थोडी जाणार आहे त्यांच्याकडे, ड्रेनेजची गटारच झालेली नाहीये तर काय रस्त्यांच होणार आहे.

**मा.आयुक्त** :- ज्यावेळेला बैठक झालेली होती तेव्हा हा रस्ता सांगीतला होता आणि आता त्यांच टेंडरपण रेडी आहे NOC राहीलेली आहे. त्यामुळे ते टेंडर राहीले आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- किती दिवसात काम होईल ते महिन्याभरात मार्गी लावा तो विषय

**मा.महापौर** :- भाऊ १०० कोटींच्या याच्यात आहे ना

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.अश्विन सोनवणे** :- भाऊ टेंडर प्रोसेसला आहे ऐवढ मला माहिती आहे. मी तपास केला भाऊ टेंडर प्रोसेसला आहे आणि ते काम आहे इतका मी तपास केला ते मी सांगतोय.

**श्री.अनंत जोशी** :- भाऊ निधी तुम्ही आणला आहे म्हणुन तुम्हाला विचारतो आहे.

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**मा.महापौर** :- विषय क्रं. १६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १११६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभागाच्या ट्रॅक्टर मार्फत युनिट अंतर्गत दैनंदिन कामकाजाकरीता तसेच रस्ते दुरुस्तीच्या ट्रॅक्टरवर मजुरांची आवश्यकता आहे.

युनिट अंतर्गत ट्रॅक्टरव्दारे वेस्ट मटेरीयल उचलणे, झाडांच्या फांदया उचलणे, खड्डे बुजविणे, पाईप टाकणे, चाऱ्या करणे, रस्ते दुरुस्ती करणे इत्यादी युनिट अंतर्गत दैनंदिन कामकाज करण्यात येतात त्यासाठी मंजुरांची आवश्यकता असते तसेच रस्ते दुरुस्ती पथकाच ट्रक्टरवर देखील मजुरांची आवश्यकता आहे. जळगांव शहर महानगरपालिका मध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने खाजगी मक्तेदार/पुरवठादार मार्फत मजुर पुरवठा करणे करीता कामगार आयुक्त यांचे कार्यालयाचे परिपत्रक क्र.ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२३ (१) कार्या-१० किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत खालील अनुसुचित अदयोगातील कामगारांकरीता मुळ किमान वेतन + विशेष भत्याची

रक्कम = एकुण किमान वेतन दि.०१/०१/२०२३ अन्वये प्राप्त किमान वेतनानुसार सदर परिपत्रकातील अ.क्रं.११ मधील रस्ते तयार करणे, देखरेख करणे, बांधकाम उदयोग या करीता अकुशल कामगारासाठी प्रतीमहा एकुण किमान वेतन रक्कम रु.१६,९५९/- मात्र असा दर नमुद आहे. त्यानुसार प्रति दिवस रक्कम रु.६५२.२६ असा दर येतो.

१. सार्व. बांधकाम विभागातील युनिट ट्रॅक्टर संख्या :- ८ x ४ मजुर = ३२ मजुर

२. सार्व. बांधकाम विभाग रस्ते दुरुस्ती ट्रॅक्टर संख्या :- <u>३ x ४ मजुर = १२ मजुर</u>

असे एकुण :- = ४४ मजुर

एकुण मजुर संख्या ४४ x रु.६५२.२६ प्रति दिन x ३६५ दिवस = १०४७५२९६/-

१८% जि.एस.टी. + १८८५५५३/-

१% कामगार + १०४७५३/-

वरील प्रमाणे रक्कम रु.१,२४,६५,६०२/- मात्र खर्च अपेक्षीत असुन जळगांव महानगरपालिकेमध्ये कर्मचारी व मजुरांची कमतरता असल्याने शहरातील/प्रभागातील नागरीकांना सुविधा पुरविणे कामी कंट्राटी पध्दतीनुसार मक्तेदार/पुरवठादार यांच्या मार्फत मजुर पुरवठा करणे आवश्यक असल्याने मनपाचे सार्व.बांधकाम विभागामध्ये ट्रॅक्टरवर तसेच दैनंदिन दुरुस्तीचे कामे करुन घेणेसाठी ४४ मजुरांची सेवा घेणेचे काम रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षातुन करुन घेणेसाठी येणारा खर्च रक्कम रु.१,२४,६५,६०२/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. १७**:- दिव्यांगांच्या कल्याणाकरीता विविध ०१ ते १७ योजना राबविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**ॲड. शुचिता हाडा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. पण प्रशासनाच्या या ज्या चांगल्या योजना आहेत. तर हा सगळा फायदा जनतेला मिळवुन द्यायचा आहे. या योजनांचा दिव्यांग बंधुना उत्तम लाभ मिळवुन देण्यासाठी सगळ्या लोकप्रतिनिंधीचा सहभाग या योजनांच्या अंमलबजावणी करतांना करून घेण्यात यावा. याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. कारण त्याशिवाय या सगळ्या योजना कागदावरच राहणार आहेत. याची खरोखर अंमलबजावणी लोकप्रतिनिधीमार्फत तरच त्याचा सक्सेस ईश्यू दिसुन येणार आहे.

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्या. शुचितातार्ईनी मांडलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. विषय क्रं. १७ सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१११७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीता शासनामार्फत वेळोवेळी शासन निर्णय पारीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणाकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आराखडा तयार करुन त्यानुसार योजना राबविणेबाबत महासभेच्या मान्यतेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणींची तीव्रता कमी करण्याच्या हेतूने खालील प्रमाणे योजना क्रमांक १ ते १७ बाबत सविस्तर आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

योजना क्रमांक- १ - शिष्यवृत्ती योजना

योजना क्रमांक- २ - क्रिडा स्पर्धेतील विजेत्या दिव्यांग खेळाडूंना अर्थ सहाय्य

योजना क्रमांक- ३ - दिव्यांग व्यक्तीच्या मागणीनुसार त्यांना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य

योजना क्रमांक- ४ - दिव्यांगांच्या लग्ना करीता अर्थ सहाय्य

योजना क्रमांक- ५ - ६० वर्ष व त्यावरील दिव्यांग व्यक्तीकरीता पेन्शन योजना

योजना क्रमांक- ६ - दिव्यांग व्यक्तींना चलन वलन साधनाकरीता अर्थसहाय्य

योजना क्रमांक- ७ - दिव्यांग व्यक्ती उदरनिर्वाह/रेशनापोटी अर्थसहाय्य करणे

योजना क्रमांक- ८ - शाळेत जावू न शकणाऱ्या दिव्यांग मुले/मुलींना अर्थसहाय्य

योजना क्रमांक- ९ - दिव्यांग बचत गटांना अर्थसहाय्य (बचतगटातील ७० टक्के सदस्य दिव्यांग)

योजना क्रमांक- १०- दिव्यांग व्यक्तींना मुलभूत सोयी सुविधा निर्माण करणे.

योजना क्रमांक- ११- सुवर्ण नगरी दिव्यांग समाजसेवा पुरस्कार

योजना क्रमांक- १२- दिव्यांग व्यक्तींना घरकुल अर्थसहाय्य योजना.

योजना क्रमांक- १३- दिव्यांग व्यक्तींना प्रशिक्षण देणे.

योजना क्रमांक- १४- दिव्यांग माहिती, शिक्षण व संपर्क योजना (IEC)

योजना क्रमांक- १५- गंभिर आजार असलेल्या दिव्यांगांकरीता अर्थसहाय्य

योजना क्रमांक- १६- दिव्यांग व्यक्तींकरीता आरोग्य धनसंपदा योजना

योजना क्रमांक- १७- दिव्यांग व्यक्तींच्या नोंदणीकृत संस्थाना अर्थसहाय्य करणे.

दिव्यांगांच्या कल्याणाकरीता वरील योजना क्रमांक ०१ ते १७ मधील तयार केलेल्या आराखडयानुसार सदर योजनांची अंमलबजावणी करणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. १८**:- जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करून मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ११५ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधुन करणेबाबत मा.महापौर ,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा. पंरतू त्यामध्ये फक्त प्रभाग क्रं. ११ मध्ये देविदास कॉलनीमध्ये ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे.

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**मा.महापौर** :- एक मिनिंट , नितीनभाऊ काय म्हणत आहेत ते ऐकुन घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मा.महापौर महोदया, ललीतभाऊंच्या प्रभाग क्रं. ११ मध्ये ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे, ३६ नंबरवरील विषय आहे तर त्याची रक्कम चुकीने १० कोटी झालेली आहे ती १० कोटीच्या ऐवजी १ कोटी समजण्यात यावी आणि काही सन्मा.सदस्यांचे विषय आहेत तेही याच्यामध्ये समाविष्ट करून घेण्यात यावे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १८ मधील अ.क्रं. ०१ ते ११५ या मधील विषय क्रं. ३६ मध्ये सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी सुचविल्याप्रमाणे प्रशासनाने चेंजेस करावे त्याचप्रमाणे सन्मा.सदस्य नवनाथभाऊ दारकुंडे यांनी सुचविलेली १ ते १० कामे यांचा सुध्दा समावेश करण्यात यावा. त्याच पध्दतीने सन्मा.सदस्या सौ.रेश्मा कुंदन काळे यांनी सुचविलेल्या कामांचा सुध्दा यामध्ये समावेश करण्यात यावा. सन्मा.सदस्य श्री. चेतन सनकत यांनी सुविलेल्या कामांचा सुध्दा यामध्ये समावेश करण्यात यावा. तसेच ॲड . दिलीपभाऊ पोकळे यांनी सुचविलेली कामे सुध्दा या यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावीत. सर्वानुमते विषय क्रं. १८ मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१११८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना,शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधी, जळगांव मनपा निधीतुन कामे सुचविलेली असुन

त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी या सोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते ११५ या विकास कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मा.पिठासिन अधिकारी तथा महापौर यांनी सभागृहात केलेल्या सूचनेनूसार उपरोक्त अ.क्र.०१ ते ११५ या विकास कामांचे यादीतील अ.क्रं.३६ प्र.क्र.११ मधील काम करणे कामी खर्च रक्कम रुपये १० कोटी अशी दर्शविण्यात आलेली आहे. सदर रकमेऐवजी रक्कम रु.०१ कोटी याप्रमाणे दुरुस्ती करुन यादीत दर्शविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात मा.पिठासिन अधिकारी तथा महापौर यांचेकडेस १) सन्मा.सदस्य, श्री.दिलीप बबनराव पोकळे यांनी दिलेल्या पत्रानूसार अ.क्र.०१ ते ११ विकास कामे, २) सन्मा.सदस्य, श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रानूसार अ.क्रं.०१ ते १० विकास कामे, ३) सन्मा.सदस्या,सौ.रेश्मा कुंदन काळे यांचे पत्रानूसार अ.क्रं.०१ ते ०५ विकास कामे तसेच ४) सन्मा.सदस्य, श्री.चेतन गणेश सनकत यांनी दिलेल्या पत्रानूसार अ.क्रं.०१ ते ०६ व यावरील सर्व विकास कामांना सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त सन्मा.सदस्यांनी पत्रात दिलेली कामे या सोबतच्या यादीतील अ.क्र.०१ ते ११५ मध्ये समाविष्ट करणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**महासभा ठराव क्र.** ११९८ **विषय क्र.** १८ **दि.३०/०५/२०२३**

| अ. क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ.गायत्री शिंदे | 2 | प्रभाग क्र. २ शिवाजीनगर हमाल वाडा येथील पोळ गल्ली कॉंक्रिटीकरण करणे. | 3000000 |
| 2 | 1,40,00,000 | | प्रभाग क्र.२ देशमुख सर यांच्या घरापासून ते राणा सायकल पर्यंतचा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 3000000 |
| 3 | | | प्रभाग क्र.२ मकरा अर्पामेंट ते अमर चौक रस्ता डांबरीकरण करणे | 5000000 |
| 4 | | | प्रभाग क्र.२ सोनजे यांच्या किराणा दुकानापासून ते उल्हास राघो पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 3000000 |
| 5 | सौ. रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र.3 अंतर्गत मन्यारवाडा मध्ये ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 6000000 |
| 6 | 1,30,00,000 | | प्र.क्र.3 मध्ये ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 7 | | | प्र.क्र.03 गट नं. 10 मध्ये आर.सी.सी. गटारी बांधकाम करणे. | 2000000 |
| 8 | | | प्र.क्र.03 सुंदर नगर मध्ये आर.सी.सी. गटारी बांधकाम करणे. | 2000000 |
| 9 | श्री.प्रविण कोल्हे व सौ.मिना सपकाळे | 3 | प्र.क्र.3 अंतर्गत दिनकर नगर, तानाजी मालुसरे नगर, मेस्कोमाता नगर, डिएन.सी. कॉलेज परिसर, सदाशिव नगर, ज्ञानदेव नगर, शंकरराव नगर, काशिनाथ नगर, दशरथ नगर, नेहते नगर, खेडी मधील शिव नगर परिसर, हरिओम नगर, आंबेडकर नगर, दादाजी दरबार परिसर व इतर ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 20000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | 3,35,00,000 | | प्र.क्र.3 अंतर्गत दिनकर नगर, तानाजी मालुसरे नगर, मेस्कोमाता नगर, डिएन.सी. कॉलेज परिसर, सदाशिव नगर, ज्ञानदेव नगर, शंकरराव नगर, काशिनाथ नगर, दशरथ नगर, नेहते नगर, खेडी मधील शिव नगर परिसर, हरिओम नगर, आंबेडकर नगर, दादाजी दरबार परिसर व इतर ठिकाणी आरसीसी गटारी व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 10000000 |
| 11 | | | प्र.क्र. 3 जळगांव शिवार गट क्र. 70/2 ब ओपन स्पेसमध्ये चेनलिंक फेन्सींग करणे व खेळणी बसविणे | 2500000 |
| 12 | | | प्र.क्र. 3 जळगांव शिवार गट क्र. 71/3/4/5 सदाशिव नगर दत्त मंदीर ओपन स्पेसमध्ये चेनलिंक फेन्सींग करणे | 1000000 |
| 13 | सौ.भारती सोनवणे | 4 | प्र.क्र. 4 मध्ये काट्याफाईल, शनिपेठ, बळीराम पेठ, बालाजी पेठ, जुने गांव परिसर व इत्यादी ठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 14683672 |
| 14 | 1,87,00,032 | | प्र.क्र. 4 मध्ये बारीवाडा व साईबाबा मंदीर परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4016360 |
| 15 | श्री.सचिन पाटील | 7 | प्र.क्र.7 अंतर्गत पंडीतराव कॉलनी, हनुमान मंदीर ते रवी पाटील यांच्या घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 3099936 |
| 16 | 96,99,321 | | प्र.क्र.7 अंतर्गत पंडीतराव कॉलनी खर्चे प्रोव्हीजन ते श्री.आर.पाटील यांच्या घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 3099936 |
| 17 | | | प्र.क्र.7 अंतर्गत गोकर्ण महादेव मंदीरा समोरील रस्ता डांबरीकरण करणे | 1499949 |
| 18 | | | प्र.क्र.7 डॉ. बलकले यांच्या घरापासून ते श्री.शेंगदाणे यांच्या घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1999500 |
| 19 | श्री. मनोज चौधरी | 8 | प्रभाग क्र. 8 मधील कचरा फॅक्टरी रोडपासून सदगुरु बैठकी हॉल पर्यत परिसरातील कॉक्रीटीकरण रस्ते करणे | 5000000 |
| 20 | 4,74,50,000 | | प्रभाग क्र. 8 मधील गट नं. 25/1/2/3 निमखेडी शिवार परिसर रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 21 | | | प्रभाग क्र. 8 मधील डॉ. चेतन खैरनार यांच्या दवाखान्यापासून सुनिल गरबड पाटील यांच्या घरासमोरचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 2500000 |
| 22 | | | प्रभाग क्र. 8 मधील प्रतिक क्लासेस पासून टि.व्ही.एस. शोरुम पर्यत रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 2500000 |
| 23 | | | प्रभाग क्र.8 मधील मनुदेवी सोसायटी पासून ते वैष्णवी पार्क सर्व परिसरातील आरसीसी गटार बांधणे | 4000000 |
| 24 | | | प्रभाग क्र. 8 मधील गट क्र. 101 मधील शिवशक्ती कॉलनी मधील ओपन स्पेस मध्ये जिम साहित्य घेण्याबाबत | 1000000 |
| 25 | | | प्रभाग क्र. 8 मधील गट नं. 288+289 जळगांव शहर डायरेक्टर बंग्लोज व चिनो बंग्लोज परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | 4500000 |
| 26 | | | प्रभाग क्र. 8 मधील गट नं. 112 निमखेडी शिवार तालुका पोलिस स्टेशन मागील परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |
| 27 | | | प्रभाग क्र. 8 मधील गट नं. 118 व्दारका नगर 1/2/3/4 परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 7000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 28 | | | प्रभाग क्र. 8 गट नं. 116 पासून जुन्या नॅशनल हायवेपासून गट नं. 118 नविन नॅशनल हायवे पर्यंत रस्ते डांबरीकरण करणे | 8000000 |
| 29 | | | प्रभाग क्र. 8 मधील गट नं. 116 पासून जुन्या नॅशनल हायवे पासून गट नं. 118 नविन नॅशनल हायवे पर्यंत टी.व्ही. टावर समोर रस्ते डांबरीकरण करणे | 2950000 |
| 30 | श्री. ललित कोल्हे | 11 | प्रभाग क्र. ११ मध्ये गिरणा टाकी ते रामानंद नगर, रामानंद नगर ते वाघ नगर स्टॉप वाघ नगर ते खंडेराव नगर पुल इत्यादी ठिक-ठिकाणी ६ मिटर, ९ मिटर व हॉसपॉट १२.५ मिटरचे इलेक्ट्रिक पोल उभारणे | 5000000 |
| 31 | 56,19,50,000 | | प्र.क्र. ११ मधील गट नं. १०४ ओपन स्पेसमध्ये कॉक्रीटीकरण पाथवे पेव्हींग ब्लॉक व चेनलिक फेन्सींग करणे | 2400000 |
| 32 | | | प्र. क्र. ११ मधील गट नं. १२७/१ अ मध्ये व गट नं. १२७ ब मध्ये रस्ते डांबरीकरण करणे व आर.सी.सी. गटार बांधणे | 1000000 |
| 33 | | | प्र.क्र. ११ मधील गट नं. १५५ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 8000000 |
| 34 | | | प्र.क्र.११ पिप्राळा शिवारमधील ठिक-ठिकाणी कॉलन्यांमध्ये आर.सी.सी. गटार बांधणे व रोड क्रॉसोंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | 5000000 |
| 35 | | | प्र. क्र. ११ पिप्राळा शिवारमधील ठिक-ठिकाणी कॉलन्यांमध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 36 | | | प्र.क्र. ११ पिप्राळा शिवारमधील ठिक-ठिकाणी कॉलन्यांमध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 10000000 |
| 37 | | | प्र.क्र.११ मध्ये पिप्राळा शिवार गट नं. ११९ मध्य साई मंदिर ते स्वामी समर्थ केंद्रापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2400000 |
| 38 | | | प्र.क्र.११ स्वामी समर्थ केंद्रापासून गट नं. ११२ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2400000 |
| 39 | | | प्र.क्र.११ मध्ये पिप्राळा शिवार गट नं. ९५/१ मध्ये मारोती मंदिर पासून ते भिलाटी सार्वजनिक शौचालयापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 5400000 |
| 40 | | | प्र क्र ११ मध्ये पिप्राळा शिवार गट नं. १५२/१ मध्ये रस्ते डांबरीकरण करणं | 2550000 |
| 41 | | | प्र. क्र. ११ मध्ये पिप्राळा शिवार गट नं. १५३ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 2600000 |
| 42 | | | प्र.क्र.११ मध्ये पिप्राळा शिवार गट नं. १३२ पासून मुख्य रस्ता गट नं. १३४ पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे व रोड क्रॉसीगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | 2400000 |
| 43 | | | प्रभाग क्र. ०२ मध्ये शकील बागवान यांच्या घरापासून ते महाराष्ट्र दालमिल ते हुडकोचा कोपरा व गोविंद ओझा यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | 5000000 |
| 44 | | | प्रभाग क्र. ०२ मध्ये ममुराबाद नाका ते गोसावी स्मशानभूमि मलिक शाळा यांचे कोपऱ्यापर्यंत ते सर्वे नं. ४१६,४१७, ४१८, ४१९ पर्यंत आर.सी.सी. मध्ये मोठ्या नाल्याला संरक्षण भिंत बांधणे. | 18000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 45 | | | प्रभाग क्र. ०२ मध्ये ख्रिस्ती कब्रस्थान लागून चारही बाजूस आर. सी. सी. गटार व स्लॅब कल्टर्व्हटर बांधणे. | 1500000 |
| 46 | | | प्रभाग क्र. ०२ मध्ये श्री मोटर व ललित स्टाईल बोळ मधील तसेच राजवाडा व गोविंद ओझा यांच्या दालफळ पर्यंत आर.सी.सी. गटार, स्लॅब कर्व्हटर व रस्ता कॉक्रेटीकरण करणे. | 5500000 |
| 47 | | | प्रभाग क्र. ०२ मधील कला-वसंत नगर परिसरात रस्ता कॉँक्रेटीकरण करणे. | 5000000 |
| 48 | | | प्रभाग क्र. ०२ मधील वृंदावन कॉलनी येथे रस्ता कॉक्रेटीकरण व आर. सी. सी. गटार बांधणे | 5000000 |
| 49 | | | प्रभाग क्र. ०२ मधील पवन नगर येथे रस्ता कॉँक्रिटीकरण व आर. सी. सी गटार बांधणे. | 7000000 |
| 50 | | | प्रभाग क्र. ०३ अंतर्गत सर्वे नं. ५५ व ५७ श्रावण नगर यामधील रस्ते डांबरीकरण करणे. | 5500000 |
| 51 | | | प्रभाग क्र. ०३ अंतर्गत खेडी आंबेडकर नगर परिसरात रस्ते कक्रिटीकरण करणे. | 5000000 |
| 52 | | | प्रभाग क्र. ०३ अंतर्गत सरस्वती नगर परिसरात रस्ते कॉक्रेटीकरण करणे, | 5000000 |
| 53 | | | प्रभाग क्र. ०३ अंतर्गत मणियार यांच्या खव्यापासून ते कोल्हे गोडाऊन जवळील तसेच शौचालयापासून मेस्को माता नगर फलकापर्यंत बालाजी मंदीर संचलित धर्मार्थ दवाखान्यात रस्ता कॉक्रेटीकरण करणे. | 9800000 |
| 54 | | | प्रभाग क्र. ०३ अंतर्गत गोदावरी कॉलेज समोरील नक्षत्र हॉटेलपासून ते गॅनचंद अपार्टमेंट व परिसरात रस्ते कॉक्रेटीकरण करणे. | 5000000 |
| 55 | | | प्रभाग क्र. ०३ अंतर्गत हॉटेल पवन पासून श्री उमाकांत भंगाळे यांच्या घरापर्यंत व परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 56 | | | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं. २८, २९, ३० परिसरात रस्ते कॉक्रेटीकरण करणे. | 10000000 |
| 57 | | | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत जे.डी.सी.सी. बँक कॉलनी मधील रस्ते कॉक्रेटीकरण करणे. | 4000000 |
| 58 | | | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत मानराज पार्क व गट नं. ३६/५ बेंडाळे नगर मधील रस्ते कॉक्रेटीकरण करणे. | 6000000 |
| 59 | | | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत आर. एल. कॉलनी मधील रस्ते कॉक्रेटीकरण करणे. | 3000000 |
| 60 | | | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत मुक्ताई नगर, द्रौपदी नगर, निवृत्ती नगर येथील रस्त्यालगत आर.सी.सी. गटार बांधणे | 4000000 |
| 61 | | | प्रभाग क्र. ०९ अंतर्गत गट नं. २९ ओपन स्पेस ला चेनलिंक फेनसिंग करून सामाजिक सभागृह बांधणे. | 3500000 |
| 62 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत गट नं. १३९ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 15000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 63 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत पिंप्राळा गट नं. १५४ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 8800000 |
| 64 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत अंबिका हौसिंग सोसायटी पिंप्राळा गट नं. १०६ व १०७ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 11200000 |
| 65 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नं. १४० मध्ये रस्ते डांबरीकरण करणे: | 10000000 |
| 66 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत श्री तळेले ते पॉलीटेक्नीक पर्यंत रस्ता कॉक्रेटीकरण करणे. | 4000000 |
| 67 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत गट नं. ११६ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 9700000 |
| 68 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत गट नं. १२९, १३० मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 10500000 |
| 69 | | | प्रभाग क्र. ११ अंतर्गत गट नं. ११२ पिंप्राळा शिवार मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 7500000 |
| 70 | | | प्रभाग क्र. ०८ अंतर्गत चंदू आण्णा नगर स्टॉप पासून ते पवार पार्कपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 20000000 |
| 71 | | | प्रभाग क्र. ०८ अंतर्गत निमखेडी गावठाण रस्ते कॉक्रिटीकरण करणे. | 3000000 |
| 72 | | | प्रभाग क्र. ०८ अंतर्गत आव्हाने शिवार गट नं. ७६६/२/१ श्रीकृष्ण कॉलनी रस्ते डांबरीकरण करणे. | 3500000 |
| 73 | | | प्रभाग क्र. ०८ अंतर्गत गुड्डू राजा नगर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | 4200000 |
| 74 | | | प्रभाग क्र. १३ अंतर्गत राकेश नगर मधील ओपन स्पेसला चैनलींक फैनसिंग करणे. | 5000000 |
| 75 | | | प्रभाग क्र. १३ मधील डॉ. बी. आर. पाटील (नित्यानंद नगर) परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 76 | | | प्रभाग क्र. १४ मधील स्मशानभूमि नूतनीकरण करणे. | 25000000 |
| 77 | | | प्रभाग क्र. १४ मधील गणपती नगर मधील एल. आय. सी. कॉलनी मधील रस्ते कॉक्रिटीकरण करणे. | 10000000 |
| 78 | | | प्रभाग क्र. १४ मधील जीवन मोती सोसायटीतील रस्ते कॉक्रिटीकरण करणे. | 15000000 |
| 79 | | | (प्रभाग क्र. १४ मधील गायत्री नगर मधील ओपन स्पेस विकसीत करणे. | 5000000 |
| 80 | | | प्रभाग क्र. १४ मधील सर्वे नं. २६९ मधील ओपन स्पेस विकसीत करणे. | 3500000 |
| 81 | | | प्रभाग क्र. १४ मधील २५३/२ मधील ओपन स्पेस विकसीत करणे. | 1000000 |
| 82 | | | प्रभाग क्र. १४ मधील ४३४/१ अ मधील ओपन स्पेस विकसीत करणे. | 1500000 |
| 83 | | | प्रभाग क्र १६ अंतर्गत लाठी शाळा परिसर, ढाके वाडी, मुकुंद नगर, मंजुषा कॉलनी, लक्ष्मी नगर, नवीन जोशी कॉलनी मधील भागात रस्ते कॉक्रिटीकरण करणे | 15000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 84 | | | प्रभाग क्र.१६ अंतर्गत छोडदास नगर, ढाके वाडी, मुकुंद नगर, मंजुषा कॉलनी, ईश्वर कॉलनी, लक्ष्मी नगर, नवीन जोशी कॉलनी यामध्ये आर. सी. सी गटार बांधणे | 6000000 |
| 85 | | | प्रभाग १६ अंतर्गत नवीन जोशी कॉलनी ५१७/२ मधील ओपन स्पेसला चैनलींक फेनसींग करून पेव्हर ब्लॉक बसविणे व सभागृह बांधणे. | 4500000 |
| 86 | | | प्रभाग क्र. १६ अतंर्गत सालार नगर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे व आर.सी.सी. गटार बांधणे. | 20000000 |
| 87 | | | प्रभाग क्र. १६ अतंर्गत टी. एम. नगर सर्वे नं. ५११ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 5800000 |
| 88 | | | प्रभाग क्र. १६ अतंर्गत नाथवाडा येथे रस्ते डांबरीकरण करणे. | 3500000 |
| 89 | | | प्रभाग क्र. १६ अंतर्गत साई बाबा मंदीराला चैनलींग, फेन्सींग व पेव्हर ब्लॉक बसविणे. | 5000000 |
| 90 | | | प्रभाग क्र. १९ अंतर्गत सुप्रीम कॉलनी मधील संभाजी नगर हायवे ते ईदगाह सर्वे नं. १८३ तसेच महावीर मंदीरापर्यंत या रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | 15600000 |
| 91 | | | प्रभाग क्र. १९ अंतर्गत सर्वे नं. १६२/१ व १६२/२/३ व सर्वे नं. १६५ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 10000000 |
| 92 | | | प्रभाग क्र. १९ अंतर्गत सर्वे नं. २१/पी. सदाशिव नगर मध्ये व्यायामशाळा बांधणे. | 2000000 |
| 93 | | | प्रभाग क्र. १९ अंतर्गत उपासनी नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 3000000 |
| 94 | | | प्रभाग क्र. ८ मधील निमखेडी शिवार गजानन कॉलनी गट नं. १९ मध्ये आर.सी.सी. गटारी बांधणे. | 600000 |
| 95 | | | प्रभाग क्र. ८ मधील प्रेमनगर आणि इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | 6000000 |
| 96 | | | प्रभाग क्र. ८ मधील निमखेडी गट नं. ७७ प्रज्ञा कॉलनी निमखेडी शिवारमध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 6900000 |
| 97 | | | प्रभाग क्र. ८ मधील खोटे नगर ते सक्षम अपार्टमेंट निमखेडी रोड पर्यंत रस्तेडांबरीकरण करणे. | 4500000 |
| 98 | | | प्रभाग क्र. ८ मधील शिवम नगर गट नं. ७६५/२, ७६४/१, ७६५ या परिसरातील आव्हाणे शिवार मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 5500000 |
| 99 | | | प्रभाग क्र. ८ मधील गट नं. ७६३ सर्वे नं. ३१६/६, गट नं. ७६२ सर्वे नं. ३१६/४, सावता नगर गट नं. ७६० सर्वे नं. ३११/१ब/ १ रस्ते डांबरीकरण करणे. | 4000000 |
| 100 | | | प्रभाग क्र. ८ मधील गट नं. ७६५/२ सर्वे नं. ३१६/२ शिवम नगर परिसरातील आर.सी.सी. गटार बांधणे. | 2700000 |
| 101 | श्री.राजेंद्र पाटील | 14 | प्र.क्र. १४ मेहरूण स.नं. २७० मधील साईबाबा मंदिर ते श्री. रमेश पुंडलिक लाडवंजारी यांच्या घरापर्यंतचा रस्ता क्रॉन्क्रीटीकरण करणे | 2000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 102 | 80,00,000 | | प्र.क्र. १४ मेहरूण स.नं.२७० मधील उर्वरित रस्ते डांबरीकरण करणे. | 1000000 |
| 103 | | | प्र.क्र.१४ मेहरुण स्मशानभुमी मध्ये बाकडे तसेच दशक्रिया विधीसाठी सभामंडप व इतर सुशोभिकरण करणे | 5000000 |
| 104 | श्रीमती रेखा पाटील | 14 | प्र.क्र.१४ मधील स्मशानभूमी नूतनीकरण करणे. | 25000000 |
| 105 | 8,22,99,322 | | प्र.क्र.१४ मधील एल. आय. सी. कॉलनी मधील रस्ते कॉंक्रिटिकरण करणे | 10000000 |
| 106 | | | प्र क्र. १४ मधील जीवन मोती सोसायटी मधील रस्ते कॉंकिटिकरण करणे | 15000000 |
| 107 | | | प्र. क्र. १४ अंतर्गत आदर्शनगर, आर.टी.ओ. ऑफिस श्री. यांच्या घरापासून ते हस्ती बंगलो पर्यंत जाणारा रस्ता कॉंक्रिटिकरण करणे | 7299322 |
| 108 | | | प्र. क्र. १३ अंतर्गत आदर्शनगर मधील रस्ते कॉंकिटिकरण करणे | 15000000 |
| 109 | | | प. क. १४ अंतर्गत मकरा पार्क मधील रस्ते कॉंकिटिकरण करणे | 10000000 |
| 110 | सुन्ना बी राजु देशमुख | 18 | प्र.क्र.18 अंतर्गत लक्ष्मी नगर मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 2500000 |
| 111 | 1,00,00,000 | | प्र.क्र.18 अंतर्गत विविध ठिकाणी कल्व्हेट बांधणे | 2500000 |
| 112 | | | प्र.क्र.18 अंतर्गत दत्त नगर भागातील रस्ते कॉंक्रीटी करण करणे | 5000000 |
| 113 | सौ. जिजाबाई भापसे | 19 | प्र.क्र. 19 संत गाडगे बाबा रिक्षा स्टॉप ते गजानन बाबा चौक रस्ता डांबरीकरण करणे | 2500000 |
| 114 | 1,45,00,000 | | प्र.क्र. 19 श्री विठ्ठल मंदीर चौक ते प्रेमाबाई जैन शाळेपर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 6000000 |
| 115 | | | प्र.क्र. 19 पोलिस कॉलनी 163,164,188 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| | 81,30,98,675 | | | 813098675 |

सभागृहात मा.पिठासिन अधिकारी तथा महापौर यांचेकडेस सन्मा.सदस्य, श्री.दिलीप बबनराव पोकळे यांनी दिलेल्या पत्रानूसार अ.क्र.०१ ते ११ विकास कामे, सन्मा.सदस्य, श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रानूसार अ.क्रं.०१ ते १० विकास कामे, सन्मा.सदस्या,सौ.रेश्मा कुंदन काळे यांनी दिलेल्या पत्रानूसार अ.क्रं.०१ ते ०५ विकास कामे तसेच सन्मा.सदस्य, श्री.चेतन गणेश सनकत यांनी दिलेल्या पत्रानूसार अ.क्रं.०१ ते ०६ या सर्व विकास कामांना सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरची कामे या सोबतच्या यादीतील अ.क्र.०१ ते ११५ मध्ये समाविष्ट करणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री.दिलीप बबनराव पोकळे | 1 | गट नं.३२९/१, ३२९/२ ज्ञानगंगा शाळेजवळील ओपनस्पेसला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 2. | | | दुर्गादेवी मंदीर इंद्रप्रस्थ नगर येथे ओपनस्पेसला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | | | नाभिक मंगल कार्यालय इंद्रप्रस्थ नगर ओपनस्पेसला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 4. | | | श्री.गजानन महाराज मंदीर केशरबाग ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 5. | | | शिवशंकर कॉलनी मधील ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 6. | | | सिध्दी विनायक पार्क मधील ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 7. | | | हरी ओम नगर मधील ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 8. | | | दत्तात्रय नगर मधील ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 9. | | | गजानन कॉलनी मधील ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 10. | | | एस.के.ऑईल जवळील ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 11. | | | राजमालती मधील ओपनस्पेला चेन फॅन्सिंग व जॉगिंग ट्रॅक पेव्हर ब्लॉक बसविणे. | 35 लक्ष |
| 1. | श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | 2 | प्र.क्र.२ नागला किराणा पासून ते तिवारी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 60,00,000/- |
| 2. | | | प्र.क्र.२ पाठक चक्की ते दर्ग्याच्या कोपऱ्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 50,00,000/- |
| 3. | | | प्र.क्र.२ गोविंद ओझा यांचे दाळफळ पासून ते शिव मंदीरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 70,00,000/- |
| 4. | | | प्र.क्र.२ श्री मोटर्स ते गोविंद ओझा यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 60,00,000/- |
| 5. | | | प्र.क्र.२ गोविंद ओझा यांचे घरापासून कनाकाई रस्त्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 50,00,000/- |
| 6. | | | प्र.क्र.२ शाळा क्र.१ पासून ते क्रांती चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 40,00,000/- |
| 7. | | | प्र.क्र.२ कनाकाई जिनिंगच्या मागच्या बाजूस नागला यांचे किराणा दुकानापर्यंत एक साईडला गटार बांधणे. | 30,00,000/- |
| 8. | | | प्र.क्र.२ नागला किराणा समोरील जुनी मुतारी काढून दुसऱ्या बाजुस नविन मुतारी बांधणे. | 25,00,000/- |
| 9. | | | प्र.क्र.२ अंतर्गत सर्व्हे नं.४१८ ला लागून असलेला लेंडीनाल्यावर दोन लहान आरसीसी पुल बांधणे. | 1,00,00,000/- |
| 10. | | | प्र.क्र.२ सर्व्हे नंबर ३४२/६ब/६अ/१/६अ/२ मधील ओपनस्पेसला वॉल कंपाऊंड करणे. | 80,00,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | सौ.रेश्मा कुंदन काळे | 16 | प्र.क्र.१६ मुकुंद नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | 30,00,000/- |
| 2. | | | प्र.क्र.१६ रणछोड नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | 60,00,000/- |
| 3. | | | प्र.क्र.१६ कंजरवाडा मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | 50,00,000/- |
| 4. | | | प्र.क्र.१६ सर्वोत्तम नगर मध्ये नयनतारा अपार्टमेंट ते नितीन चौधरी यांचे घरापर्यंत आर.सी.सी गटार बांधणे. | 9,80,000/- |
| 5. | | | प्र.क्र.१६ लक्ष्मी नगर मध्ये डॉ.टिलक नारखेडे यांचे दवाखान्यामागील रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 7,00,000/- |
| 1. | श्री.चेतन गणेश सनकत | 4 | प्र.क्र.४ अंतर्गत शनीपेठ पोलीस स्टेशन मागील ओपन स्पेसला कॉक्रीटीकरण करणे तथा शेड उभारणेबाबत. | 25,00,000/- |
| 2. | | | प्र.क्र.४ अंतर्गत ठिक-ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे. | 1,50,00,000/- |
| 3. | | | प्र.क्र.४ ठिक-ठिकाणी इलेक्ट्रीक पोल बसविणे. | 25,00,000/- |
| 4. | | | प्र.क्र.४ ठिक-ठिकाणी हॅन्ड पंम्प व इलेक्ट्रीक पंम्प उभारणे. | 10,00,000/- |
| 5. | | | प्र.क्र.४ अंतर्गत असलेला लेंडीनाल्याला संरक्षण भिंत तथा नाला बांधणेबाबत. | 3,00,00,000/- |
| 6. | | | प्र.क्र.४ अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणेबाबत. | 2,00,00,000/- |

**नगरसचिव , विषय क्रं. १९**:-प्रभाग क्रं.११ व १४ मधील विकास कामांचे प्रस्ताव महासभेच्या पटलावर घेणेबाबत मा.सभागृह नेता, श्री.ललित विजयराव कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- प्रभाग क्रं. १४ मधील जवाई कॉलनी व लक्ष्मी नगरमध्ये रस्ते डांबरीकरण करणे हे कामे १४ मधील नसुन १८ मध्ये आहे तर तो प्रभाग दुरूस्त करण्यात यावा. प्रभाग क्रं. १४ च्या ऐवजी १८ प्रभाग करावा.

**मा.महापौर** :- सर्वानुमते विषय क्रं. १९ मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर** :- सदरील विषयाला माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १११९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.२६/नवि-१६ दि.१८/०२/२०२२ अन्वये वार्ड क्र.११ व १४ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास योजना अंतर्गत शासनाने रुपये १० कोटीचा निधी देणे बाबत शासन निर्णय पारित केलेला आहे, मात्र शासन शुध्दीपत्रक क्रमांक-मनपा-२०२२/प्र.क्र.२६/नवि-१६ मंत्रालय मुंबई ३२ दि.२०/०४/२०२३ नुसार कामे रद्द करुन त्याऐवजी यासोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णयात अट क्र.३ मध्ये प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्क्याचा शासनाचा व मनपा हिस्सा २५ टक्के राहणार आहे. मात्र अशी धारणा आहे कि, शासनाने ७५ टक्के प्रमाणे सदर योजने अंतर्गत रुपये १०.०० कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देतांना रुपये १०.०० कोटी ही ७५ टक्के रक्कम ही शासनाची राहील व याव्यतिरिक्त २५ टक्के म्हणजेच रुपये २.५० कोटीची उर्वरीत कामे मनपा निधीतील असतील करीता शासन

निर्णयात नमुद १४ कामांव्यतिरिक्त खालील प्रमाणे ०२ कामे मनपा २५ टक्के हिश्यापोटी कामे घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**वरील शासन निर्णयाच्या व्यतिरिक्त जळगांव मनपाच्या २५ टक्के निधीतील कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.११ गट नं.१३९ मधील रस्ते डांबरीकरण करणे | १,५०,००,०००.०० |
| २ | प्र.क्र.११ गट नं.१४० मधील रस्ते डांबरीकरण करणे | १,००,००,०००.०० |

**शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.२६/नवि-१६ दि.२०/०४/२०२३ अन्वये समाविष्ट असलेली कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१८ मधील जवाई कॉलनी व लक्ष्मी नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | १,३६,११,६९९.०० |
| २ | प्र.क्र.११ गट नं.१३४ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | ५०,००,०००.०० |
| ३ | प्र.क्र.१४ सर्वे नं.४४४ मधील ओपन स्पेस विकसित करणे | ४०,००,०००.०० |
| ४ | प्र.क्र.११ मधील सर्वे नं.१५० किसनराव नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | ८३,२७,३८८.०० |
| ५ | प्र.क्र.११ भगवान नगर, भुषण कॉलनी, पिंप्राळा ग. नं.१०२, १०४ मधील रस्ते डांबरीकरण करणे | १,२३,१७,१९८.०० |
| ६ | प्र.क्र.११ पिंप्राळा शिवार ग. नं.६५,६६,६९,७० व ७६ मधील रस्ते डांबरीकरण करणे | १,३०,९८,१४१.०० |
| ७ | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.११५ व ११७ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | १,००,००,०००.०० |
| ८ | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.१४३ व १४४ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | २९,८५,०४०.०० |
| ९ | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.१४९मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | ७८,२४,७६२.०० |
| १० | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.१४६मध्ये ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | १८,२४,५८१.०० |
| ११ | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.१४५ मध्ये आरसीसी गटार बांधणे | ९,९९,७६६.०० |
| १२ | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.६४/२ व ३ भुषण कॉलनी रोड साईडला आरसीसी गटार बांधणे | ७,३६,२०९.०० |
| १३ | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.१३८ मध्ये रस्ता डांबरीकरण करणे | ५०,००,०००.०० |
| १४ | प्र.क्र.११ पिंप्राळा ग. नं.१३० मध्ये रस्ता डांबरीकरण करणे | ७५,००,०००.०० |

तसेच सदर कामी शासनाने निश्चित केलेली १४ कामे वरील प्रमाणे २५ टक्के मनपा हिश्यातील ०२ कामे अशी एकत्रित १६ कामांची निविदा प्रक्रिया राबविणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र सभागृहात झालेल्या चर्चेनूसार शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.२६/नवि-१६ दि.२०/०४/२०२३ अन्वये समाविष्ट असलेल्या अ.क्रं.०१ प्र.क्र.१४ मधील जवाई कॉलनी व लक्ष्मी नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणेबाबत नमूद काम हे प्रभाग क्रं.१४ ऐवजी प्रभाग क्रं.१८ असे नमूद करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. २०**:- प्रभाग समिती क्रं.४ चे कार्यालयालगत गिरणा टाकी परिसर चौकात “स्वातंत्र्य सैनिक मा.नगराध्यक्ष कै.पंडीतराव उखाजी कोल्हे” यांचे स्मरणार्थ पाणपोई स्वखर्चाने बांधून देणे कामी परवानगी मिळणेबाबत मा.सभागृह नेता, श्री.ललित विजयराव कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- सर्वानुमते विषय क्रं. २० मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराचे सदयाच्या तापमानामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने शहराचे आताचे तापमान ४५/४६ डिग्रीपर्यंत वाढलेले आहे. तरी नागरिकांच्या सोईकरिता जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार शहरात ठिक-ठिकाणी पाणपोई उभारणे बाबत सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार प्रभाग समिती क्रं.४ चे कार्यालयालगत गिरणा टाकी परिसर चौकात मा.सभागृह नेता, श्री.ललित विजयराव कोल्हे यांचे आजोबा "स्वातंत्र्य सैनिक मा.नगराध्यक्ष कै.पंडीतराव उखाजी कोल्हे" यांचे स्मरणार्थ पाणपोई उभारणी करणेस तयार आहे. या पाणपोईमुळे प्रभाग समिती क्रं.४ कार्यालय व गिरणा टाकी आवारालगत चौकात हरीविठ्ठल नगर, रामानंद नगर, वाघनगर, गिरणा टाकी परिसरात येणारे नागरिक यांना थंड पाणी उपलब्ध होवून उष्मघात होण्याचा धोका कमी होणार असल्याने प्रभाग समिती क्रं.४ चे कार्यालयालगत गिरणा टाकी परिसर चौकात "स्वातंत्र्य सैनिक मा.नगराध्यक्ष कै.पंडीतराव उखाजी कोल्हे" यांचे स्मरणार्थ पाणपोई स्वखर्चाने बांधणे कामी मा.सभागृह नेता, श्री.ललित विजयराव कोल्हे यांना परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. २१**:- प्रभाग क्रं.२ मधील मनपा मालकीच्या आरक्षण क्रं.६१ हि जागा विकसीत करणेसाठी श्री.गणेश क्रिडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक संस्था,जळगांव या संस्थेस देण्याबाबत सन्मा.सदस्य, श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- सर्वानुमते विषय क्रं. २१ मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रं.२ मधील मनपा मालकीच्या आरक्षण क्रं.६१ हि खुली जागा वृक्ष लागवड व देखभाल कामी मिळावी अशी मागणी श्री.गणेश क्रिडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक संस्था,जळगांव या संस्थेने केलेली असुन तसा रितसर प्रस्ताव मा.महापौर यांच्याकडे दाखल केलेला असल्याने प्रभाग क्रं.२ मधील मनपा मालकीच्या आरक्षण क्रं.६१ ही जागा विकसीत करणेसाठी श्री.गणेश क्रिडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक संस्था,जळगांव या संस्थेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबत खात्री करुनच नियमाप्रमाणे कारवाई करावी. प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यापुर्वी प्रशासनाने नियमांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. २२**:- सुप्रीम कॉलोनी मेहरुण जळगांव परिसरातील गट नं.१८२/३ पे ओपनस्पेस विकसित करणेसाठी सुधामती बहुउद्देशिय संस्था,जळगांव शहर यांना देणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.जिजाबाई आण्णासाहेब भापसे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- महापौरताई, नगररचना विभागाला विचारले तर ते म्हणतात की ते तसेच आहे तर माझी विनंती ही आहे की जसा हा प्रस्ताव मंजुर झालेला आहे तसे ते चारही प्रस्ताव मंजुर करून घेण्यात यावे आणि नंतर याची जी प्रोसेस आहे सगळी तर त्यांचा जो क्रायटीरीया असेल तर ते मंजुर करावे त्याला अशी नोंद घेण्यात यावी.

**श्री.जितेंद्र मराठे** :- महापौरताई २०२३ ला आयुक्तांना पत्र दिले होते कि मला या संदर्भात माहिती पाहीजे की जळगांव शहरातील दिलेल्या विविध ठिकाणच्या दिलेल्या ओपनस्पेस की ज्या काही ठिकाणी मंगल कार्यालये उभे आहेत शैक्षणिक संस्था उभ्या आहेत. तर यांच्याकडून आपल्या आर्थिक लाभ हा महापालिकेला काय होतो. याच्या संदर्भात मी पत्र दिलेल आहे.जवळपास आता त्या पत्राला १ महिना होईल. तरी आतापर्यंत मला याच्यासंदर्भात अपेक्षित उत्तर कुठलच मिळालेल नाहीये. तर आयुक्त मॅडमांनी येथे सभागृहासमोर सांगाव की आपण या ठिकाणी म्हणजे ज्या-ज्या ठिकाणी आपण ह्या जागा ज्या महापालिकेने दिल्या आहेत. संस्था वैगेरे आहेत तर त्याच्यामधुन आपल्याला किती आर्थिक जस आता समजा की ती शैक्षणिक संस्था असेल किंवा काही प्रयोजन चालत असेल तर त्याच्यातुन आर्थिक उत्पन्न महापालिकेला किती मिळत.

**मा.आयुक्त** :- चाटेसाहेब ओपनस्पेसबाबत माहिती द्या.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- आपल्या ज्या ओपनस्पेस आहेत ज्या विविध संस्थांना दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये एक अट आहे की कमर्शियल वापर करू नये आणि त्या सार्वजनिक वापरासाठी ठेवाव्या अश्या आपल्या जागा त्या संस्थेला देतांनाची अट आहे आणि कुठल्याही प्रकारचे उत्पन्न आपल्याला मिळत नाही.

**श्री.जितेंद्र मराठे** :- आता नितीनभाऊ मी आपल्या लक्षात आणून देतो. साहेबांनी सांगीतले की याच्यामधुन आर्थिक उत्पन्न काहीच मिळत नाही. आता सेंट टेरेसा इंग्लिश मिडीयम स्कुल माझ्या प्रभागात आहे. २०-२० हजार ५०-५० हजार रूपये डोनेशन ते घेतात. त्याठिकाणी हि एकच शाळा अशी नाहीये अशा अनेक शाळा आपल्या महापालिकेच्या जागेवर आहेत. पण करोडो रूपये

**श्री.ललीत कोल्हे** :- सेंट जोसेफ पण आहे जितुभाऊ

**श्री.जितेंद्र मराठे** :- सेंट जोसेफ पण आहे भाऊ याच्यामध्ये हे त्याठिकाणी त्यांचा आर्थिक लाभ त्याठिकाणी करून घेतात. महेश प्रगती मंडळाबाबत मला सांगा बर साहेब आपल्याकडे माहिती काय आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- महेश प्रगतीची माहितीबाबत आपल्याकडे फाईल आलेली नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- माहिती घेवुन सांगावी आपण काय आहे की याच्यावर अभ्यास करून माहिती घ्यायला वेळ लागेल.

**श्री.जितेंद्र मराठे** :- नाही भाऊ मी याच्यासंदर्भातच मी पत्र दिलेल आहे भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग भाऊ

**श्री.जितेंद्र मराठे** :- एक महिना अभ्यासाला अपुर्ण आहे का भाऊ , एक महिना

**श्री.सुनिल महाजन** :- त्यांच्याकडे ईथे माहिती उपलब्ध नाहीये.

**श्री.जितेंद्र मराठे** :- नाही ना भाऊ मी एक महिना पहिले दिलेल आहे. मी पत्रच दिलेले आहे तोंडी नाही सांगत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही मी काय म्हणतो आहे. मी हे सांगतो आहे की त्यांच एक स्टेटमेंट घेवू की या संबंधी आठ दहा दिवसांत देत असतील किंवा काय तर

**श्री.जितेंद्र मराठे** :- नाही ना भाऊ पण मला मागच्या महासभेमध्ये पण हेच सांगीतल की मी तिन महिन्यापासुन मागे पत्र दिलेले होते. त्याच सुध्दा मला उत्तर मिळालेल नव्हत तेव्हा मला सोनगिरे साहेबांनी सभागृहामध्ये दिल, बरोबर ना साहेब , मग आपण नागरीकांकडे दोन हजारांची घरपट्टी बाकी असली की आपण त्याच्याकडे चारदा माणुस पाठवतो आणि आता मला सांगा मागच्या महापालिकेचे मोठमोठे ओपनस्पेस शैक्षणिक संस्थेला दिलेले आहे. मोठमोठे मंगल कार्यालये २०-२० , ५०-५० हजार रूपये घेतात भाऊ आणि महापालिकेला १ रूपयांच उत्पन्न येत नाहीये आणि आपण एखाद्या घराची किंवा प्लॉटधारकाची घरपट्टी बाकी असली तर ५० वेळा जावुन आपला कर्मचारी तिथे जावुन नोटीस बजावतो कारवाई करतो अनेक वेळा वेगवेगळे उत्तर देतात आणि काही टेंशन घेत नव्हते. तर या सगळ्या गोष्टींमध्ये काही गांभीर्य नाहीये. भाऊ मला आता एक सांगा भारतीय ख्रिश्चन संघ जळगांव यांनी जागेवर अनधिकृत बांधकाम केलेले आहे. प्रयोजन सार्वजनिक वापराकरीता नाही. भाऊ आता हे लव्ह-जिहाद वगैरे हे जे प्रकरण आहे हे अशा म्हणजे इथुनच सुरूवात होते भाऊ मला म्हणजे काही सांगायच उद्दीष्ट फक्त एकच आहे.

**श्री.इब्राहीम पटेल** :- कुठल्या कुठे फाटा देत आहेत तुम्ही भाऊ

**श्री.जितेंद्र मराठे** :- भाऊ कुठे कुठे फाटा कसा दिला वापर पहा ना

**श्री.इब्राहीम पटेल** :- विषय काय आहे भाऊ

**श्री.जितेंद्र मराठे** :- मी सार्वजनिक प्रश्नावर बोलतोय भाऊ प्रश्नावर बोलतोय.

**श्री.इब्राहीम पटेल** :- प्रश्नावर बोला ना

**श्री.जितेंद्र मराठे** :- प्रश्नावरच बोलतोय ना , आता याठिकाणी अभ्यास करायला एक महिना मुदत फार झाली. एक महिनापुर्वी दिलेले पत्र आहे.

**मा.उपमहापौर** :- भाऊ एक मिनिंट तुम्हाला काय पाहीजे आहे ओपनस्पेसची माहिती पाहीजे आहे ना.

**श्री.जितेंद्र मराठे** :- हो ना

**मा.उपमहापौर** :- साहेब सांगा ना तुम्ही कधी द्याल ती माहिती

**श्री.जितेंद्र मराठे** :- कुलभुषणभाऊ पत्रावर उत्तर नाहीये कधी देणार आहे काय देणार आहे ते

**मा.उपमहापौर** :- साहेब तुम्ही सांगा कधी देणार आहे ते किती दिवसांत देणार आहे तर तस

**श्री.जितेंद्र मराठे** :- वेळ टाळण्यासाठी नका सांगू बर

**मा.उपमहापौर** :- सभागृहात सांगत आहात आणि हे लक्षात असू द्या की सभागृहात सांगा की किती दिवसांत देणार आहे ती माहिती

**श्री.जितेंद्र मराठे** :- महापौरताई आपण पण याकडे लक्ष दयाव कारण की हे बघा , प्रशासनाकडून जर या पत्रावर काहीच होत नसेल तर आणि आपण सांगतो महापालिकेचे आर्थिक नुकसान आहे याच्यात आहे त्याच्यात आहे त्याच्यात आहे. करोडो रूपये पैसे कमवता आहेत महापालिकेला काय उत्पन्न देत आहेत काहीच नाही. महापालिकेचे मनपा फंडाचे बिल तुमचे कंत्राटदारांना बिल देत नाही कशामुळे देत नाही. नाहीये म्हणुन देत नाही ना तर यांच्याकडून काहीतरी घेतल पाहीजे ना आपण आता त्याठिकाणी त्याअटींचा भंग करून ते चालु आहे. मग आपण याठिकाणी थोडक्यामध्ये काही विचारायच नाही का

**सौ.ज्योती चव्हाण** :- रूस्तमजी शाळेची ही माहिती द्या.

**श्री.जितेंद्र मराठे** :- रूस्तमजीची पण आहे ना

**मा.महापौर** :- प्रशासनाने याच उत्तर द्याव की तुम्ही सन्मा.सदस्य यांच्या पत्राच उत्तर कधी व कसे देणार आहे.

**श्री.जितेंद्र मराठे** :- बर का भाऊ मंगल कार्यालयाला एक एक लाख रूपये घेतात भाऊ जे महापालिकेच्या जागेवर आहे आणि यांच्याकडे एक रूपया येत नाही. म्हणजे आपण कोणाच्या बाजुने हे करायच

**मा.उपमहापौर** :- आपल्या महानगरपालिकेच्या ओपनस्पेसेसवर व्यवसायिक वापर सुरू केलेला आहे.

**श्री.बागुल,नगररचनाकार** :- साहेब माहिती गोळा करायच काम सुरू आहे लवकरच माहिती तयार झाली की देवू.

**मा.उपमहापौर** :- किती दिवसात देणार

**श्री.बागुल,नगररचनाकार** :- १५ दिवसात देणार साहेब

**सौ.उज्वला बेंडाळे** :- साहेब आता रिटायर होणार आहेत. दुसऱ्या कोणाला तरी जबाबदारी द्या साहेब मला वाटत उद्या परवा रिटायर होणार आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- उद्या होणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- पुढच्या महासभेमध्ये परत उत्तर मिळेल की आम्ही समिती गठीत केलेली आहे यासंदर्भात

**श्री.नितीन लढ्ढा** :- ओपन स्पेस संदर्भात जे काही प्रश्न असतील ते थोडक्यात काय आहे की पुढील महासभेसमोर सादर करावे आणि याच्यामध्ये चुका काही होणार नाही याची काळजी घ्यावी.

**श्री.जितेंद्र मराठे** :- पुढच्या महासभेमध्ये कशाला भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- जितुभाऊ त्यांना वेळ लागेल माहिती गोळा करायला.

**श्री.जितेंद्र मराठे** :- अहो भाऊ प्रत्येक पत्राला गांभीर्य नाहीये येथे

**श्री.नितीन लढ्ढा** :- वास्तविक सन्मा.सदस्यांच्या पत्राला गांभीर्याने उत्तर दिले पाहीजे आणि सन्मा.सदस्य ज्या पध्दतीने प्रश्न विचारतात.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- मी सुध्दा पत्र दिलेले आहेत अजुन उत्तर मिळालेले नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- अस व्हायलाच नको ना

**श्री.जितेंद्र मराठे** :- धिरजभाऊंनी पण पत्रव्यवहार केला मी केला तरी सुध्दा उत्तर देत नाही ना ते.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- एकच सुचना देतो की, मा.महापौरताई की आयुक्त मॅडमांनी एक आदेश करावा की, सन्मा.सदस्यांच पत्र आल्यावर त्याला आठ दिवसात उत्तर मिळाल पाहीजे. मग ते चेतन भाऊ असतील किंवा कोणी असेल त्यात सर्व सन्मा.सदस्य असतील. आपल्याकडून आता हे पत्र एकच आहे बाकीचे पत्र तर अजूनही फिरताहेत. मी तिन वर्षापासुन एक पत्र दिलेले आहे त्या पत्राचे अजुनपर्यंत उत्तर पण नाही आणि ते सापडणार सुध्दा नाही. मी

असो की कोणी असो सन्मा.सदस्य असुन पत्र आठ दिवसात त्याला उत्तर मिळालच पाहीजे. कितीका प्रश्न असे ना आणि किती का माहिती असेना एक आदेश त्याच्या संदर्भात केला पाहीजे.

**श्री.इब्राहीम पटेल** :- मी एक प्रस्ताव केलेला होता तो प्रस्ताव तो

**मा.महापौर** :- या संदर्भामध्ये मा.आयुक्त यांनी या सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांकडून येणाऱ्या प्रत्येक पत्राला आठ दिवसाच्या आत किंवा आठ दिवसांपर्यंत उत्तर देण अपेक्षित आहे. जर अशी अंमलबजावणी होत नसेल तर त्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. आयुक्तांनी याबाबतचा खुलासा करावा.

**श्री.जितेंद्र मराठे** :- महापौरताई अमृतच्या संदर्भामध्ये बोलतो. ताई आपल अमृत च्या संदर्भामध्ये बोलणे झालेले होते आणि या डॉकेटमध्ये याच्यामध्ये केलेला आहे उल्लेख आता जे आपल बोलण झालेल होत की आठ दिवसामध्ये त्या भागाचा पाणी पुरवठा सुरू करणार आहे. आता मागच्या महासभेच्या आणि आजच्या महासभेला एक महिना पुर्ण झाला. अजुनही तिथे कुठल्याच प्रकारची कार्यवाही झाली नाहीये. मला सांगा की पिठासीन अधिकारी म्हणुन आपण काहीतरी कडक निर्बंध लावा त्याच्याशिवाय होणार नाही. हे पहा तुम्हीच दिलेल आहे हे काही मी माझ्या हाताने लिहीलेले नाहीये. नितीनभाऊ सभागृहामध्ये सांगीतलेले आहे आठ दिवसात काम सुरू होतय आता एक महिना झाला. काहीच नाही भाऊ सगळ झालेल आहे. विज कनेक्शन बाकी होत भाऊ ते पण झालेल आहे. त्या लोकांना भाऊ मी मागच्या वेळेस पण सांगीतले. ट्रॅक्टरने पाणी द्याव लागत भाऊ खांद्यावर नागरीकांना न्याव लागत त्या भागातील अमृतचे सगळे कनेक्शन झालेले आहे. मग यांना पाणी द्यायला अडचण काय आहे. महापौर ज्या वेळेला सांगतात ना त्याच्याकडे कोणी लक्ष देत नाही. तुम्ही याच्यावर काहीतरी निर्बंध तयार करा भाऊ त्याशिवाय हे काम होणार नाही.दरवेळेस असच होत आता परत पुढच्या महासभेत मी दाखवेल की हे पहा नितीनभाऊ याचे काम अजुन का होत नाहीयेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- तस व्हायला नको.

**मा.महापौर** :- या संदर्भामध्ये संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावा की जर आपण आठ दिवसांच्या आत उत्तर दिले नाही तर आपल्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल आणि जर आयुक्त मॅडमांनी केली नाही तर आपण सगळे जण मिळुन आयुक्त मॅडमांवर जबाबदारी निश्चित करू.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य आहे.

**मा.उपमहापौर** :- माझ अनुमोदन आहे.

**श्री.चेतन सनकत** :- महापौरताई मी कलम ४४ मध्ये मी प्रश्न विचारलेले आहेत त्याच उत्तर मला अजूनपर्यंत मिळालेले नाही ती पण सुचना द्यावी.

**मा.महापौर** :- सांगीतले आहे. विषय क्रं. २२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१९ मधील सुप्रीम कॉलोनी मेहरुण जळगांव परिसरातील सुधामती बहुउद्‌देशिय संस्था जळगांव शहर ही एक सामाजिक फाऊंडेशन असून समाजपयोगी उपक्रम काम राबवीत असतात त्यांनी याच परिसरातील सुप्रीम कॉलोनी मेहरुण जळगांव परिसरातील गट नं.१८२/३ ओपनस्पेस अविकसित ओपन स्पेसवर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, बालउदयान ऑक्सिजन पार्क व इतर उद्‌देश पूर्ण करण्याचा मानस दर्शविलेला असून याबाबत त्यांनी विनंती केलेली असल्याने सुप्रीम कॉलोनी मेहरुण जळगांव परिसरातील गट नं.१८२/३ ओपनस्पेस विकसित करणेसाठी सुधामती बहुउद्‌देशिय संस्था,जळगांव शहर यांना महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबत खात्री करुनच नियमानुसार कारवाई करावी. प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यापुर्वी प्रशासनाने नियमांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव , विषय क्रं. २३**:- पिंप्राळा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक पिंप्राळा ते खंडेराव नगर रेल्वे पुलापर्यंतच्या रस्त्यावर विदयुत रोषणाई करणेबाबत मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सौ.पार्वताबाई भिल** :- महापौरताई मला बोलायच आहे.

**मा.महापौर** :- बोला ताई

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे आणि याच्यामध्ये एक सुचना आहे की नागरी दलीतवस्ती असेल, नगरोत्थान असेल, मुलभुत सुविधा अंतर्गत निधी असेल, विशिष्ट निधी असेल किंवा जिल्हा नियोजन निधी असेल किंवा महानगरपालिकेचा निधी असेल तर ती तशी नोंद करून घ्यायची आहे याच्यामध्ये माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- सदर विषयामध्ये मा.उपमहापौर यांनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घेवुन त्या संदर्भात कार्यवाही करावी. विषय क्रं. २३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सौ.पार्वताबाई भिल** :- महापौरताई मी पण एक पत्र दिले होते ताई काम करायच्या बाबतीतील, परत मी हरिविठ्ठल नगरमध्ये रोड , गटारी यांचे काम चालु आहेत. तर ते काम दुमत नाहीये पण मी एक पत्र दिल होत की त्याची चौकशी करा आणि चौकशी करून त्यांचे बिल काढा. तर ते काम झाले बिल पण निघाले पण आता हे काम आहे ना बरोबर झाल नाहीये पाणी जात नाहीये आणि प्रत्येक ठिकाणी थोडे-थोडे काम बाकी आहेत. तर ती चौकशी करा आणि परत मला हि माहिती द्या.

**मा.महापौर** :- प्रत्यक्ष याठिकाणी जावुन पाहणी करावी आणि त्याची शहानिशा करा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा येथील मुख्य चौकातील छत्रपती शिवाजी महाराज चौक पासुन खंडेराव नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर पथिदवे बसविलेले नसल्याने रात्री अंधार असतो त्यामुळे वाहनचालक व पादचारी यांना अडचणीचा सामना करावा लागतोय. अपघात घडण्याची शक्यता वाढलेली असल्याने या मार्गावर ठिकठिकाणी विजेचे खांब उभारुन पथदिवे व्यवस्था करणेस तसेच छत्रपती शिवाजी महाराज शिव स्मारकाजवळ एक १६ मीटर खांब उभारुन या ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणेकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३५,२९,१९८/- मात्रचा खर्च जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना,शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधीतून किंवा जळगांव मनपा निधीतुन करणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव , विषय क्रं. २४**:- पिंप्राळा विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे इमारतीसाठी पिंप्राळा जुनी ग्रामपंचायत जागा मिळणेबाबत मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**ॲड.शुचिता हाडा** :- महापौरताई, आता कुलभुषणभाऊ यांनी आता पिंप्राळा विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, पिंप्राळा यांना पिंप्राळा ग्रामपंचायतीची जागा मिळावी असा प्रस्ताव दिलेला आहे हा अशासकीय प्रस्ताव आहे. याविषयी सभागृहात म्हणजे विशेष आयुक्त महोदयांना आठवण करून देवु ईच्छिते की, आपण आता बजेटमध्ये तरतूद केली आहे मनपा मालमत्तांच सर्वेक्षण व व्हॅल्युऐशन कामी आपण एक कोटीची तरतूद केली आहे. त्या संदर्भात मी आपला महासभेचा अजेंडा येण्यापुर्वी प्रस्ताव सुध्दा महापौरताईंकडे पाठवला होता की आपण ते आऊटसोर्स करूया आणि त्या सगळ्या मालमत्तांचा आपण शोध घेवु या. महापौरताईंनी माझ्या माहिती प्रमाणे त्याला ईन्क्लोज केलेल आहे की प्रशासकीय प्रस्ताव बनवुन महासभेसमोर आणावा. अगदी कधी सांगायच टेक्निकली तर आपण बजेटमध्ये प्रोव्हीजन केल्यानंतर प्रशासनाने तो प्रस्ताव आणणे अपेक्षित आहे अभिप्रेत आहे. पण प्रशासकीय काम आपले होतच नाही

कधीही वेळेत होत नाही. या सगळ्या सभागृहाच्या भावना गेल्या काही तासांपासुन ऐकतो आहे. या कामाच महत्व कुलभुषण भाऊ हा विषय मी तुमच्या लक्षात आणुन देते की काही नगरसेवक असे असतात की ते अशा जागांचा शोध घेतात. माहिती काढतात अगदी आपल्या मनपाच्या दप्तरी नाही की हि जागा आपल्या मनपाच्या मालकीची आहे याची माहितीही नसेल ती अशीच पडुन असेल माहिती नसेल. कुलभुषणभाऊंना ईच्छा झाली त्यांनी ते करण्याचा प्रयत्न केला म्हणुन त्यांनी ती जागा शोधुन काढली तसा अशासकीय प्रस्ताव मांडला पण आपण का आपल्या जागांबद्दल जागरूक नाही. आयुक्त महोदया आपल्याला हा प्रश्न आहे की आपण अजुनही ते प्रशासकीय डॉकेट बनवुन पाठवलेल नाही. खरतर त्याला महासभेच्या मान्यतेचीही गरज नाहीये. तुम्ही सुध्दा बजेटमधील तरतूदीनुसार करू शकतात काम मार्गी लावु शकतात. पण अक्षम्य अस दुर्लक्ष आपले दरवेळेला होत असत. कोणत्याच जागा अशा आपल्याला ज्ञात नाही अशाच मोड मध्ये असतो अधिकारी आणि कर्मचारी अगदी वास्तव घ्यायच पाहील तर रेडक्रॉस सोसायटीच्या शेजारची इतकी मोक्याची जागा मी शोधुन काढलेली होती. ती सुध्दा अस्तित्वात नसलेल्या संस्थेला दिली होती आणि अनेक वर्ष तशीच पडुन होती. आता मुळ विषयाकडे येवुया आपण कुलभुषणभाऊंनी ज्या जागेची मागणी केलेली आहे. प्रशासनाने याच्याबद्दलच काहीतरी मत द्याव कारण काय आहे की हा अशासकीय प्रस्ताव आहे. हि जागा देवुन टाकावी अस आता नितीनभाऊंनी येथे मांडलेल आहे. तर आपण हे कायदेशीर देवु शकतो का ? म्हणजे त्याच्यापलिकडची मागणी अशी करणार किंवा अस जर का करता येत असेल तर प्रशासकीय होवू द्या ते.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ताई काय आहे की जरी आपण हा अशासकीय प्रस्ताव केला तरी , मान्य आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- नितीनभाऊ ग्रामपंचायतीची जी जागा आहे ती विविध कार्यकारी सोसायटीला देता येईल का?

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई ॲक्चुअल काय आहे की ज्यावेळेला एखादा परिसर किंवा भाग असेल आणि त्याचा समावेश जेव्हा महानगरपालिकेमध्ये होतो तर त्या संपुर्ण जागा या महानगरपालिकेकडे येतात.

**ॲड.शुचिता हाडा** :- हो ना म्हणजे आज मालकी त्याच्यावर आपलीच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ताई आपली आहे

**ॲड.शुचिता हाडा** :- आपली असल्याने जागेचा विनियोग करणेकामी आपण तो विषय

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ताई मी तेच म्हणतोय ना की , ताई आपण जरी हा अशासकीय प्रस्ताव केला परंतू याची ठरावाची अंमलबजावणी करतांना प्रशासन प्रशासनाच्या कार्यवाही नियमाप्रमाणे जी काही प्रोसिजर असेल ती फॉलो करावी लागेल. कारण ती त्यांना बंधनकारक आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- नाही ना भाऊ अशासकीय प्रस्तावच आहे ना हा, जर प्रशासकीय प्रस्ताव असेल तर प्रशासनाने

**श्री.नितीन लढ्ढा** :- काय होतय ताई

**ॲड.शुचिता हाडा** :- याच्या कायदेशीर बाबी तपासाव्या आणि पॉसिबल असेल आणि व्हिजीबल असेल प्रॅक्टिकली असेल तर त्याचा प्रशासकीय प्रस्ताव बनवुन महासभेसमोर पाठवा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही मी काय म्हणतोय की लोक प्रतिनिंधीना धर्मसंकटात पडायचे काम असत. म्हणुन प्रशासनाला ठरावामध्येच आपण स्पष्ट नमुद शेवटी लाईन जी टाकतो की प्रशासनाने योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी.

**ॲड.शुचिता हाडा** :- प्रशासनाने याबाबतीत कायदेशीर बाबी तपासुन घ्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नियमात बसत असेल तरच प्रशासन कार्यवाही करेल आणि ठरावावर कार्यवाही करेल.

**ॲड.शुचिता हाडा** :- ते नियमात बसु शकत का? बसु शकत तर कस बसु शकत ?

**श्री.नितीन लढ्ढा** :- आणि नसेल बसत तर ठराव सरळ-सरळ राज्य शासनाकडे प्रशासनाकडून विखंडनाला जाईल.

**ॲड.शुचिता हाडा** :- प्रशासनाने हे सांगाव की नियमानुसार हे देता येऊ शकत आहे का?

**श्री.बागुल, नगररचनाकार** :- याबाबत नियम काय आहेत ते बघतो आणि या जागेबाबत माहिती घेतो आणि ते देता येईल का हि सगळी तपासणी करून मग निर्णय घेवू आपण

**ॲड.शुचिता हाडा** :- मग तोपर्यंत हा विषय तहकुब ठेवा. तहकुब ठेवा नाहीतर पॉसिबल असेल तर तो पुढच्या वेळेला महासभेसमोर प्रशासकीय डॉकेट वर येवू द्या कुलभुषणभाऊ , आम्ही विरोध करत नाहीये फक्त त्याची प्रॅक्टीकली व्हिजीबिलीटी चेक करतो आहे आणि आता याच्यात बागुलसाहेब त्याच्यात उत्तर देवु शकत नाहीये तर आपण कसा काय निर्णय घ्यायचा की याची आपण मागणी केल्याप्रमाणे मंजुर आज आपण म्हणतो आहे. ते उत्तर पण देवू शकत नाहीये कायदेशीर बाबींना सांगु शकत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई आपण आज जरी मंजुर केले ना तर त्याची अंमलबजावणी प्रशासन सर्व तपासुनच त्याची अंमलबजावणी करणार आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- मग म्हणुनच

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई याच फक्त एकच अस समाधान आहे की कोणी केलेली मागणी आपण मान्य केली आहे. जे काही कायदेशीररित्या असेल ते प्रशासन बघेल आणि कायदेशीररित्या प्रशासन करेल.

**ॲड.शुचिता हाडा** :- आपण जरी विषय मान्य केला आणि निश्चितपणे प्रशासन त्याची अंमलबजावणी कायदेशीरपणे करणार

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई यात महत्वाचा मुद्दा तो आहे की या प्लेटवर आपल नांव लावुण घेण दुसर काही नाही.

**ॲड.शुचिता हाडा** :- पुन्हा एकदा मी सभागृहाच्या समोर लक्षात आणुन देते की बजेट तरतूदीनुसार आपल्याकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. अजेंडा निघतोय असा महापौर कार्यालयातुन फोन आल्यानंतर हा प्रस्ताव पाठवला. मालमत्तांच सर्वेक्षण व व्हॅल्युऐशन करणेकामी याच आऊटसोर्सींग करा असे, आपल्याला एक पत्र दिल आयुक्त म्हणुन आपल्याकडे महापौरांनी एक पत्र वर्ग केल तरी सुध्दा याकामी कोणतीही प्रशासकीय हालचाल झालेली नाही. महापालिका आणि तिच्या मालमत्ता हा अत्यंत महत्वाचा विषय आहे तर मग याच्याबद्दल आपण इतके उदासिन का? म्हणजे आपल्याला सांष्टांग दंडवत घालायच बाकी ठेवायच का आम्ही , प्रशासन आमच्या नेमके कोणत्या कामांना गांभीर्याने घेणार आहे.

**मा.आयुक्त** :- मालमत्ता सर्वेक्षणाच आपण काम हाती घेवू.

**ॲड.शुचिता हाडा** :- या विषयाच काय करता आहे ताई

**श्री.नितीन लढ्ढा** :- ठिक आहे ना ताई ठराव मंजुर जरी केला आता तरी शेवटी प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी नियमाप्रमाणे करावी.

**ॲड.शुचिता हाडा** :- या विषयी प्रशासनाने कायदेशीर व नियमाप्रमाणे बाबी तपासाव्यात आणि प्रशासकीय मंजुरी जर कायदेशीर बाबी पडताळल्यानंतर तो होत नसेल तर नाही. प्रशासन याला जबाबदार असेल.

**मा.उपमहापौर** :- कस आहे ताई याच्यामध्ये सर्वात महत्वाचा विषय तुमच्या लक्षात आला नाही.

**ॲड.शुचिता हाडा** :- कुलभुषणभाऊ कायदेशीर मार्गाने येवु द्या महासभेसमोर यायला पाहीजे.

**मा.उपमहापौर** :- ठिक आहे ताई

**श्री.नितीन लढ्ढा** :- मंजुर करा आणि पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २४ मध्ये प्रशासनाने सर्व कायदेशीर बाबी तपासुन याची अंमलबजावणी करावी आणि सन्मा.सदस्या. शुचितताईंनी दिलेल्या सर्व सुचनांच याठिकाणी पालन कराव आणि त्याच्या नोंदी घ्याव्या. सर्वानुमते विषय क्रं.२४ हा मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा येथील जुनी ग्रामपंचायत जागा पिंप्राळा विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे इमारतीसाठी मिळावी अशी मागणी या सोसायटीच्या संचालकांनी केलेली आहे. त्याठिकाणी पिंप्राळा विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची इमारत उभारणेसाठी विविध शासकीय निधी वा लोकसहभागातुन ते खर्चाची उभारणी करणार असल्याने पिंप्राळा विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे इमारतीसाठी पिंप्राळा जुनी ग्रामपंचायत ची जागा महानगरपालिका अटी-शर्तीस बंधनकारक राहून पिंप्राळा विविध कार्यकारी सहकारी सोसायटीला देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी सर्व कायदेशीर व प्रशासकीय बाबी तपासून नियमाप्रमाणे कार्यवाही करून ठरावाची अंमलबजावणी करावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव , विषय क्रं. २५**:- पिंप्राळा येथुन खंडेराव नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर नाल्याच्या ठिकाणी पुल बांधणेबाबत मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे. तसेच याच्यामध्ये लेखाशिर्ष पुर्ण टाकुन घ्यायचा आहे नागरी दलीतवस्ती, नगरोत्थान, मुलभुत सुविधा अंतर्गत निधी, विशिष्ट निधी किंवा जिल्हा नियोजन निधी किंवा महानगरपालिकेचा निधी असेल वगैरे ठिक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- या अगोदर जसे टाकले आहे तसे टाकण्यात यावे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा येथील आनंद मंगल कॉलनीकडुन खंडेराव नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर मयुर कॉलनी येथील गट नं.१७६ जवळुन वाहात असलेल्या नाल्यावर पुर्वीच्या काळी लोकसहभागातुन नाल्याचा प्रवाह ओलांडण्याकरिता पुल बांधण्यात आलेला होता. मात्र हा पुल आता जुना आणि जिर्ण झालेला असुन तो केंव्हाही कोसळण्याची शक्यता असल्याने पिंप्राळा येथुन खंडेराव नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर नाल्याच्या ठिकाणी नव्याने पुल बांधण्याकरिता येणाऱ्या रक्कम रु.४०/- लक्ष मात्रचा खर्च जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना,शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधीतून किंवा जळगांव मनपा निधीतुन करणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव , विषय क्रं. २६**:- सन २०२३-२४ या आर्थीक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडी मधील शिक्षिका व मदतनिस यांना दि.०१/०६/२०२३ ते दि.३०/११/२०२३ पावेतो सहा महिन्याकरीता मानधनावर नविन नियुक्ती आदेश होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सेमी इंग्रजी माध्यमाच्या बालवाडीतील शिक्षिका २० व मदतनिस १० तसेच मराठी माध्यमातील बालवाडी शिक्षिका ७ व मदतनिस ९ असुन यांना मानधन तत्वावरील नविन नियुक्ती आदेश दि.०१/०६/२०२३ ते दि.३०/११/२०२३ पावेतो देणेकामी तसेच मराठी माध्यमातील २ शिक्षिका हया सेवा मुक्त झालेल्या आहे व १ मराठी माध्यम शिक्षिका ही दि.३०/०९/२०२३ रोजी सेवा मुक्त होणार आहेत तरी त्यांचे जागेवर मराठी माध्यम बालवाडीसाठी ३ नविन शिक्षिकांची मानधन तत्वावर ६ महिन्याकरीता नियुक्ती करणे आवश्यक असल्याने महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सन २०२३-२४ या आर्थीक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडी मधील शिक्षिका व मदतनिस यांना दि.०१/०६/२०२३ ते दि.३०/११/२०२३ पावेतो सहा महिन्याकरीता मानधनावर नविन नियुक्ती करणेस तसेच सदर कालावधीतील अंदाजित मानधन खर्च रक्कम रु.२२,५०,०००/- मात्र महिला व बालकल्याण निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ५५** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव , विषय क्रं. २७**:- मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६२ (फायर फायटर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.६७,४७१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६२ (फायर फायटर) हे वाहन अग्निशमन विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६२ (फायर फायटर) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | Oil Filer Element Spinon BS3/4 - 1 Nos | १० | Clutch Cover 352 DIA BS3/4 -1 Nos |
| २ | Fuel Filter /element BS3/4 - 1 Nos | ११ | Assy. Clutch Release Bearing BS1/2/3/4 -1 Nos |
| ३ | Air Filter Primary ?Element BS1/2/3/4/6 - 1 Nos | १२ | Clutch Release Yoke BS1/2/3/4 -1 Nos |
| ४ | Air Filter Element Safety BS1/2/3/4/6 -1 Nos | १३ | Assy. Wiper Blade BS1/2/3/4/6 -2 Nos |
| ५ | Synthetic Grease Pack 3 KG - 3 Nos | १४ | Filter Element Protect /Filter BS1-4 -1 Nos |
| ६ | Oil Seal BS2/3/4 -2 Nos | १५ | TMGO Diesel Engine Oile C14 Plus 15W40 -16500 ML |
| ७ | TMGO RA Oil 80W140 Long Life -14000 ML | १६ | Oil Seal Double Lip -2 Nos |
| ८ | Power Steering Fluid -1 Liter -2 Nos | १७ | Oil Seal Double Lip -2 Nos |
| ९ | Clutch Disc 352 DIA (Organic)BS3/4 -1 Nos | १८ | All Labour Charges |

मनपा वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६२ (फायर फायटर) या वाहनाची दुरुस्ती करणे आवश्यक असून त्या वाहनाचा तांत्रिक तपासणी अहवाल सादर केलेला असून वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.११/०४/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.६७,४७१/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्यास सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.६७,४७१/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. २८**:- मनपा प्रशासकीय विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.२०,३११/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) हे वाहन शहर अभियंता कार्यालयाकडे प्रशासकीय कामकाजाकरिता कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीची कामे

नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे कामी शहर अभियंता कार्यालयाकडील टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी अनुक्रमे १)००२२९२ २)००२२९३ ३)००२२९४ दि.१७/०४/२०२३ व कार्यालयीन टिप्पणी प्राप्त झालेली आहे. सदरचे वाहन हे महानगरपालिका शासकीय कामानिमित्त बाहेरगांवी (नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, मुंबई) येथे जावे लागते. जळगांव शहरामध्ये विविध विकासकामे सुरु असल्याने शहर अभियंता यांना सदर कामांची पाहणी करणे कामी वेळोवेळी जावे लागत असल्याने त्याकामी वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. वाहन चालक यांच्या मागणी कार्यालयीन टिप्पणी प्रमाणे सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | Maximile Elite 1.8 L - 1 Nos | १२ | Belt AC WP -2 Nos |
| २ | Maximile Feo 1 L - 1 Nos | १३ | Eight Wheel Balance (40 GM) -1 Nos |
| ३ | Maximile LCG Grease 400 GMS - 1 Nos | १४ | Washer Sealing M16.2X21.90X2 -1 Nos |
| ४ | Maximile Syntec F2 1L - 2 Nos | १५ | Pulley Idler 4PK -1 Nos |
| ५ | Kit Filter Element -1 Nos | १६ | Thar -Toothed Lock Washer -2 Nos |
| ६ | Balance WT 40 GMS -1 Nos | १७ | Cable Parking Brake Rear -1 Nos |
| ७ | Balance WT 45 GMS -2 Nos | १८ | Oil Seal Wheel Hub -2 Nos |
| ८ | Shock Absorber Assy Rear -2 Nos | १९ | Oil Filter -1 Nos |
| ९ | Weight Wheel Balance (30GM) -2 Nos | २० | Local Spare Part Consumable -Cottonww -1 Nos |
| १० | Eight Wheel Balance (60GM) -1 Nos | २१ | Maximile FEO 5 L -1 Nos |
| ११ | Element Air Cleaner -1 Nos | २२ | All Labour Charges |

मनपा वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) या वाहनाची दुरुस्ती करणे आवश्यक असून त्या वाहनाचा तांत्रिक तपासणी अहवाल सादर केलेला असून वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.सातपुडा ऑटोमोबाईल्स,नशिराबाद जि.जळगांव यांच्याकडील प्री इनव्हाइस नं.RO२४B०००२६९, दि.१८/०४/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.२०,३११/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.सातपुडा ऑटोमोबाईल्स,नशिराबाद जि.जळगांव यांना रक्कम रु.२०,३११/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. २९**:- मनपा प्रशासकीय विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.१५,८६७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) हे वाहन शहर अभियंता कार्यालयाकडे प्रशासकीय कामकाजाकरिता कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे कामी शहर अभियंता कार्यालयाकडील टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी अनुक्रमे १)००२२९५ दि.१७/०४/२०२३ व कार्यालयीन टिप्पणी प्राप्त झालेली आहे. सदरचे वाहन हे

महानगरपालिका शासकीय कामानिमित्त बाहेरगांवी (नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, मुंबई) येथे जावे लागते. जळगांव शहरामध्ये विविध विकासकामे सुरु असल्याने शहर अभियंता यांना सदर कामांची पाहणी करणे कामी वेळोवेळी जावे लागत असल्याने त्याकामी वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. वाहन चालक यांच्या मागणी कार्यालयीन टिप्पणी प्रमाणे सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | Primed Refresh Fascia Panel - 1 Nos | ३ | BR Fog Lamp Wiring N Switch |
| २ | BR Fog Lamp with Bracket - 1 Nos | ४ | All Labour Charges |

मनपा वाहन क्रं.एम एच १९ सी.यु.७१९७ (बोलेरो) या वाहनाची दुरुस्ती करणे आवश्यक असून त्या वाहनाचा तांत्रिक तपासणी अहवाल सादर केलेला असून वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.सातपुडा ऑटोमोबाईल्स,नशिराबाद जि.जळगांव (बॉडीशॉप) यांच्याकडील सर्व्हीस कोटेशन नं.QTN24B000053, दि.१७/०४/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.१५,८६७/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्यास सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.सातपुडा ऑटोमोबाईल्स,नशिराबाद जि.जळगांव (बॉडीशॉप) यांना रक्कम रु.१५,८६७/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ३०**:- मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८५७ (फायर फायटर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५४,३१५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८५७ (फायर फायटर) हे वाहन अग्निशमन विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे कामी वाहन चालक टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी अनुक्रमे ३७०१, ३७०२, ३७०३ दि.०३/०४/२०२३ व कार्यालयीन टिप्पणी प्राप्त झालेली आहे. वाहन चालक यांच्या मागणी कार्यालयीन टिप्पणी प्रमाणे सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८५७ (फायर फायटर) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | TMGO Diesel Engine Oil C14 Plus 15W40 - 21000 ML | ११ | Oil Seal (135X170X15) BS1/2/3/4/6 -2 Nos |
| २ | Oil Filter Element Spinon BS3/4 - 1 Nos | १२ | Taper Roller BRG Outer 32217 BS1/2/3/4 -2 Nos |
| ३ | Fuel Filter Element BS3/4 - 1 Nos | १३ | Taper Roller BRG Inner 683/72 BS1/2/3/4/6 -2 Nos |
| ४ | Air Filter Primary Element BS3/4 - 1 Nos | १४ | Oil Seal (135X170X15) BS1/2/3/4/6 -2 Nos |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | Air Filter Element Safety BS1/2/3/4/6 - 1 Nos | १५ | Brake Lining Kit (STD) 410X180NA1707 BS1-6 - 4 Nos |
| ६ | TMGO Gear oil 80W90 Long Life -7500 ML | १६ | AL Riverts (10/12) |
| ७ | TMGO RA Oil 80W140 Long Life -14000 ML | १७ | Power Steering Fluid - 1 Liter - 3 Nos |
| ८ | Oil Seal BS2/3/4 -2 Nos | १८ | Filter Element Protect Filter BS1-4 - 1 Nos |
| ९ | Taper Roller BRG 565/562 BS1/2/3/4 -2 Nos | १९ | All Labour Charges |
| १० | Taper Roller BRG 32308 BS1/2/3/4 -2 Nos | २० | -- |

मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८५७ (फायर फायटर) वाहनाचे वाहन चालक यांनी दिलेल्या मागणी व टिप्पणी रिपोर्ट प्रमाणे वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि. जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.१९/०४/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.५४,३१५/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि. जळगांव यांना रक्कम रु.५४,३१५/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ३१**:- मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६१ (फायर फायटर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५२,४२७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६१ (फायर फायटर) हे वाहन अग्निशमन विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे कामी वाहन चालक टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी अनुक्रमे ३६०१, ३६०२, ३६०३ दि.२९/०३/२०२३ व कार्यालयीन टिप्पणी प्राप्त झालेली आहे. वाहन चालक यांच्या मागणी कार्यालयीन टिप्पणी प्रमाणे सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६१ (फायर फायटर) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | TMGO Diesel Engine Oil C14 Plus 15W40 - 21000 ML | ११ | Oil Seal (135X170X15) BS1/2/3/4/6 -2 Nos |
| २ | Oil Filter Element Spinon BS3/4 - 1 Nos | १२ | Taper Roller BRG Outer 32217 BS1/2/3/4 -2 Nos |
| ३ | Fuel Filter Element BS3/4 - 1 Nos | १३ | Taper Roller BRG Inner 683/72 BS1/2/3/4/6 -2 Nos |
| ४ | Air Filter Primary Element BS3/4 - 1 Nos | १४ | Oil Seal (135X170X15) BS1/2/3/4/6 -2 Nos |
| ५ | Air Filter Element Safety BS1/2/3/4/6 - 1 Nos | १५ | Brake Lining Kit (STD) 410X180NA1707 BS1-6 - 4 Nos |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | TMGO Gear oil 80W90 Long Life -7500 ML | १६ | AL Rivets (10/12) |
| ७ | TMGO RA Oil 80W140 Long Life -14000 ML | १७ | Power Steering Fluid - 1 Liter - 3 Nos |
| ८ | Oil Seal BS2/3/4 -2 Nos | १८ | Filter Element Protect Filter BS1-4 - 1 Nos |
| ९ | Taper Roller BRG 565/562 BS1/2/3/4 -2 Nos | १९ | All Labour Charges |
| १० | Taper Roller BRG 32308 BS1/2/3/4 -2 Nos | २० | -- |

मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी.वाय.५८६१ (फायर फायटर) वाहनाचे वाहन चालक यांनी दिलेल्या मागणी व टिप्पणी रिपोर्ट प्रमाणे वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि. जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.२१/०४/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.५२,४२७/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि. जळगांव यांना रक्कम रु.५२,४२७/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ३२**:- मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम.एच.१९ डी.व्ही.८०४० (Tata Tigor EV XZ+) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२१,८०१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय वाहन क्रं.एम.एच.१९ डी.व्ही.८०४० (Tata Tigor EV XZ+) वाहन हे मा.महापौर कार्यालयाकडे प्रशासकीय कामकाजाकरिता कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे कामी मा.महापौर कार्यालयाकडील टिप्पणी रिपोर्ट व वाहन चालक यांची मागणी क्र.३२११ दि.२४/०४/२०२३ रोजी प्राप्त झालेली आहे. जळगांव शहरामध्ये विविध विकासकामे सुरु असल्याने मा.महापौर यांना सदर कामांची पाहणी करणे कामी वेळोवेळी जावे लागत असल्याने वाहनाचे खालील नमूद कामे करणे आवश्यक आहे. वाहन चालक यांच्या मागणी कार्यालयीन टिप्पणी प्रमाणे वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ डी.व्ही.८०४० (Tata Tigor EV XZ+) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | Front Bumper Skin -01 Nos | ३ | Wheel Rim Cover Assy -01 Nos |
| २ | Fog Lamp Assy, Front -01 Nos | ४ | All Labour Charges (FR Bumper Assy Replace, Splash Guard Replace, RH LH Wheel Arch Liner R/R W/S Tank R/R, Radiator Frame Assy Repair & Leveling, FR Bumper C Member Repair, FR Bumper, Tie Member Assy, Wheel Cap) |

| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ५९,९६,७९१/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.५९,९६,७९१/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.५९,९६,७९१/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन खर्च करणेस व त्यानुसार मक्तेदार श्री.जितेश राजेंद्र महाजन यांचे निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ४५:-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ अंतर्गत कानळदा रस्त्यापासुन ते सुरेश कलेक्शन पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दर स्विकृत करणेस व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.५९,४९,६६१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ अंतर्गत कानळदा रस्त्यापासुन ते सुरेश कलेक्शन पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नपा/नादवसुयो/आर.आर./२५१/२०२३ दि.२८/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.२९/०३/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२४३ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८९११६८ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१५ दि.०६/०४/२०२३ चे पत्रान्वये दै.सकाळ या वर्तमानपत्रात दि.०७/०४/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४९,५३,५२२/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | वासुदेव प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर १.०५०% जास्तीचे दराने | ५०,०५,५३४/- |
| २ | जितेश राजेंद्र महाजन | निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दराने | ४९,५३,०२७/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.४९,५३,०२७/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ४९,५३,०२७/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ८,९१,५४५/- |
| ०३ | कामगार विमा १% | ४९,५३०/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ३,२४०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ५२,३१९/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ५९,४९,६६१/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.५९,४९,६६१/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.५९,४९,६६१/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन खर्च करणेस व त्यानुसार मक्तेदार श्री.जितेश

राजेंद्र महाजन यांचे निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ४६:-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ दुध फेडरेशन रस्त्यापासुन ते एम एस ई बी ऑफिस ते सिटी कॉलनी पर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दर स्विकृत करणेस व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.४५,१९,६६६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ दुध फेडरेशन रस्त्यापासुन ते एम एस ई बी ऑफिस ते सिटी कॉलनी पर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नपा/नादवसुयो/आर.आर./२५१/२०२३ दि.२८/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.२९/०३/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२४४ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८९११७७ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१५ दि.०६/०४/२०२३ चे पत्रान्वये दै.सकाळ या वर्तमानपत्रात दि.०७/०४/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३७,६२,७००/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | जितेश राजेंद्र महाजन | निविदा रक्कमेवर १.०५०% जास्तीचे दराने | ३८,०२,२०८/- |
| २ | वासुदेव प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दराने | ३७,६२,३२३/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.३७,६२,३२३/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३७,६२,३२३/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ६७७,२१८/- |
| ०३ | कामगार विमा १% | ३७,६२३/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ३,९३०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ३८,५७२/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ४५,१९,६६६/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.४५,१९,६६६/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.४५,१९,६६६/-

मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन खर्च करणेस व त्यानुसार मक्तेदार श्री.वासुदेव प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेवर ०.०१०% कमीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ४७:-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०४ विठ्ठलपेठ, मुंजोबा मंदिर (पांझरापोळ) ते महाकाली ॲग्रो एजन्सी पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटींग करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करणेस व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६८,५२,१२६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०४ विठ्ठलपेठ, मुंजोबा मंदिर (पांझरापोळ) ते महाकाली ॲग्रो एजन्सी पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटींग करणे कामास महासभा ठराव क्रं.९९२ दि.१५/०२/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.२२/०२/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२०२ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८७९६३२ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१९३५ दि.०२/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रात दि.०३/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ० (एकही नाही) ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली नसल्याने सदर कामाच्या ई निविदे प्रक्रियेस प्रतिसाद मिळत नसल्याने दुसऱ्यावेळेस फेर ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त यांनी दि.२९/०३/२०२३ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२४५ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८९२७२९ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/७४ दि.१२/०४/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रात दि.१३/०४/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५७,०२,८२०/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेवर ८% जास्तीचे दराने | ६१,५९,०४५/- |
| २ | श्री.पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर १०% जास्तीचे दराने | ६२,७३,१०२/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ८% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्यास त्यांनी दि.१५/०५/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./५८४ दि.१६/०५/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ५७,०२,८२०/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | १०,२६,५०८/- |
| ०३ | कामगार विमा १% | ५७,०२८/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १,३८०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ६४,३९०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ६८,५२,१२६/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.६८,५२,१२६/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.६८,५२,१२६/- मात्र मनपा लेखा शिर्ष सन २०२३-२४ नविन रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गतच्या निधीतुन खर्च करणेस व त्यानुसार मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ४८:-** कोकीळ गुरुजी जलतरण तलावाचे कोविड १९ चा प्रार्दुभाव व लॉकडावुन मुळे होणाऱ्या नुकसानामुळे वार्षिक फि व पाणीपट्टी माफ करुन ०२ वर्ष करारनाम्याची मुदत वाढविण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- विषय क्रं. ४८ मध्ये काय आहे की मा.आयुक्त महोदय या विषयामध्ये त्यांनी मागणी केलेली कोकीळ गुरूजी जलतरण तलाव हा मा.जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने कोविड कालावधीमध्ये दोन वर्ष हा कायद्याने राज्य शासनाच्या सुचनेप्रमाणे बंद करण्यात आलेला होता आणि म्हणुन त्याच्या संदर्भातील मक्तेदाराने मागणी केली की मनपाला उत्पन्न देण्याच्या दृष्टीकोनातुन देय असलेली रक्कम सदरहु मुदत वाढ करून मिळावी अशी मागणी केलेली आहे. तर मा.आयुक्त महोदयांनी याच्यामध्ये प्राधिकृत करण्यात येत आहे की मा.आयुक्त यांनी याच्यामध्ये अभ्यास करून कशी सुट देता येत असेल नियमानुसार त्यापध्दतीने निर्णय घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी केलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि त्या पध्दतीने कार्यवाही करावी. विषय क्रं. ४८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मे.एस.जी.एन. कन्ट्रक्शन,जळगांव यांचे दि.११/०५/२०२३ चे पत्र प्राप्त झाले असुन त्यांनी कोकीळ गुरुजी जलतरण तलावाचे कोवीड १९ चा प्रार्दुभाव व लॉकडावुन मुळे होणाऱ्या नुकसानामुळे वार्षीक फि व पाणीपट्टी माफ करुन ०२ वर्ष करारनाम्याची मुदत वाढविण्याबाबत मागणी केलेली आहे. त्याबाबत अहवाल खालील प्रमाणे.

मे.एस.जी.एन. कन्ट्रक्शन,जळगांव यांना मनपा मालकीचे कै.कोकीळ गुरुजी जलतरण तलाव कंत्राटीपध्दतीने चालविणे बाबत कार्यादेश क्र.जमनपा/सा.बा./जा.क्र./४७ दि.२५/०७/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आलेला असुन त्याची मुदत ३० वर्षा इतकी नमुद आहे. व कार्यादेशात नमुद करण्यात आल्या नुसार मे.एस.जी.एन. कन्ट्रक्शन,जळगांव यांनी निविदेकामी रक्कम रु.२,११,०००/- मात्र प्रतिवर्ष देकार मनपास दिलेला होता व वाटाघाटी अंती प्रतिवर्ष देकार रक्कम रु.२,५१,०००/- मात्र निश्चित होवुन त्यास स्थायी समिती ठराव क्र.६६२ दि.२३/०६/२०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. व त्यानुसार जलतरण तलावाचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची जबाबदारी देखील त्याच्यावर निश्चित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार त्यांनी मनपा पावती क्र.४१९९० दि.२७/०७/२०१७ अन्वये रक्कम रु.२,५१,०००/- व पावती क्र.१७५० दि.०७/०८/२०१८ अन्वये रक्कम रु.२,५१,०००/- मनपा खजिन्यात भरणा केलेला आहे. करारनाम्यातील अटी शर्ती नुसार प्रत्येक दोन वर्षानंतर या रक्कमेत १०% वाढ करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

त्यानुसार कार्यादेश देण्यात आल्यापासुन दोन वर्षानंतर पावती क्र.२४८९१ दि.२८/०८/२०१९ अन्वये मक्तेदाराने मुख्य रक्कम अधिक १०% असे एकुण २,७६,१००/- मात्र रक्कम मनपा खजीन्यात भरणा केलेली आहे मात्र त्या नंतर मार्च २०२० पासुन कोरोनाचा प्रार्दुभाव वाढल्याने शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार दि.१२/०३/२०२० या पासुन पूढील कालावधीत साठी म्हणजेच सन २०२०-२१ या कालावधीत जलतरण तलाव बंद ठेवण्यात आलेला होता परंतु या कालावधीत जलतरण तलावाची परिसराची साफसफाई तसेच जलतरण तलावात असलेल्या पाण्याचे शुध्दीकरण करणे व इतर कामे मक्तेदारामार्फत करण्यात आलेले आहेत व त्यासाठी आवश्यक साहित्य व मनुष्यबळ यासाठी आलेला खर्च मक्तेदाराने केलेला आहे व मक्तेदारास या कालावधीत जलतरण तलावापासुन कोणताही आर्थिक मोबदला मिळालेला नाही. म्हणुन त्यांनी या कालावधी करीता म्हणजेच सन २०२०-२१ व २०२१-२२ या दोन वर्षाच्या कालावधी करीता ठरलेले वार्षिक भाडे व पाणीपट्टी मध्ये सूट मिळावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे व सदरचे दोन वर्ष मुदत संपल्यानंतर पूढील कालावधीकरीता वाढवुन देण्यात यावेत अशी मागणी केलेली आहे. मक्तेदाराने सन २०२३-२४ या वर्षाकरीता ३,००,०००/- मात्रचा भरणा चेकव्दारे मनपा खजिन्यात जमा करणे कामी दि.११/०५/२०२३ च्या पत्रासोबत सादर केलेला असुन मागील ०३ वर्षाबाबत मनपा मार्फत कोविड १९ मुळे सुट मिळण्याकामी अंतीम निर्णया नंतर पुर्तता करणे बाबत कळविले आहे.

कार्यादेश व करारनाम्यानुसार

| अ.नं. | दिनांक | ते | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २५/०७/२०१७ | :- | २५/०७/२०१८ | २,५१,०००/- |
| २ | २५/०७/२०१८ | :- | २५/०७/२०१९ | २,५१,०००/- |
| ३ | २५/०७/२०१९ | :- | २५/०७/२०२० | २,५१,०००/- + १०% = २,७६,१००/- |
| ४ | २५/०७/२०२० | :- | २५/०७/२०२१ | २,७६,१००/- |
| ५ | २५/०७/२०२१ | :- | २५/०७/२०२२ | २,७६,१००/- + १०% = ३,०३,७१०/- |

अश्या प्रकारे एकुण रक्कम रु.१३,५७,९१०/- भरणा करणे आवश्यक आहे. सदर एजन्सीने आतापावेतो भरणा केलेल्या रक्कमेचा तपशिल

| अ.नं. | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | ४१९९० | २७/०७/२०१७ | २,५१,०००/- |
| २ | १७५० | ०७/०८/२०१८ | २,५१,०००/- |
| ३ | २४८९१ | २८/०८/२०१९ | २,७६,१००/- |
| ४ | चेक नंबर १३७९६९ | ११/०५/२०२३ | ३,००,०००/- |
| | | एकुण रक्कम रु. :- | १०,७८,१००/- |

असा एकुण १०,७८,१००/- रुपयांचा भरणा केलेला आहे. व कोविड १९ च्या कालावधीतील सन २०२०-२१ व २०२१-२२ या दोन वर्षाच्या कालावधीत जलतरण तलाव बंद असल्याने त्यांनी उपरोक्त नमुद मागणी केलेली आहे.

करारनाम्यातील अटी शर्तीनुसार मक्तेदार व मनपा यांच्यात कोणताही वाद निर्माण झाल्यास आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील व तो संबंधीतास बंधनकारक राहील असे नमूद आहे.

मात्र अशा प्रकारे वार्षीक भाडे व पाणी पट्टी मध्ये सुट दिल्यास मनपाचे आर्थीक नुकसान होईल म्हणुन सुट देणे योग्य होणार नाही. तसेच करारनाम्यातील कालावधी / कार्यादेशचा कालावधीमध्ये वाढ करणे ही बाब धोरणात्मक बाब असल्याचे प्रशासनाने प्रस्तावात नमूद केले असून सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदर प्रकरणी निर्णय घेणेकामी आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत असून आयुक्त यांनी यासंदर्भात योग्य तो निर्णय घेवून सूट देणे तसेच मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव , विषय क्रं. ४९:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१८ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मधिल गणेश ठाकरे यांचे घरापासुन ते प्रकाश तायडे (टेलर) यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.१०,५६,१००/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१९ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ हुडको मधील गल्ली नं.०२ रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.२४,८७,५४८/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२० दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मधील स्वामी समर्थ केंद्र समोरील सुळेबाई चक्कीवाले (संपुर्ण एल पट्टा) रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.१७,४३,२४०/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२१ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ वालोदकर चक्की पासुन वसंत शिंदे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.९,८७,७६५/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२२ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मध्ये महाजन दवाखाण्यापासून ते अनिल मामा चौधरी यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे कामी मक्तेदार श्री.सचिन बाजीराव पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.९,८७,७६५/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२३ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मधिल मनपा कर्मचारी पुंडलीक कोळी यांचे घरापासुन ते हिरामण गंगाराम सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.१८,९६,६७०/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२४ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मधिल धोबीबुवा यांचे घरापासुन सार्व.शौचालय पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.सचिन बाजीराव पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.०१०% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.११,८७,९६६/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२५ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मधिल आप्पा महाजन यांचे घरापासुन ते सार्व.शौचालय पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.सचिन बाजीराव पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.११,८८,०८४/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२६ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ डॉ.सुभाषदादा यांचे घरापासुन रेल्वे लाईन पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.११,८३,१३५/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२७ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ शिवाजी नगर हमालवाडा सार्वजनीक शौचालय ते गायत्री प्रोव्हिजन पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.२४,५५,०७३/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२८ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ विनायक पाटील यांचे दुकानापासुन ते राजु शिंदे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे कामी मक्तेदार श्री.सचिन बाजीराव पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.९,५२,०३७/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./२९ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ हुडको मधील गल्ली नं.०१ रस्ता डांबरी करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय यशवंत पवार यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.२४,८५,९५३/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./३० दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ संभाजी चौक ते कन्या शाळा डांबरी रस्ता करणे कामी मक्तेदार श्री.सचिन बाजीराव पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.०१०% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.२४,८९,३२४/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./३१ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ पठाण साहेब यांचे घरापासून ते शाम पिठवे यांचे घरापर्यंत डांबरी रस्ता करणे कामी मक्तेदार श्री.सचिन बाजीराव पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.२४,५६,८५२/- मात्र खर्चाची संविदा.

१५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./३२ दि.२४/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मधिल राजु शर्मा यांचे घरापासुन ते मयुर शिंपी यांचे घरापर्यंत व मोहन महाराज यांची गल्ली पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.सचिन बाजीराव पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.११,८८,०८४/- मात्र खर्चाची संविदा.

१६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४७ दि.०४/०५/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०४ स्नेहलचौक विठ्ठलमंदीर (मठगल्ली) पासुन ते साईबाबा मंदिरा पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटींग करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,५०,४१८/- मात्र खर्चाची संविदा.

१७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४८ दि.०४/०५/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.३० मुक्ताईनगर ओपनस्पेस मध्ये चेनलींग फेन्सींग पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे वाटाघाटीअंती निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,८४,३६४/- मात्र खर्चाची संविदा.

१८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४९ दि.०४/०५/२०२३ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०९ अंतर्गत बेंडाळे नगर ओपनस्पेस मध्ये चेनलींग फेन्सींग पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे वाटाघाटीअंती निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.७,०३,०३९/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.अश्विन सोनवणे** :- महापौरताई आता विषय असा आहे की मागच्या एक वर्षापासुन जळगांव शहरामध्ये काही कंपन्या पाईप टाकुन अंडरग्राऊंड केबलींगच काम करीत आहेत. तर त्यांना आपण परवानगी दिलेली आहे का ? जर

परवानगी दिली असेल तर त्याची मला माहिती पाहीजे. जर ते आपल्याला पैसे भरून देता तर ते पैसे भरलेले आहेत का ? त्याची डिमांडनोट कितीची आहे ? काय आहे ? याची मला माहिती पाहीजे नोंदी पाहीजे. परवानगी दिली आहे का एक वर्षापासुन मग अस कस काय? एक वर्षापासुन आपल्या शहरात पाईप टाकण्याच काम चालु आहे त्यांना परवानगी दिली नाही मग ते काम अस काय चालु आहे आणि ते काम रात्री करत आहेत. नितीनभाऊ हा महत्वाचा विषय आहे. एक वर्षापासुन आपल्या शहरात फायबर ऑप्टीकच काम चालु आहे. त्याला यांनी परवानगी दिलेली नाहीये. अस यांच्या निदर्शनास आल नाही का एक वर्षापासुन ते डायरेक्ट नाही म्हणत आहे पैसे घेतले का? उत्तर द्या. मॅडम नंतर बोला त्यांच उत्तर ऐकायच आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :-भाऊ गेल्या दिड ते दोन वर्षापासुन जळगांव शहरामध्ये कुठल्याही भागामध्ये अंडरग्राऊंड केबल टाकण्यासाठी परमिशन दिलेली नाही. गेल्या दोन वर्षामध्ये कुलकर्णी साहेब आयुक्त असतांना आपला जो DSR होता त्या DSR नुसार नविन बनवुन दिलेला होता महापालिकेने १० टक्के सर्विस चार्ज वाढवुन तो मंजुर केला त्यानंतर एकाच कंपनीला जिओ कंपनीला आपण १ कोटी २१ लाखांची काहीतरी डिमांडनोट भरायला दिली होती त्यानंतर त्यांनी एकही रूपया भरलेला नाही.

**श्री.अश्विन सोनवणे** :- एकही रूपया भरलेला नाही मग काम कस काय चालु देता आहे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :-भाऊ काम कुठे चालु आहे. कुठेच नाही

**श्री.अश्विन सोनवणे** :- माझ्याकडे फोटो आहे.काम चालु आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :-भाऊ जर

**श्री.अश्विन सोनवणे** :- माझ्यासमोर काम चालु होत.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :-शहरामध्ये

**श्री.अश्विन सोनवणे** :- शहरामध्ये काम चालु आहे आणि तुम्ही काय नाही म्हणत आहेत.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :-भाऊ जर शहरामध्ये

**श्री.विष्णू भंगाळे** :- मा.आयुक्त महोदयांकडे जावुन भेटलो सुध्दा आहे आम्ही आयुक्त मॅडम आपल्याशी चर्चा सुध्दा केली होती या विषयावर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :-शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी नविन रस्ते होत आहेत म्हणुन कोणत्याही कंपनीला केबल टाकण्याकरीता खोदण्याची परवानगी दिलेली नाही. त्यांनी शेवटी नाईलाजाने ओवर व्हियुची परमिशनच प्रपोजल तयार करून.

**श्री.अश्विन सोनवणे** :- रस्ते खोदुन टाकत आहे मला बाकीचे काही सांगु नका मला साहेब

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- भाऊ जर शहरामध्ये बेकायदेशीर रित्या जर खोदकाम होत असेल तर निदर्शनास आणुन द्या आणि आपण त्याच कामही बंद करू आणि दंडही करू त्याला

**मा.उपमहापौर** :- माझ्या प्रभागामध्ये ५ बाय ५ चा खड्डा खोदलेला आहे त्याच्यामध्ये चेंबर तयार केलेले आहे. त्याच्यामधुन ते कनेक्शन जोडत आहेत. भर चौकात पुढच्या चौकात

**श्री.अश्विन सोनवणे** :- आता हे काम कस का चालु आहे. एक वर्षापासुन काम चालु आहे. आता तुम्ही म्हणता आहे की नाही चालु आहे म्हणजे आम्ही खोटे आहे का?

**मा.आयुक्त** :- सोनगिरे साहेब जी काम चालु असतील ती बंद करा.

**मा.महापौर** :- सोनगिरे साहेब जे काम चालु असतील त्यांची चौकशी करा आणि ते लगेच बंद करा.

**श्री.विष्णू भंगाळे** :- मा. महापौर महोदया शहरामध्ये काम चालु आहे केबलचे

**श्री.अश्विन सोनवणे** :- मी स्वत: विचारले त्यांना आज

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- भाऊ तुम्ही स्पॉट सांगा मी स्वत: चौकशी करतो आणि काम बंद करतो.

**श्री.अनंत जोशी** :- प्रभाग चौकात चालु आहे.

**श्री.अश्विन सोनवणे** :- प्रभाग चौकात, प्रताप नगर मध्ये पण चालु आहे.

**श्री.विष्णू भंगाळे** :- म्हणजे स्पॉट पण आम्ही सांगायचा. त्यांच काम आहे ना प्रत्येक प्रभागातील इंजिनियरच

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- भाऊ तस नाही ज्यांच्या वॉर्डात आहे ना त्यांना विचारतो आहे मी

**श्री.अश्विन सोनवणे** :- कारवाई व्हायला पाहीजे मॅडम , बोला तुम्ही त्यांना तस , गेल्या एक वर्षापासुन चालु आहे ना

(सन्मा.सदस्या.सौ.प्रतिभा देशमुख या व्यासपिठावर आल्या व मा.महापौर यांचेशी चर्चा केली)

**श्री.अश्विन सोनवणे** :- फायबर ऑप्टीकच

**मा.उपमहापौर** :- जास्त आहे भाऊ

**मा.आयुक्त** :- सोनगिरे साहेब, ज्या प्रभागाचे इंजिनियर आहेत ती त्यांची जबाबदारी आहे तर ते त्यांनी तपासाव आणि त्यांना दंड लावावा आणि काम बंद कराव.

**श्री.अश्विन सोनवणे** :- एक वर्षापासुन त्यांनी काम सुरू करून टाकले आहे.

**मा.आयुक्त** :- बंद करू आपण ते आणि दंड दुप्पट लावु.

**श्री.अश्विन सोनवणे** :- तिप्पट तरी लावा त्यांना

**श्री.नितीन लढ्ढा** :- चौकशी करा मॅडम त्याची

**मा.आयुक्त** :- चौकशी करू आणि नियमानुसार असेल तर ठिक आहे नाहीतर दंड लावु.

**मा.उपमहापौर** :- शहरामध्ये ते रस्ते ज्या प्रभागात खोदत आहे त्या इंजिनियर वर लायबिलीटी फिक्स करावी.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- महापौरताई, मी १५-२० दिवसांपुर्वी पत्र दिले होते. तर त्याच्यावर पाच दहा वर्षापासुन हे प्रकरण चालु आहे. तर या अतिक्रमण यांनी मागच्या वेळेला काय केलेल आहे आणि आता कुठल्या परिस्थितीत आहे याची मला माहिती पाहीजे.

**सौ.प्रतिभा देशमुख** :- महापौरताई

**मा.महापौर** :- हो उत्तर देतील फक्त थांबा थोड

**सौ.प्रतिभा देशमुख** :- फक्त माझ्या पत्राप्रमाणे दुरूस्ती करण्यात यावी हि विनंती आहे.

**मा.महापौर** :- पत्र काय आहे आहे

**सौ.प्रतिभा देशमुख** :- दवाखान्याचे आहे.

**मा.महापौर** :- दवाखान्याचे आहे.

**सौ.प्रतिभा देशमुख** :- काम सुरू आहे पण काही लोकांनी फोन केले त्याच्याबद्दल तर ते काम सुरू करण्यात याव.

**मा.महापौर** :- प्रशासनाने याची दखल घ्यावी आणि जे काम बंद पडलेले आहे तर ते बघा आणि जर काही काम बंद पडलेले असेल तर ते पुन्हा सुरू करण्यात याव.

**श्री.बागुल, नगररचनाकार** :- महापौरताई उज्वलाताईंचा जो हा जो विषय आहे. ती मी फाईल तपासतो आणि मग त्यांना माहिती देतो.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- महापौरताई, ते आहे बेकरी शॉप आयुक्त मॅडम हे जे हॉटेल जे आहे ते बेकरी शॉप आहे . तर त्या बेकरी शॉपला पुर्ण बंदिस्त करून त्यांनी हॉटेल म्हणजे कॉटेज चालु केलेल आहे आणि १७ पासुन हे सुरू आहे.

**मा.आयुक्त** :- बागुलसाहेब तपासुन मला सांगा.

**श्री.बागुल, नगररचनाकार** :- हो मॅडम फाईल तपासुन सांगतो.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- मी सांगते मॅडम

**मा.आयुक्त** :- विधीशाखेकडे पाठवले आहे का?

**श्री.बागुल, नगररचनाकार** :- हो विधी शाखेचा अभिप्राय घ्यावा लागेल मॅडम

**सौ.उज्वला बेंडाळे** :- विधी शाखेला ते गेलेल आहे. त्यांनी स्टे आणलेला होता. २०२० पासुन आपल्या वकीलांनी तिथे काहीही काम केलेल नाहीये. मग आपण त्यांना मानधन जे देतो, पैसे देतो ते कशाबद्दल देतो.

**मा.आयुक्त** :- माहिती काढुन द्या.

**श्री.बागुल, नगररचनाकार** :- हो मॅडम देतो.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- आता विधी शाखेला गेलेल आहे आता त्याच्यावर काय करता आहे आपण आणि जी हायकोर्टात गेलेली केस आहे तर ते आपले वकील काय करतात.

**मा.आयुक्त** :- कायदेशीर बाब असल्यामुळे आपण मुद्दा समजुन घेवु आणि आयुक्तांना अधिकार आहेत का कारवाई करण्यासाठी आणि मग आपण बघु आणि मग त्याच मोजमाप करून पुढील निर्णय घेण्यात येईल आणि काही कायदेशीर बाब असेल जर कधी आपल्याला काही बंधन आहेत तर ते आपल्याला कळविण्यात येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- कधीपर्यंत सांगाल मॅडम

**मा.आयुक्त** :- येत्या सात दिवसात सांगते मी तुम्हाला काय आहे ते

**श्री.प्रशांत नाईक** :- नाल्याच काम कधीपर्यंत सुरू होणार आहे.आता ७ जुन पासुन पावसाळा सुरू होणार आहे. आपल्याला एप्रिल महिन्यापासुन सांगत आहे की हे काम करायच आहे आतापर्यंत टेंडर प्रोसेस पण पुर्ण झालेली नाहीये.

**मा.महापौर** :- सांगा सोनगिरेसाहेब काय पोजिशन आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- काय आहे की पावसाळ्यात लोकांच्या घरांमध्ये पाणी जात तुम्हालाही तो फोटो टाकला आहे व्हिडीओ टाकला आहे आणि तुम्ही आणि मी पाहणी केलेली होती. सोनगिरेसाहेब तुम्हालाही फोन केले होते मी लोकांच्या घरांमध्ये पाणी जात येवुन पाहा तिथे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- कुठला विषय आहे भाऊ हा

**श्री.प्रशांत नाईक** :- मलीक नगर मधील विषय आहे. कचरा पण साईडला पडलेला असतो.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- तो जो विषय आहे नालेसफाईचा विषय आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- हो

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- आज पासुन जे.सी.बी पोहोचले आहे उद्यापासुन ते चालु होईल.

**श्री.प्रशांत नाईक** :- टेंडर प्रोसेस झाली आहे का?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो झाली आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- तुम्हाला विचारले तर तुम्ही सांगीतले पण नाही.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो टेंडर प्रोसेस झाली आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- नाही, नाही तुम्ही मला सांगा तुम्ही मला काय सांगीतले होते की तो फोनच उचलत नाही.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- आता हे टेंडर झालेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- मॅडम एक गटार आहे छोटीशी आणि तिथे तांबापुरामध्ये पाणी घुसते आणि तिथे मॅन्युली करावी लागणार आहे साफसफाई त्याची त्याच एक पत्रही दिल आहे मी तुम्हाला त्याच्यावर काय कारवाई झाली आहे ते सांगा तुम्ही मला

**मा.आयुक्त** :- याच्यामध्ये काय आहे की नालेसफाईच जे आहे काही ठिकाणी नाल्याचे चोकअप झाले आहेत त्यामुळे त्या त्या अनुषंगाने आपल्या इंजिनियरांची बैठकही झालेली आहे. त्या अनुषंगाने त्या नाल्याची आधी साफसफाई करून घ्यायच्या आहेत. जे जे इंजिनियर आहेत आहे सोनगिरे साहेब ते करून घ्यायच आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- पाटील साहेब काय झाले आहे पत्र दिले होते मी

**श्री.इब्राहीम पटेल** :- पत्र पण दिले आहे आणि

**श्री.प्रशांत नाईक** :- भाऊ नाला जो है ना सोसायटी के पास से तो कोपरेतक वो पुरा ब्लॉक हो गया है. आयुक्त मॅडम महत्वाचा विषय आहे तो आता पावसाळा सुरू होईल लोकांच्या घरांमध्ये पाणी जात आहे.

**मा.आयुक्त** :- पत्रकार बंधु पण आहेत येथे

**श्री.प्रशांत नाईक** :- पत्रकारांना जावु द्या पत्रकांराशी काय घेण-देण आहे आपल्याला , पत्रकारांशी बाकीच्यांना घेण देण आहे आपल्याला काय आहे. आम्हाला फोटो नाही काढायचा आहे मॅडम आम्हाला फक्त नगरसेवक राहायच आहे. आम्हाला फक्त आमच्या वॉर्डात राहायच आहे. चमकोगीरी आम्हाला करायची नाहीये. उत्तर द्या मॅडम याच मला

**श्री.राजेंद्र पाटील** :- मागील महिन्यामध्ये आपण मा. आमदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली त्या बैठकीत

**श्री.प्रशांत नाईक** :- पत्रकारांचा काय संबंध आहे ईथे

**श्री.राजेंद्र पाटील** :- प्रशांतभाऊ

**श्री.प्रशांत नाईक** :- नाही नाही ते म्हणत आहेत की पत्रकार आहे ईथे

**मा.आयुक्त** :- सर मी काय म्हणते आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- नाही पत्रकारांचा विषय आहे का हा आमचा जो नालेसफाईचा विषय आहे तो पत्रकारांकरीता आहे का ?

**मा.उपमहापौर** :- प्रशांतभाऊ विषय काय आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- नाही कुलभुषणभाऊ ते म्हणत आहेत की पत्रकार गेले म्हणुन तुम्ही सांगीतले का की पत्रकार आहे म्हणुन पत्रकारांना बोलतोय का मी तुम्ही सांगीतले का त्यांना की पत्रकार गेले म्हणुन

**मा.उपमहापौर** :- प्रशांतभाऊ बोलू द्या ना त्यांना

**श्री.प्रशांत नाईक** :- त्यांना बोलु द्या. राजुभाऊ थांबा दोन मिनिंट, पत्रकांराचा विषय बोलता आहे का आपण ते पत्रकांराचा विषय घेत आहेत. नाल्याचा विषय करतो आहे मी पत्रकांराबद्दल बोलतोय का आपण मी जेवण नाही केले आणि येथे थांबलोय.

**श्री.राजेंद्र पाटील** :- मा. आमदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली त्या बैठकीत मी नाल्यांचा विषय केलेला होता. तर मेहरूणचा जो तलाव आहे त्याचा जो आऊटलेट आहे त्या आऊटलेटमधुन जसे पाणी वाहायला सुरूवात झाली. तर साईबाबा मंदिराचा जो परिसर आहे तो परिसर तलाव युक्त होवुन जातो. महापौरांच्या घरापर्यंत पाणी पोहचते. त्यांच्या घराच्या पायरीपर्यंत इतकी पाण्याची पातळी तिथे वाढते आणि आता त्याठिकाणी नाल्याला संरक्षण भिंत बांधली तरी सुध्दा त्याच्यामध्ये गावातील येणारे पाणी वाहत नाही आणि नैसर्गिक जे नाल्याचे स्वरूप होते ते आता बदललेले आहे. तो समजा २० मिटर / ३० मिटर नाला असेल तर तो आता १०/१५ मिटरवर नाला येवुन गेलेला आहे आणि त्यात आपले अंडरग्राऊंड ड्रेनेजचे चेंबर सुध्दा आहेत तर त्या चेंबरमुळे तिथे घाण अडकण्याची शक्यता आहे आणि पाणी हे मेहरूण गावात घुसण्याची शक्यता आहे. त्याच्याने तिथे जे साईबाबा मंदिर आहे त्या मंदिरालागुन जी वस्ती आहे तर त्या वस्तीत जर पाणी घुसल तर तिथे जिवित हानी व्हायची सुध्दा शक्यता आहे. म्हणुन आपली नालेसफाई लवकरात लवकर केली पाहीजे. वास्तविक आता १५ दिवसांनी , ८/१० दिवसांवर पाऊस सुरू होईल. मान्सुनची सुरूवात होणार आहे आणि मला वाटत की टेंडर , टेंडर झाले आहे का साहेब

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो.

**श्री.राजेंद्र पाटील** :- मग कामाची सुरूवात कधी होणार आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- परवापासुन होईलभाऊ आज मी जे.सी.बी पोहोचवायला सांगीतले आहे आज सकाळी

**श्री.राजेंद्र पाटील** :- तर आता मेहरूणचा जो नाला आहे तिथुन सुरूवात करा आणि तिथे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो हो.

**मा.महापौर** :- साहेब आता जे भाऊंनी सांगीतले आणि ते बंधाऱ्याचे जे महत्वाचे आहेत ते लवकर लावा.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो ताई आज जे.सी.बी आलेले आहेत एक दोन दिवसात प्रत्यक्ष कामाला सुरूवात होईल

**मा.आयुक्त** :- सोनगिरे साहेब साईबाबा मंदिराजवळ पासुन सुरूवात करावी.

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**मा.उपमहापौर** :- साहेब नालेसफाईच टेंडर काढलेले नाहीये का अजुन

**श्री.प्रशांत नाईक** :- टेंडर काढुन झाल आहे. एकच टेंडर आल होत.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो टेंडर प्रोसेस झालेली आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- नाही आता झाल आहे का

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो झालेले आहे.

**मा.उपमहापौर** :- आपल्या जे.सी.बी कडून पण होवू शकत ना साहेब

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो आपले पाचही जे प्रमुख नाले आहेत ना बाकी सगळे नाले आपण

**श्री.प्रशांत नाईक** :- १० फुटाचा नाला आहे पुर्ण १० फुट भरलेला आहे.शेजारी जे घर आहे त्या घरात पाणी जाते डायरेक्ट आणि मुल खेळतात तिथे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- आपल्या शहरातील उपनाले जे आहेत ना त्या उपनाल्यांची उंची जी आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- उपनाल्यांची गोष्ट करत नाहीये आम्ही मुख्य नाल्यांचा विषय करतो आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- आणि मुख्यनाल्यांची उंची

**श्री.प्रशांत नाईक** :- मी मुख्य नाल्यांचा विषय करतो आहे. मेहरूणचा जो नाला आहे तो मुख्य नालाच आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- आपण सगळया नाल्यांची साफसफाई करणार आहे.

**श्री.प्रशांत नाईक** :- हा पण मुख्य नालाच आहे.

(सन्मा.सदस्य. श्री. प्रशांत नाईक हे व्यासपिठावर आले व मा.उपमहापौर यांच्यासोबत चर्चा करीत होते.)

**श्री.प्रशांत नाईक** :- मॅडम तो नाला मुख्य आहे.

**मा.महापौर** :- ते तेच सांगत आहेत की सुरूवात करताय. मी फोन करते की नाही तुम्हाला त्या नाल्यासाठी, एक यांचा भाऊंचा विषय आहे महत्वाचा आणि

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो ताई

**श्री.प्रशांत नाईक** :- मॅडम मी फोन पण केला होता तुम्हाला आणि व्हिडिओ पण टाकलेला आहे.

**मा.आयुक्त** :- मी सांगीतले होते आणि प्रत्येकांच्या तक्रारी नोट करते आणि बघायला येते हे ही म्हंटले होते मी

**श्री.प्रशांत नाईक** :- मॅडम तुम्ही या आणि पाहुन घ्या काय आहे ते

**मा.महापौर** :- भाऊ आज महासभा आहे सोनगिरे साहेब उद्या पासुन ते काम सुरू करा.

**श्री.प्रशांत नाईक** :- ताई तुमच्या घरापर्यंत पाणी येते की नाही हे सांगा.

**मा.महापौर** :- मी काय सांगते आहे ना आणि उद्यापासुन सुरू करणार आहेत ना ते काम

(सभागृहात बरेच सन्मा. सदस्य व अधिकारी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही )

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- भाऊ तिन पोकलँड आणि दोन जे.सी.बी उद्यापासुन एकाचवेळेला पाच ठिकाणी काम करणार आहे. अजुन काय सांगु.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अध्यक्ष महोदय, आयुक्त मॅडम मला एवढ सांगा आता शिवाजी नगर उड्डाणपुला बाबत टि मार्गाच काय झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाच तुम्हाला पत्र आलेल आहे. त्याच्यावर काय उत्तर दिले आहे तुम्ही मार्क केले की नाही तुम्ही त्याच

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- ज्या अर्थी आपल्या महाराष्ट्र जिवन प्राधिकरण , आपल्या जळगांव महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येते. मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घ्यायचा आहे. त्यावेळेला जो मॅप तयार झाला होता तो असा होता तो सांळुखे चौकापासुन शाळेपर्यंतचा होता. त्याचे ज्यावेळेला आपण आणि इंजिनियर साईडवर आलो होतो तेव्हा सांगीतले होते की सांळुखे चौक जो चालु आहे मार्ग आता केला तर बर होईल तर त्यांनी त्यावेळेला नकार दिला होता त्याच्यानुसार टि मार्गाचा अजुन कुठलाही निर्णय झालेला नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- साहेब तुमच्या माहिती साठी सांगतो कलेक्टर साहेबांकडे गेलो होतो तर ते स्पष्ट सांगता की टि मार्ग कॅन्सल करा आणि रात्री नऊ वाजता आणि नवनाथ सोनवणे साहेब पण होते रात्री नऊ वाजता त्यांनी सुध्दा सांगीतले त्या विषयावर तुम्ही म्हणजे महापालिका जर आम्हाला मोजमाप करून देत असेल तर आम्ही पुढची कार्यवाहीसह , पुढच काम करू तुम्ही असा प्रस्ताव पाठवला आहे का. आता कलेक्टर साहेब वेगळ सांगतात, तुम्ही वेगळ सांगतात, सार्वजनिक बांधकाम विभाग वेगळ सांगतात तर आम्ही काय समजायच नाहीतर डिक्लिअर करून टाका कॅन्सल झाल्याच

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- ती माहिती जी आहे कारण हा विषय जो आहे B&C निर्णय घेत नाही डायरेक्ट एम.एस.ई.बी ला पत्र द्या आणि आम्ही पत्र दिल आणि पैसे भरायचे होते त्याच्याप्रमाणे कार्यवाही केली आणि ते म्हणतील तेवढ अतिक्रमण काढुन द्या तर आपण ते पण काढुन द्यायला तयार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- मग ते पत्र पाठवल आहे मी बोललो त्याच काय

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- काय पत्र आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- तुम्हालाच माहिती काय पत्र आहे ते

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- नाही नाही या बाबतीत मजिप्र ने पत्र पाठवलेल नाहीये.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- ते सरळ सांगत आहेत की महानगरपालिकेने मोजमाप करून द्याव अस.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- मोजमाप त्यांनीच करून घेतल आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की तो जो रस्ता आहे टि मार्गाचा त्याला एका साईडला ७ मिटर आणि दुसऱ्या बाजुला ७ मिटर जागा पाहीजे ती सहा सहा मिटर भरत आहे. आता तिथे जे घर आहेत ते गावठाण भागातील आहेत. तिथे त्यांच्या घराची हद्द संपली की तिथुन डायरेक्ट रोड चालु होतो आणि हि आजची परिस्थिती नाहीये ज्यावेळेला पुल पाडण्यात आला मोजमाप करण्यात आले त्यावेळेचीच तिच परिस्थिती आहे आज त्याच्यात कुठलाही बदल झालेला नाहीये. याच्याबद्दल महानगरपालिकेवर कुठलाही आक्षेप घेवू नये किंवा कुठलेही काम करू नये.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- गुरुवारच्या दिवशी तुम्हाला एक पत्र दिल होत त्याचाही फॉलोअप घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- एकच मिनिंट प्रविणभाऊंचा विषय आहे.

**मा.महापौर** :- बोला प्रविणभाऊ

**श्री.प्रविण कोल्हे** :- मनपा महासभा ठराव क्रं. ८२१ दि.३०/०५/२०२२ मधील बदल करून नविन ठराव करणेबाबत, प्रभाग क्रं. खेडी गांव परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावाने प्रवेशद्वार उभारणे व त्यावर स्व. प्रकाश आनंदा देवकर यांच्या स्मरणार्थ नांव बदल करून महापालिकेच्या अटी-शर्तींवर स्वखर्चाने मान्यता देण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- इतिवृत्तात बदल आहे ना तो.

**मा.महापौर** :- मला पत्र दिलेल आहे मी याच्यात बदल करण्यासाठी पत्रावर मार्क केलेल आहे

**नगरसचिव** :- याच्यात ठरावात बदल करणे बाबतचा विषय हा विषय पत्रिकेवर घ्यावा लागतो. त्यामुळे तो विषयपत्रिकेत घ्यावा लागेल आणि तिन महिन्याचा कालावधी झाला आहे किंवा नाही झाला आहे ते तपासुन घ्या.

**श्री.प्रविण कोल्हे** :- हा जो ठराव आहे.

**नगरसचिव** :- ठिक आहे तो विषय विषयपत्रिकेवर घ्यावा लागेल.

**मा.उपमहापौर** :- पुढच्या महासभेत घेवु प्रविणभाऊ

**नगरसचिव** :- विषयपत्रिकेवर घ्यावा लागेल.

**मा.महापौर** :- भाऊ येणार आहे विषय

**श्री.प्रविण कोल्हे** :- ठिक आहे.

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीतला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**